सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# इस्त्रायलची आत्मनिर्भरता भारतासाठी संधी!

विदेशनीती | अनय जोगळेकर

**इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहूंनी लष्करीदृष्ट्या इस्त्रायलला आत्मनिर्भर करण्याचा नारा दिला आहे. भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भारत आणि इस्त्रायलमधील संरक्षण क्षेत्रातील संबंध मजबूत होत आहेत. पूर्वी हे संबंध भारताने इस्त्रायली शस्त्रास्त्रे खरेदी करण्यापुरते होते. पण, आता त्यामध्ये बदल होताना दिसतो.**

अमेरिका आणि इराणमधील युद्धबंदीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या होऊन दोन आठवडे उलटले आहेत. जी- ७ परिषदेत डोनाल्ड ट्रम्प यांनी या करारावर डिजिटल स्वाक्षरी केली, तर इराणमध्ये अध्यक्ष मसूद पेझश्कियान यांनी डिजिटल स्वाक्षरी करून हा करार पूर्ण केला. त्यानंतर कतार आणि पाकिस्तानच्या मध्यस्थीने स्वित्झर्लंडच्या लुसर्न येथे अमेरिका आणि इराणमध्ये पुढील वाटाघाटींबद्दल चर्चा करण्यात आली. त्यात नेमके काय ठरले, याबाबत अमेरिका आणि इराणकडून केल्या जाणाऱ्या दाव्यांमध्ये तफावत असली; तरी त्या यशस्वी झाल्याचे दोन्ही बाजूंचे म्हणणे आहे. पण, असे सांगितले जात आहे की, चर्चेच्या पहिल्या दिवशी इस्त्रायलच्या दक्षिण लेबेनॉनमधील कारवाईबाबत चर्चा झाली.

इराण आपल्या मतावर ठाम आहे की, युद्धविराम हा इराण आणि लेबेनॉन या दोन्ही आघाड्यांवर व्हायला हवा. असे करण्यास इस्त्रायल तयार नाही. कारण, लेबेनॉनमध्ये इस्त्रायलची लढाई लेबेनॉन सरकारशी नसून, तेथून इस्त्रायलवर हल्ले करणाऱ्या हिजबुल्ला या इराणे समर्थित दहशतवादी संघटनेशी आहे. संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेने हिजबुल्लाचे निःशस्त्रीकरण करण्याबाबत ठराव करूनही आज हिजबुल्ला लेबेनॉनच्या सैन्यापेक्षा अधिक शक्तिशाली आहे. इस्त्रायलला भीती वाटते की, युद्धविराम झाल्यानंतर अमेरिकेचा आणि संपूर्ण जगाचा या विषयातील रस संपेल. या परिस्थितीचा फायदा घेऊन इराण आपल्याकडील ड्रोन आणि क्षेपणास्त्रे हिजबुल्लाला पुरवेल. त्यासाठी इस्त्रायलने दक्षिण लेबेनॉनमध्ये हिजबुल्लाच्या प्रभावक्षेत्रात सैन्य घुसवले असून, राजधानी बैरुतच्या दक्षिण भागामध्ये हिजबुल्लाच्या तळांवर हवाईहल्ले करण्यात येत होते.

शांतता वाटाघाटी करणारे कतार आणि पाकिस्तान तटस्थ नसून, दोन्ही देश इस्त्रायलच्या विरोधात सक्रिय आहेत. कतारकडे अल- जझिरा ही अरब जगतातील सर्वांत प्रभावी वृत्तवाहिनी असल्यामुळे ते असे चित्र निर्माण करत आहेत की, इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू युद्धखोर असून, अमेरिका आणि इराणमध्ये युद्धविराम होऊ नये म्हणून ते लेबेनॉनमध्ये जाणीवपूर्वक लढाई सुरू ठेवत आहेत. नेतान्याहूंच्या या युद्धखोरीचा संपूर्ण जगाला त्रास होत आहे. अशाप्रकारच्या वार्तांकनाचा प्रभाव होऊन डोनाल्ड ट्रम्प आणि जे. डी. वान्स यांनी सार्वजनिक व्यासपीठावरून इस्त्रायलची कानउघाडणी केली. ट्रम्प म्हणाले की, अमेरिका इस्त्रायलच्या सुरक्षेसाठी कटिबद्ध असून, अमेरिकेचे उद्दिष्ट आखातातील युद्ध थांबवणे हा आहे. एका वक्तव्यात त्यांनी सीरिया लेबेनॉनमधील हिजबुल्लावर नियंत्रण राखू शकेल, असे म्हटले. सीरियात अल कायदाचा सदस्य असलेले अहमद हुसेन अल शरा अध्यक्ष असून, त्यांना लेबेनॉन सांभाळायला सांगणे म्हणजे, चोरांच्या हातात तिजोरीच्या चाव्या देण्यासारखे आहे.

अमेरिकेच्या भूमिकेवरून इस्त्रायलमधील अनेक पत्रकारांनी, तसेच नेतान्याहूंच्या सरकारमधील काही मंत्र्यांनी स्पष्ट शब्दांमध्ये नाराजी व्यक्त केली. त्यांचा समाचार घेताना जे. डी. वान्स यांनी इस्त्रायलची लोकसंख्या अवघी ९० लाख असून, महत्त्वाच्या देशांमध्ये अमेरिका हा इस्त्रायलचा एकमेव मित्रदेश आहे, असे वक्तव्य केले. ते म्हणाले की, नेतान्याहूंच्या मंत्रिमंडळातील काही सदस्यांनी ट्रम्प यांच्या युद्धविरामाच्या निर्णयावर सार्वजनिक टीका करणे टाळायला हवे.

अमेरिका हा इस्त्रायलचा सर्वांत जवळचा मित्रदेश. दि. १४ मे १९४८ रोजी इस्त्रायलने स्वातंत्र्य घोषित केले असता, अमेरिकेने त्याला सर्वांत पहिला पाठिंबा दिला. १९६७ साली इस्त्रायलने सहा दिवसांत पाच अरब देशांचा पूर्ण पराभव करेपर्यंत अमेरिका अरब देश आणि इस्त्रायल यांच्यातील संबंधांमध्ये समन्वय राखण्याचा प्रयत्न करत होता. पण, १९६७ सालच्या युद्धानंतर इस्त्रायल पश्चिम अशियातील सर्वांत बलाढ्य देश बनला. दुसरीकडे सगळ्यात मोठा अरब देश म्हणून ओळख असलेला इजिप्त पूर्णपणे सोव्हिएत रशियाच्या प्रभावाखाली आला. तेव्हापासून अमेरिका इस्त्रायलच्या पाठीशी अतिशय ठामपणे उभा राहिला.

अमेरिकेची सर्वांत अद्ययावत शस्त्रास्त्रे इस्त्रायलला मिळतात. अमेरिका आणि इस्त्रायल एकत्र अनेक प्रकारच्या शस्त्रास्त्रांची निर्मिती करतात. दोन्ही देशांमध्ये अतिशय संवेदनशील माहितीची देवाणघेवाण होते. इस्त्रायलविरोधात संयुक्त राष्ट्रांच्या सुरक्षा परिषदेत कोणताही ठराव आल्यास अमेरिका त्याला विरोध करताना आपला नकाराधिकार वापरते. अमेरिकेत रिपब्लिकन किंवा डेमॉक्रॅटिक अशा कोणत्याही पक्षाची सत्ता असली, तरी त्याचे इस्त्रायलला समर्थन असते. अमेरिका आणि इस्त्रायलमधील संबंध भविष्यातही चांगले राहणार असले, तरी अमेरिकेच्या देशांतर्गत राजकारणाचा आपल्याला फटका बसू शकतो, याची इस्त्रायलला जाणीव झाली आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर युरोपचा युद्धज्वर कमी झाला. २१ व्या शतकाच्या सुरुवातीपासून युरोपची स्वसंरक्षणासाठी युद्ध लढण्याची इच्छाशक्तीही नाहीशी झाली आहे. गेल्या काही वर्षांत अनेक युरोपीय देशांनी संरक्षणावरील खर्च वाढवला असला, तरीही युद्ध लढणे ही त्यांच्यासाठी अवघड गोष्ट आहे. आता गोष्ट घडताना दिसत आहे. पारंपरिकरीत्या अमेरिकेतील रिपब्लिकन पक्षाचा अमेरिकेने जगाच्या भल्यासाठी लष्करी हस्तक्षेप करण्यास पाठिंबा असतो. पण, अफगाणिस्तान आणि इराकमध्ये हात पोळल्यानंतर रिपब्लिकन पक्षातही युद्धविरोधी वातावरण निर्माण झाले आहे. त्यामुळे भविष्यात आपल्याला एकट्याला लढावे लागेल किंवा अमेरिकेच्या सोबत लढल्यास युद्धाची उद्दिष्टे पूर्ण व्हायच्या आतच अमेरिकेच्या दबावाखाली ते थांबवावे लागेल, अशी भावना इस्त्रायलच्या लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यामुळे इस्त्रायलला अमेरिकेवरील लष्करी अवलंबित्व कमी करणे आवश्यक आहे.

इस्त्रायल आज लष्करीदृष्ट्या ब्रिटन आणि फ्रान्सच्या ताकदीचा, काही बाबतीत त्यांच्या पुढे गेलेला देश आहे. पण, इस्त्रायल हा दोन जिल्ह्यांच्या आकाराचा देश आहे. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या बाबतीत इस्त्रायल खूप प्रगत असला, तरी त्याची उत्पादन करण्याची क्षमता मर्यादित आहे. (पान ४ वर)

**भूकंपात ज्याप्रमाणे लहान-मोठ्या इमारती कोसळतात, त्याप्रमाणे राजकीय भूकंपामुळेही राजकीय पक्षरूपी इमारती कोसळतात. महाराष्ट्रात उबाठा सेनेची इमारत पूर्वीच कमकुवत झाली होती. सचिन अहिर यांच्या उपसभापती होण्याच्या झटक्याने ती आता कोलमडण्यास प्रारंभ झाला आहे. ज्यांना आपल्याच पक्षात काय चालू आहे, त्याची कल्पना नसते; त्यांनी दुसऱ्या पक्षातील घडामोडींवर, कथित षड्यंत्रांवर भाष्य करणे हे सर्वस्वी हास्यास्पदच!**

# उबाठा सेनेची ढासळती इमारत!

राजकारण | प्रतिनिधी

व्हेनेझुएलामध्ये नुकत्याच झालेल्या भीषण भूकंपात अनेक इमारती कोसळल्या. पण, महाराष्ट्रातही भूकंप झाला असून, त्यामुळे निदान एक इमारत आता ढासळण्याच्या बेतात आहे. अर्थात, हा नैसर्गिक भूकंप नसून राजकीय भूकंप आहे आणि त्याच्या झटक्याने उबाठा सेना नावाची इमारत ढासळण्यास प्रारंभ झाला आहे. या गटाचे तीन आमदार विधान परिषदेत आहेत. त्यांपैकी सचिन अहिर या आमदाराने अचानकपणे विधान परिषदेच्या उपसभापतीपदासाठी आपला अर्ज शिवसेनेतर्फे (शिंदे सेना) भरल्याने व बिनविरोध उपसभाती बनल्याने उबाठा सेनेला जोरदार धक्का बसला आहे. अहिर यांनी हा अर्ज भरल्यानंतरच त्यांनी उबाठा सेनेला रामराम ठोकल्याचे सर्वांना समजले. आता परिषदेतील उर्वरित दोन आमदार काय करतात, त्याची प्रतीक्षा आहे. त्यातील सुनील शिंदे हे ही शिंदेंच्या गळाला लागल्याचे बोलले जात आहे.

उबाठा सेनेच्या लोकसभेतील नऊपैकी सहा खासदारांनी नुकताच शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला होता. त्यापाठोपाठ आता उबाठा सेनेच्या विधान परिषदेतील तीनपैकी एका आमदाराने म्हणजे, सचिन अहिर यांनी आता शिंदे सेनेत प्रवेश केला आहे. अहिर हे शिंदे यांच्या शिवसेनेत जाणार असल्याची गंधवार्ताही कोणाला नव्हती. उध्दव ठाकरे यांना तर ते मुख्यमंत्री असताना- ही आपले ४० आमदार आपल्याला सोडून गुवाहाटी येथे जात असल्याची काही खबर नव्हती. त्यामुळे अहिर यांच्याबाबत ते बेसावध राहिले, तर त्यात नवल नव्हे. पण, अहिर यांच्या पक्षांतराने उबाठा सेनेला घरघर लागली असून, आता त्या गटाचे विधानसभेतीलही काही आमदार शिंदे यांच्या सेनेत किंवा भाजपमध्ये गेल्यास नवल वाटू नये. कारण, मुळात उबाठा सेना हा पक्षच अनैतिक आणि अनैसर्गिक पायावर उभा होता. केवळ सत्तेच्या गोंदाने तो एकत्र टिकला होता. आता सत्ता गेल्यानंतर या गटाचे प्रयोजनच संपुष्टात आले आहे. त्या गटात आता फक्त उद्धव व आदित्य ठाकरे आणि संजय राऊत हेच शिल्लक राहतील, असे दिसते. सचिन अहिर हे वरळी येथून परिषदेवर निवडून गेले आहेत. वरळीचे विधानसभेचे आमदार हे स्वतः आदित्य ठाकरे. त्यामुळे आपल्याच मतदारसंघातील एक मोठा नेता आपल्याला सोडून जात असल्याचे आदित्य ठाकरे यांना पाहावे लागते. अर्थात, त्याबद्दल त्यांना काही खंत वाटत असेल, याची शक्यता कमीच. त्यांना सर्वकाही आयतेच मिळाले असल्याने आपल्या पक्षाचे कार्यकर्ते आणि नेते यांचे महत्त्व जाणवतच नाही. अशाच एकेका कार्यकर्त्याला जोडून बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेचा वृक्ष उभा केला होता. (पान ४ वर)





**भारतात रिझर्व्ह बँकेने काही वर्षांपूर्वी प्रायोगिक तत्त्वावर १० रुपयांच्या प्लास्टिक नोटा चलनात आणण्याची घोषणा केली होती; मात्र कोणत्याही मोठ्या आर्थिक बदलाप्रमाणेच या निर्णयाकडेही दोन वेगवेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जात आहे. हा बदल सुरक्षित, टिकाऊ आणि आधुनिक चलनव्यवस्थेकडे टाकलेले पाऊल आहे की केवळ एक 'अनावश्यक आणि महागडा खर्च' आहे, या प्रश्नाचा वेध घेणे अत्यंत गरजेचे आहे.**

# चलनाचा बदलता चेहरा

लक्ष्यवेध | कैलास ढोले

मानवी संस्कृतीच्या विकासासोबतच चलनाचे स्वरूपही सातत्याने बदलत गेले. वस्तुविनिमय पद्धतीपासून सुरू झालेला हा प्रवास धातूची नाणी, कागदी नोटा आणि आजच्या डिजिटल युगात प्लास्टिक मनी (क्रेडिट/ डेबिट कार्डस्) आणि डिजिटल चलनापर्यंत येऊन पोहोचला आहे; मात्र या सगळ्या प्रवासात प्रत्यक्ष हाताळल्या जाणार्या चलनी नोटांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक स्तरावर आणि भारतातही एका नव्या तंत्रज्ञानाची जोरदार चर्चा सुरू आहे; ती म्हणजे पॉलिमर म्हणजेच प्लास्टिक नोटा. कागदी नोटांना पर्याय म्हणून प्लास्टिक नोटा आणणे, हा जागतिक अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा प्रयोग मानला जात आहे. सध्या आपण वापरत असलेल्या चलनी नोटा १०० टक्के कागदाच्या नसतात, तर त्यात कापूस आणि अंबाडी यांच्या धाग्यांचे मिश्रण असते. असे असले तरी, या नोटांची एक ठरावीक मर्यादा असते. त्या लवकर फाटतात, पाण्यात भिजल्यास खराब होतात आणि सततच्या हाताळणीमुळे मळतात.



एका अंदाजानुसार, भारतात दरवर्षी अब्जावधी रुपयांच्या मळकट आणि फाटलेल्या नोटा चलनातून बाद कराव्या लागतात आणि त्यांच्या जागी नव्या नोटा छापाव्या लागतात. हा दरवर्षी होणारा एक मोठा आर्थिक भुर्दंड आहे. या समस्येवर मात करण्यासाठी १९८८ मध्ये ऑस्ट्रेलियाने जगात सर्वप्रथम पॉलिमर (एक प्रकारचे प्लास्टिक) नोटा चलनात आणल्या. त्यानंतर कॅनडा, ब्रिटन, न्यूझीलंड, रोमानिया आणि व्हिएतनाम यांसारख्या ३० पेक्षा अधिक देशांनी प्लास्टिक नोटांचा पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकार केला. हा जगभरातील ट्रेंड पाहता, भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या आणि अफाट चलन हाताळणी असलेल्या देशात प्लास्टिक नोटांचा पर्याय कितपत योग्य ठरेल, याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे.

प्लास्टिक नोटांचे समर्थक आणि मध्यवर्ती बँका यांचा या तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत स्पष्ट आणि व्यावसायिक आहे. कागदी नोटांच्या तुलनेत प्लास्टिक नोटांवर अधिक प्रगत आणि गुंतागुंतीची सुरक्षा वैशिष्ट्ये विकसित करता येतात. यात पारदर्शक खिडकी, बदलणारे रंग आणि होलोग्रामचा अत्यंत प्रभावीपणे वापर करता येतो. प्लास्टिक नोटांची हुबेहूब नक्कल करणे आंतरराष्ट्रीय बनावट टोळ्यांसाठी अत्यंत कठीण आणि खर्चिक असते. भारतासारख्या देशाला शेजारील देशांतून होणाऱ्या बनावट नोटांच्या तस्करांचा मोठा फटका बसतो. या पार्श्वभूमीवर प्लास्टिक नोटा देशाच्या आर्थिक सुरक्षेसाठी कवच ठरू शकतात. प्लास्टिक नोटांचे आयुष्य कागदी नोटांच्या तुलनेत किमान चार ते पाच पटीने जास्त असते. त्या सहज फाटत नाहीत, चुरगळत नाहीत आणि चुकून कपड्यांसोबत वॉशिंग मशीनमध्ये गेल्या तरी जशाच्या तशा राहतात. भारतासारख्या उष्ण आणि दमट हवामानाच्या देशात प्लास्टिक नोटा मैलाचा दगड ठरू शकतात. कागदी नोटा जशा जुन्या होतात, तशा त्या जीवाणू आणि विषाणूंचे वाहक बनतात. कोरोना महामारीच्या काळात नोटांमधून संसर्ग पसरण्याचा धोका समोर आला होता. पॉलिमर नोटांचे पृष्ठभाग सच्छिद्र नसल्यामुळे त्यावर घाण, तेल किंवा पाणी टिकत नाही. त्या सहज पुसून स्वच्छ करता येतात. त्यामुळे सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने त्या अधिक सुरक्षित मानल्या जातात.

### पर्यावरणपूरक ठरणार प्लास्टिक नोटाः-


प्लास्टिक नोटा कागदी नोटांच्या तुलनेत पर्यावरणपूरक ठरू शकतात. कागदी नोटा खराब झाल्यावर जाळाव्या किंवा नष्ट कराव्या लागतात. (पान ४ वर)

## नोटा निसरड्या असल्याने अडचणींशी सामना



नोटाबंदीच्या काळात (२०१६) एटीएम बदलताना झालेला खर्च आणि गोंधळ देशाने अनुभवला आहे. हा पुन्हा एकदा बँकिंग यंत्रणेवर आलेला अतिरिक्त ताण असेल. प्लास्टिक नोटा दिसायला चांगल्या असल्या, तरी हाताळताना नागरिकांना अनेक अडचणी येतात. या नोटा अधिक घसरड्या असतात. त्यामुळे त्या मोजताना किंवा खिशातून काढताना पडण्याची शक्यता असते. तसेच, एकदा या नोटांना मोठी घडी पडल्यास पुन्हा सपाट होत नाहीत. भारतीय नागरिक प्रामुख्याने नोटांची घडी घालून पाकिटात किंवा खिशात ठेवतात. ही पद्धती अडचणीची ठरेल. भारत जागतिक स्तरावर डिजिटल पेमेंटमध्ये आघाडीवर आहे. भाजी विक्रेत्यापासून मोठ्या मॉलपर्यंत प्रत्येक ठिकाणी 'क्यूआर कोड' द्वारे व्यवहार होत आहेत. ई- रूपी सारखी सेंट्रल बँक डिजिटल करन्सीदेखील प्रायोगिक तत्त्वावर सुरू झाली आहे. देशाची अर्थव्यवस्था झपाट्याने कॅशलेस किंवा लेस कॅशकडे जात असताना भौतिक चलनाचा चेहरा बदलण्यासाठी हजारो कोटी रुपये खर्च करणे कितपत शहाणपणाचे आहे? हा खर्च पूर्णपणे अनावश्यक वाटू लागतो. भारताची भौगोलिक आणि लोकसंख्याशास्त्रीय स्थिती जगातील इतर देशांपेक्षा वेगळी आहे. कॅनडा किंवा ऑस्ट्रेलियासारख्या कमी लोकसंख्या असलेल्या देशांमध्ये प्लास्टिक नोटा यशस्वी झाल्या. कारण तिथे चलनाची हाताळणी मर्यादित आहे. भारतात मात्र चलनाचा वेग प्रचंड आहे.

# व्यापारासाठी सुरक्षितता, विद्येसाठी स्वतंत्रता!




**जगातील पहिल्या विमान निर्मितीचे श्रेय दिले जाते ते अमेरिकेतील राईट बंधूंना. पण, जगातील पहिल्यावहिल्या हेलिकॉप्टरचा शोध कुणी लावला, या प्रश्नाचे उत्तर मात्र तितक्या सहजपणे देता येत नाही. कारण, ज्या माणसाने पहिल्यांदा हेलिकॉप्टर बनविले, तो जन्माने रशियन - युक्रेनियन असला तरी कर्माने अमेरिकन. अशा या इगोर सिकोर्स्कीची ही कहाणी...**



विश्वसंचार **मल्हार कृष्ण गोखले**

इसवी सनाच्या १७ व्या शतकात मुघल साम्राज्य हे भारतातले सर्वात मोठे राज्य होते. त्याची राजकीय राजधानी दिल्ली-आग्रा असली, तरी आर्थिक राजधानी होती सुरत. मुघल बादशाहीच्या खजिन्यातला महसुलाचा मोठा हिस्सा, सुरतेच्या बंदरातून चालणाऱ्या देशी-विदेशी व्यापारातून निर्माण होत होता. पश्चिमकिनारपट्टीवर मुघलांच्या खालोखाल मोठे राज्य होते ते आदिलशहाचे. त्याचीही राजकीय राजधानी होती शहर विजापूर; पण आर्थिक राजधानी होती, कोकण किनार्यावरचे दाभोळ. सन १६५९ साली अफजलखानाला ठार केल्याबरोबर तातडीने शिवरायांनी दाभोळ जिंकले, ते उगीच नव्हे.

सन १६६४ आणि १६७० अशी दोनवेळा शिवरायांनी बलाढ्य मुघल सत्तेची आर्थिक राजधानी सुरत साफ लुटली. याचा चटका इतर कुणाला किती जाणवला असेल, नसेल; पण इंग्रजांना फारच जाणवला. सन १६६२ साली मुंबई बेट इंग्रजी राजाच्या ताब्यात आले. सन १६६८ साली राजाने ते 'ईस्ट इंडिया कंपनी'ला भाडेपट्ट्याने दिले. सन १६६९ साली जेराल्ड अँजियर हा अत्यंत हुशार आणि दूरदर्शी इसममुंबईचा गव्हर्नर झाला. शिवाय, त्याच्याकडे सुरतेच्या मुख्य वखारीचे अध्यक्षपदही होतेच. तेवढ्यात म्हणजे १६७० साली शिवरायांनी सुरत दुसर्यांदा लुटली. तेव्हा अँजियरने मनाशी पक्की खूणगाठ बांधली की, आता आपला मुख्य व्यापार सुरतेहून मुंबईला हलवायचा.

कशी होती यावेळी मुंबईची स्थिती? मुंबईच्या उत्तरेला वांद्रे-कुर्ले ते वसई- ठाणे या भागात पोर्तुगीजांची प्रबळ आरमारी सत्ता होती. मुंबईच्या दक्षिणेला जंजिरेकर सिद्दीची प्रबळ आरमारी सत्ता होती. मुंबईच्या पश्चिमेला अफाट समुद्र होता. मुंबईच्या पूर्वेला उल्हास नदीच्या खाडीने बनलेला; पण अतिशय सुरक्षित, खोल समुद्र होता नि या समुद्रापलीकडे पनवेलपासून थेट मालवणपर्यंत शिवरायांचे राज्य होते.

पोर्तुगीज आणि सिद्दी हे आरमारीदृष्ट्या जसे प्रबळ होते, तसेच ते कमालीचे धर्मांध होते. हिंदूंची गावे लुटणे, जाळणे, कत्लेआमकरणे आणि मनसोक्त बाटवाबाटवी करणे, हे त्यांचे अत्यंत आवडते छंद होते. त्यामुळे मुंबईच्या भोवतालची कोकणपट्टी सततच्या लढायांनी नुसती गांजून गेली होती. सुरतेला मुघली अधिकारी हे भयंकर भ्रष्ट होते. लाच खाल्ल्याशिवाय ते कोणतेही कामकरीत नसत.

जेराल्ड अँजियर हा मुळात एका प्रोटेस्टंट पाद्याचा मुलगा होता. पण, त्याच्या व्यापारी इंग्लिश रक्ताने त्याला अचूक संधी दाखवली. त्याने मुंबईचा गव्हर्नर या नात्याने एक जाहीरनामा काढला आणि तो पोर्तुगीज, सिद्दी, मराठे, मुघल, आदिलशहा अशा सर्व शेजारी सत्तांच्या मुलखातल्या व्यापाऱ्यांपर्यंत पोहोचेल, असे पाहिले. या जाहीरनाम्याचा आशय असा होता की, 'आता मुंबईवर आमचे राज्य आहे. आम्ही व्यापारी लोक आहोत. तुम्ही धर्माने कुणीही असा. आमच्या राज्यात या आणि सुखाने व्यापार करा. आम्ही तुमच्या धार्मिक बाबतीत अजिबात ढवळाढवळ करणार नाही. आम्ही तुमच्या व्यापाराला संपूर्ण संरक्षण आणि उत्तेजन देऊ. मुंबईत या. शांतपणे व्यापार करा. तुम्ही मोठे व्हा नि आम्हालाही मोठे करा.'

मुंबईच्या आर्थिक राजधानी बनण्याची ही सुरुवात होती. व्यापार-उदीमवाढूनच राज्याचा खजिना समृद्ध होत असतो आणि तो वाढण्यासाठी व्यापारी वर्गाला हवी असते शांतता आणि सुरक्षिततेची हमी! हे अँजियरला कळले. छत्रपती शिवरायांना, संभाजीराजांना चिमाजी अप्पांना आणि माधवरावांनादेखील हे कळत होते. पण, नियतीने बिचार्यांना आयुष्यच इतके कमी दिले की, आपल्या साम्राज्यातल्या सगळ्याच राज्याची आर्थिक बाजू मजबूत करायला त्यांना वेळच मिळाला नाही.

व्यापारवाढीसाठी शांतता आणि सुरक्षितता किती महत्त्वाची असते, याचे एकच ठळक उदाहरण पाहूया. ठाण्याजवळ घोडबंदर नावाचे गाव आहे. ते अर्थातच, पोर्तुगीज मुलखात होते. धार्मिक छळाला गावकरी अगदी कंटाळून गेले होते. अशा स्थितीत मुरकुटे आडनावाच्या एका इसमाने इंग्रजी हद्दीत म्हणजेच मुंबईला स्थलांतर केले. जीवित, वित्त आणि धर्म यांच्या बाबतीत सुरक्षितता मिळाल्यावर मुरकुटे मंडळींनी अनेक प्रकारचा व्यापार सुरू करून अफाट संपत्ती मिळवली. गणबाशेट मुरकुटे यांच्या मुंबईच्या फोर्टमधल्या पेढीवर कायम १७ लाख रुपये रोख ठेवलेले असत. कोणत्याही क्षणी गरज लागल्यास वापरता यावेत म्हणून! लक्षात घ्या, १८व्या शतकातले रोख १७ लाख चांदीचे रुपये, कागदी नोटा नव्हे! गणबाशेट मुरकुटे यांचे पणतू म्हणजे जगन्नाथ शंकरशेठ उर्फ नाना, ज्यांनी भारतात रेल्वे सुरू केली आणि अक्षरशः युगप्रवर्तन केले.

आता आपण भारताच्या सुदूर वायव्येला नजर टाकूया. तो पहा काळा समुद्र. आशिया खंड आणि युरोप खंड यांना विभागणारा सरोवरच आहे आणि तो पाहा त्याच्या उत्तर काठावरचा युक्रेन नामक देश. युक्रेन देश हे अख्ख्या युरोप खंडाचे गव्हाचे कोठार मानले जाते. खरेतर युक्रेन हा वेगळा देश होता. पण, रशियन झार राजांनी तो हळूहळू करत पूर्णपणे गिळला. पण, तसा युक्रेनियन लोकांना कोणताही जाच नव्हता. रशियन लोकांप्रमाणेच ते 'स्लाव्ह' वंशाचे, गोऱ्या कातडीचे नि ग्रीक ऑर्थोडॉक्स चर्चचे अनुयायी होते. फक्त त्यांची भाषा वेगळी होती. पण रशियन झार लोकांचे आपल्या साम्राजातल्या सगळ्याच लोकांना उत्तेजन असे की, त्यांनी पश्चिम युरोपातल्या पुढारलेल्या देशांत जावे. ऑस्ट्रिया, प्रशिया (नंतर जर्मनी), फ्रान्स, इटली इत्यादी देशांमधून भाषा, कला, विज्ञान, तंत्रज्ञान, शिकावे आणि स्वत:बरोबरच साम्राज्यालाही मोठे करावे. म्हणजेच विद्या, विज्ञान, तंत्रज्ञान यांच्या प्रगतीसाठी आवश्यक ते स्वातंत्र्य, वातावरण झार राजांनी आपल्या राजेशाही व्यवस्थेतही आपल्या सगळ्याच नागरिकांना दिले होते.

तर अशा या रशियन साम्राज्यातल्या युक्रेनची राजधानी असलेल्या कीव्ह या शहरात १८८९ साली इगोर सिकोर्स्की हा मुलगा जन्मला. त्याचा बाप इव्हान सिकोर्स्की हा सुप्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ होता आणि त्यानिमित्ताने तो वरचेवर पश्चिम युरोपातल्या नामवंत विद्यापीठांत जात असे. रशियाचे ऑस्ट्रिया आणि फ्रान्सशी जरा जास्त जवळिकीचे संबंध होते. त्यामुळे इव्हान अनेकदा पॅरिसला जात असे. अनेकदा त्याच्या सोबत त्याची स्वतः डॉक्टर असलेली बायको मारिया आणि पाच मुलेदेखील असत. ही मारिया 'लिओनार्दो द विंची' ची अभ्यासक होती. लिओनार्दोची चित्रकला आणि त्यापेक्षाही त्याच्या कागदपत्रांमधील ती मुलांशी खूप संवाद करीत असे. त्यातल्या डोक्यावर पंखा लावून उडणार्या विमानाच्या चित्राने (ज्याला आपण आज हेलिकॉप्टर म्हणतो) छोटा इगोर एकदम भारावून गेला. याच काळात ज्यूल्स व्हर्न या फ्रेंच लेखकाच्या विज्ञान कादंबऱ्यांनी लोकांना वेड लावले होते. ज्यूल्स व्हर्नच्या साहित्यातील अनेक चित्रविचित्र यंत्रे प्रत्यक्षात शोधून काढण्यासाठी युरोप- अमेरिकेतले अनेक वैज्ञानिक जीव तोडून प्रयत्न करीत होते. मोटर कार हे स्वयंचलित वाहन निर्माण करण्यासाठी युरोप आणि अमेरिकेत लागलेली स्पर्धा अमेरिकेने जिंकली होती. आता स्पर्धा सुरू झाली विमान बनवण्यासाठी यातही फ्रेंच आणि जर्मन संशोधक खूप पुढे होते. सन १८७८ साली फ्रेंच संशोधक आल्फोन्स पेनाँ याने एक खेळण्यातले उडणारे हेलिकॉप्टर बनवले. ते मुलांमध्ये आणि मोठ्यांमध्येही खूप लोकप्रिय झाले. अमेरिकेतला एक बिशप मिल्टन राईट याने ते खेळणे आपल्या विल्बर आणि ऑर्विल या मुलांना दिले. खेळता खेळता ते मोडले. ११ वर्षांच्या विल्बरच्या मनात ठिणगी पडली.

(पान ६ वर)


---

पोरकी पोरं **डॉ. तुषार सावरकर**

# मनाच्या सावलीत वाढणारं बालपण

सकाळची वेळ. शाळेसाठी तयार होण्याची घाई सुरू आहे. पण एका घरात १०-१२ वर्षांचं मूल स्वत:ची शाळेची बॅग भरत असताना दुसऱ्या खोलीत शांत पडलेल्या आईला औषधांची आठवण करून देत आहे. वडील अनेक दिवसांपासून घराबाहेर पडलेले नाहीत.

घरात संवाद कमी आहे, चिंता जास्त आहे आणि बालपणापेक्षा जबाबदाऱ्या मोठ्या झाल्या आहेत. बाहेरून हे घर सामान्य दिसतं; पण त्या घरातील मुलाच्या मनात सतत एक अदृश्य संघर्ष सुरू असतो. समाजात मानसिक आजारांविषयी चर्चा वाढत असली, तरी मानसिक आरोग्याच्या समस्यांशी झुंज देणाऱ्या पालकांच्या मुलांबद्दल फार कमी बोललं जातं. ही मुलं अनेकदा कुठल्याही सरकारी यादीत दिसत नाहीत, कोणत्याही विशेष श्रेणीत मोडत नाहीत; पण त्यांच्या बालपणावर मानसिक आजार, सामाजिक कलंक आणि भावनिक असुरक्षिततेची खोल छाया पडत असते.


मानसिक आजारग्रस्त पालकांच्या मुलांचं अदृश्य जग

जगभरातील विविध अभ्यासांनुसार सुमारे १५ ते २३ टक्के मुले अशा पालकांसोबत वाढतात, ज्यांना कोणत्या ना कोणत्या प्रकारचा मानसिक आजार किंवा त्याची लक्षणे आहेत. जागतिक आरोग्य संघटनेच्या निरीक्षणानुसार, आई किंवा वडिलांपैकी एकाला मानसिक आजार असल्यास मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या विकसित होण्याचा धोका १.८ ते २.९ पट वाढतो. जर दोन्ही पालक मानसिक आजाराने ग्रस्त असतील, तर हा धोका २.२ ते ४.६ पट वाढू शकतो. 'वर्ल्ड सायकियाट्री'मध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासानुसार, पालकांमध्ये सायकॉसिस किंवा बायपोलर डिसऑर्डर असल्यास मुलांमध्येही अशा विकारांचा धोका लक्षणीयरीत्या अधिक असतो. मात्र, या आकडेवारीचा अर्थ असा नाही की, अशा पालकांची सर्व मुलं भविष्यात मानसिक आजारांना बळी पडणारच. याउलट, योग्य उपचार, भावनिक आधार आणि स्थिर कौटुंबिक वातावरण मिळाल्यास ही मुले निरोगी आणि सक्षमआयुष्य जगू शकतात. धोका हा अनुवंशिकते इतकाच पर्यावरण, ताणतणाव आणि दुर्लक्षित भावनिक गरजांशीही संबंधित असतो.

मानसिक आजाराचा सर्वात मोठा परिणाममुलांच्या भावविश्वावर होतो. इतर मुलांसाठी आई-वडील हे सुरक्षिततेचं प्रतीक असतात; पण अशा परिस्थितीत वाढणाऱ्या मुलांसाठी घरच कधी कधी अनिश्चिततेचं केंद्र बनतं. आई अनेक दिवस नैराश्यात असल्यामुळे संवाद साधू शकत नाही; वडिलांना तीव्र चिंता विकार असल्यामुळे ते सतत अस्वस्थ असतात किंवा सायकॉसिसमुळे वास्तवाशी संबंध ढासळलेले असतात. अशा परिस्थितीत मुलांना नेमकं काय घडतं आहे, हे समजत नाही; पण काहीतरी बिनसलं आहे, याची त्यांना सतत जाणीव होत राहते. परिणामी अनेक मुलं अकाली प्रौढ बनतात. स्वतःच्या भावना बाजूला ठेवून ते घरातील वातावरण सांभाळण्याचा प्रयत्न करतात. काही मुलं आई- वडिलांच्या औषधांची काळजी घेतात, डॉक्टरांकडे सोबत जातात, घरकामकरतात आणि लहान भावंडांची जबाबदारीही सांभाळतात. आंतरराष्ट्रीय अभ्यासांमध्ये अशा मुलांना 'यंग केयरर्स' म्हणून ओळखलं जातं. काही अंदाजांनुसार अशा मुलांपैकी सुमारे एक तृतीयांश मुले एकाच पालकासोबत वाढतात, त्यामुळे त्यांच्यावर अतिरिक्त भावनिक आणि व्यावहारिक जबाबदाऱ्या येतात. या मुलांच्या मनात सतत भीती, अपराधीपणा आणि गोंधळ असतो. अनेकांना वाटतं की, पालकांच्या आजारासाठी आपणच जबाबदार आहोत. काही मुलं आपल्या मित्रांना घरी बोलावणं टाळतात. काही जण घरात घडणाऱ्या गोष्टींबद्दल कुणाशीच बोलत नाहीत. परिणामी एकटेपणा, चिंता, नैराश्य आणि आत्मविश्वासाचा अभाव यांसारख्या समस्या निर्माण होऊ शकतात. शारीरिक स्तरावरही त्याचे परिणामदिसून येतात. संशोधनात असे आढळले आहे की, अशा मुलांमध्ये डोकेदुखी, पोटदुखी, थकवा किंवा इतर शारीरिक तक्रारींचे प्रमाण अधिक असते. मानसशास्त्रात याला 'सोमॅटायझेशन' असे म्हटले जाते. काही अभ्यासांनुसार अशा लक्षणांचा धोका इतर मुलांच्या तुलनेत अनेक वाढलेला दिसून येतो.

भारतीय संदर्भात या विषयावर थेट राष्ट्रीय आकडेवारी मर्यादित असली, तरी निमहांस (राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि मज्जासंस्था विज्ञान संस्था) इतर संशोधन संस्थांच्या अभ्यासातून काही महत्त्वाचे निष्कर्ष समोर आले आहेत. भारतातील किशोरवयीन मुलांमध्ये मानसिक आरोग्याच्या समस्या ७ ते ३३ टक्क्यांपर्यंत आढळतात आणि कौटुंबिक तणाव हे त्यामागील प्रमुख कारणांपैकी एक आहे. भारतात सुमारे १५ कोटी लोकांना मानसिक आरोग्य सेवांची गरज आहे; मात्र त्यापैकी केवळ १० ते १५ टक्के लोकांपर्यंतच प्रभावी उपचार पोहोचतात. त्यामुळे अनेक पालक दीर्घकाळ उपचारांपासून वंचित राहतात आणि त्याचा परिणामसंपूर्ण कुटुंबावर होतो. भारतीय समाजात मानसिक आजारांविषयी असलेला कलंक ही आणखी एक गंभीर समस्या आहे. 'लोक काय म्हणतील?', 'हे बाहेर कळू नये', 'हे काही वेडेपणाचं नाही' अशा विचारांमुळे अनेक कुटुंबं उपचार घेण्यास उशीर करतात. त्याचा सर्वात मोठा फटका मुलांना बसतो. कारण आजारापेक्षा अधिक वेदनादायक ठरते ती शांतता आणि न बोललेलं दुःख. मात्र, या चित्रात आशेचे काही किरणही आहेत. भारतीय संयुक्त कुटुंब व्यवस्थेवर झालेल्या काही अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, आजी- आजोबा, काका, मावशी किंवा इतर नातेवाईकांचा आधार मिळाल्यास मुलांवरील मानसिक परिणामतुलनेने कमी होतात. म्हणजेच एखाद्या पालकाला मानसिक आजार असला, तरी प्रेमळ आणि आधार देणारं वातावरण मुलांसाठी संरक्षक घटक ठरू शकतं.

या प्रश्नाकडे केवळ वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहून चालणार नाही. हा बालहक्क, सार्वजनिक आरोग्य आणि सामाजिक न्यायाचा विषय आहे. शाळांमध्ये समुपदेशन सेवा मजबूत करणे, मानसिक आरोग्य सेवांचा विस्तार करणे, पालकांसाठी कौटुंबिक समुपदेशन उपलब्ध करून देणे आणि मुलांना त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित जागा निर्माण करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर मानसिक आजार असलेल्या पालकांकडेही करुणा आणि सन्मानाने पाहणे महत्त्वाचे आहे.

मानसिक आजार हा चारित्र्यदोष नाही, तर उपचार करता येणारा आरोग्यविषयक प्रश्न आहे. अशा पालकांना दोष देण्याऐवजी त्यांना आधार देणं आणि उपचार उपलब्ध करून देणं ही जबाबदारी आहे. कारण प्रत्येक मूल फक्त अन्न, कपडे आणि शिक्षणाने वाढत नाही; ते भावनिक सुरक्षिततेवरही वाढत असतं. आणि जेव्हा एखादं मूल आपल्या आई-वडिलांच्या मनातील अंधार समजून घेण्याचा प्रयत्न करत स्वत:चं बालपण शांतपणे बाजूला ठेवतं, तेव्हा तो केवळ एका कुटुंबाचा प्रश्न राहत नाही तर तो संपूर्ण समाजाच्या संवेदनशीलतेची परीक्षा बनतो.

(पान ६ वर)

---

समाजभान **डॉ. चंद्रशेखर जोशी**



# स्त्री भ्रूणहत्या : समाजाला लागलेला कलंक

स्त्रिला देवीचे स्थान देणारा आपला समाज आज स्त्री भ्रूणहत्येसारख्या अमानुष कृत्यामुळे कलंकित होत आहे. भ्रूणहत्या ही केवळ एका जिवाची हत्या नसून मानवतेची हत्या ठरू लागली आहे. या स्त्री भ्रूणहत्येमागे अनेक सामाजिक व मानसिक कारणे आहेत.

पूर्वीपासून समाजात मुलगा हा वंशाचा दिवा मानला जातो तर मुलगी ही परक्याचे धन. समाजातील कुप्रथा, नैतिक अधःपतन यांमुळे अनेक कुटुंबे मुलगी नको अशी भावना बाळगतात. समाजातील वाढत्या हुंडाप्रथेमुळे मुलगी म्हणजे कुटुंबात आर्थिक भार वाटते. दरवर्षी शेकडो सुनांचा हुंड्यासाठी बळी जातो. स्त्री भ्रूणहत्येमुळे समाजातील स्त्री- पुरुष प्रमाण बिघडत आहे. मुलींची संख्या कमी होत असल्याने अनेक सामाजिक समस्या निर्माण होत आहेत. दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण कमी होत आहे.

काही संशोधनांनुसार भारतात दरवर्षी अंदाजे ४ ते ५ लाख स्त्री भ्रूणहत्या होतात. एका अभ्यासात तर दररोज सुमारे १२०० मुलींचे गर्भ नष्ट होऊ शकतात, असा अंदाज व्यक्त केला गेला आहे. समाजातील स्त्रियांचे प्रमाण कमी झाल्याने सामाजिक समतोल पूर्णतः ढासळला आहे.

अविवाहित मुलांची संख्या प्रचंड वाढत चालली आहे. यातून सामाजिक गुन्हेगारी वाढत असून एकूणच गुन्हेगारांचे प्रमाण वाढत आहे. स्त्रियांची संख्या कमी झाल्यामुळे महिलांवर होणारे अत्याचार, छेडछाड, घरगुती हिंसा आणि गुन्हे वाढत आहेत. महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये पती नातेवाईकांकडून होणाऱ्या छळाच्या घटना सर्वाधिक आहेत.

अशा १४ हजार ३७६ घटना नोंदविल्या आहेत. त्याखालोखाल महिलांचे अपहरण आणि पळवून नेण्याचे १० हजार १४२ गुन्हे, बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत ७ हजार ५०८ गुन्हे आणि महिलांच्या विनयभंगाच्या उद्देश हल्ल्याचे ४,६७१ गुन्हे नोंदविले आहेत.

विवाहासाठी कमतरता निर्माण झाल्यामुळे काही किंवा ठिकाणी मुलींना पळवून नेणे, जबरदस्तीने विवाह लावणे अशा घटना वाढत आहेत. काही ठिकाणी मुलींचे बालविवाह लावण्यात येत आहे. महाराष्ट्रात २०२४ आणि २०२५ या दोन वर्षांच्या कालावधीत महिला आणि अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याचे प्रमाण चिंताजनक असून राज्य सरकारकडून मिळालेल्या माहितीनुसार ही संख्या मोठी आहे.

२०२४ आणि २०२५ मध्ये राज्यात एकूण १,१७,३६९ महिला व अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्याची नोंद झाली आहे. २०२४ मध्ये सुमारे ११,३१६ अल्पवयीन मुली बेपत्ता झाल्या होत्या. २०२५ मध्ये ही संख्या वाढून १२, ११३ (काही ठिकाणी १३, ११३ असाही उल्लेख आहे) इतकी झाली. यापैकी बर्याच मुली पोलिसांच्या अथक प्रयत्नामुळे शोधून संबंधित पालकांच्या ताब्यात देण्यात आल्या.

स्त्री- पुरुष प्रमाण बिघडल्यामुळे समाजात अनेक सामाजिक समस्या निर्माण होतात. मुलींची संख्याच कमी झाल्याने अविवाहित मुलांची संख्या वाढली; त्यातच अविवाहित मुलींच्या लग्नाबाबतच्या अपेक्षा वाढल्याने व त्यांना त्यांच्या अपेक्षेनुसार जोडीदार न मिळाल्याने अलिकडे मुलीही बर्याच प्रमाणावर अविवाहित राहू लागल्या आणि या सर्व प्रकारातून भारतीय कुटुंब पद्धती भविष्यात कशी अस्तित्वात राहील, हा यक्ष प्रश्न निर्माण झाला आहे.

स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कठोर कायदे, गर्भलिंग तपासणीवर नियंत्रण, जनजागृती आणि स्त्री शिक्षण अत्यंत आवश्यक आहे.

सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' सारख्या योजना सुरू केल्या आहेत. परंतु केवळ कायदे करून हा प्रश्न सुटणार नाही. समाजाची मानसिकता बदलणे गरजेचे आहे. प्रत्येकाने मुलगा आणि मुलगी यांना समान मानले पाहिजे.

आज अनेक क्षेत्रांत महिलांनी आपली कर्तबगारी सिद्ध केली आहे. शिक्षण, विज्ञान, क्रीडा, राजकारण, सैन्य, अवकाश संशोधन अशा सर्वच क्षेत्रांत स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून कार्य करत आहेत.

भारतातील पहिल्या डॉक्टर आनंदीबाई जोशी, सावित्रीबाई फुले, कल्पना चावला, मॅरी कॉम, इंदिरा गांधी, सुषमा स्वराज यांसारख्या महिलांनी जगभर भारताचे नाव उज्ज्वल केले आहे. स्त्री हीच सृष्टीची निर्माती आहे.

तिचे रक्षण करणे, संवर्धन करणे व तिला योग्य संधी देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. स्त्री भ्रूणहत्या थांबवूनच आपण सुसंस्कृत आणि प्रगत समाज निर्माण करू शकतो.

वळणावरच्या नोंदी

स्वाती काळे

# युआन च्वांगने पाहिलेली नालंदा



युआन च्वांग मजल दरमजल करीत 'कन्याकुन्ज'ला म्हणजे आत्ताच्या 'कनौज'ला पोहोचला. या गावाच्या प्राचीन नावाची त्याने मजेशीर गोष्ट सांगितली आहे. येथे 'ब्रह्मदत्त' नावाचा चारित्र्यवान राजा राज्य करायचा. त्याच्या राज्यात गंगा नदीतीरी राहणारा एक ऋषी घनघोर तपश्चर्येमुळे एक जीर्ण वटवृक्ष झाला होता. त्याच्या फांद्यांवर खेळणाऱ्या पक्ष्यांनी एकदा ऋषीच्या अंगावर 'न्याग्रोध' फळ टाकले. ते फळ हळूहळू वाढू लागले आणि त्या आधारावरच तो तेजःपुंज ऋषी आता जगू लागला. हजारो वर्षांनी समाधीतून जागा झाल्यावर सभोवताली पसरलेल्या महावृक्षाच्या जाळ्यातून त्याला बाहेर यावेसे वाटले. पण वृक्षावरच्या घरट्यांनी काय करावे! त्यामुळे तो बाहेर पडला नाही. त्याला आता 'महावृक्ष ऋषी' असे नाव पडले. एकदा या महावृक्ष ऋषींनी गंगातीरी विहरणाऱ्या राजकन्यांना पाहिले आणि त्याची तपश्चर्या भंगली. त्याने ब्रह्मदत्त राजाला आपल्या मनातली मनीषा बोलून दाखवली.

ब्रह्मदत्त राजाने घडलेली घटना राजकन्यांना सांगितली आणि नकार दिला तर होणारे परिणाम गंभीर होतील, असेही सांगितले. सर्व राजकन्यांनी नाके मुरडली, पण सर्वात धाकटी राजकन्या वडिलांच्या प्रेमाखातर तयार झाली. राजा खूश होऊन या राजकन्येसोबत महावृक्ष ऋषींकडे गेला; पण इतर राजकन्या न आल्यामुळे 'महावृक्ष ऋषी' खवळले. त्याने राजाला शाप दिला की, त्याच्या कन्या कुब्जा होतील, कुरूप होतील. तेव्हापासून या नगरीचे नाव 'कन्याकुन्ज' पडले.

युआन च्वांग सहाव्या शतकात जेव्हा या नगरीत पोचला तेव्हा तेथे 'हर्ष' राजाचे राज्य होते. कन्याकुब्ज (आत्ताचे कनौज) राजा हर्षवर्धनाची राजधानी होती. युआन तेथे इ. स. ६३७ साली राजा हर्षवर्धनच्या सुवर्णकाळात पोहोचला. त्याचे साम्राज्य उत्तर-पश्चिम बंगालच्या पूर्व भागापासून ते पश्चिमपंजाबच्या बियास नदीपर्यंत पसरलेले होते. पाचव्या शतकात गुप्त घराणे लयाला गेल्यावर पहिल्यांदाच हर्षाने आपले बस्तान बसवून उत्तर भारतात सुखसमृद्धी आणली होती. बौद्ध धर्म आणि हिंदू धर्म दोन्हींचा सुरेख मिलाफ हर्षाने घडवून आणला.

हर्षाची राजधानी 'कन्याकुब्ज' भरभराटीला आलेले समृद्ध शहर होते. बगीचे आणि तलावांची या नगरीत रेलचेल होती. नागरिक उच्चविद्याविभूषित होते. हर्षाचा सख्खा भाऊ राज्यवर्धनला बंगालमधल्या कर्णसुवर्ण देशाच्या शशांक राजाने कपटाने मारले होते. हर्षाने अनेक युद्धमोहिमा हाती घेतल्या आणि त्या यशस्वी करून दाखवल्या. युद्धमोहिमा संपल्यानंतर ३० वर्षे त्याने सुखाने राज्य केले. संघाराम आणि स्तूप बांधले. हिंदू आणि बौद्ध धर्म दोन्हींना सारखाच न्याय दिला. नागरिकांसाठी धर्मशाळा बांधल्या. गावोगावी वैद्य नेमले. युआन हर्षाबद्दल अतिशय आदराने लिहिले आहे. आश्चर्य म्हणजे हर्षालासुद्धा चीनचा उदार राजा, तायझोंगबद्दल माहिती होती.

युआनने हर्षाला सांगितले, 'चीनच्या राजाने कर कमी केलेत. शिक्षा कमी केल्या आहेत. आता देशामध्ये अतिरिक्त उत्पन्न आहे आणि कोणीही कायदा मोडण्याचा प्रयत्न करत नाही. 'यावर हर्षाने उत्तर दिले, 'अतिशय उत्तम! तुमच्या देशातील नागरिकांनी नक्कीच चांगले कर्म केले असले पाहिजे. त्यामुळेच एवढा चांगला राजा तुम्हाला लाभला.' ही भेट चीनचे टँग राज्य आणि भारत यांच्या परराष्ट्रीय संबंधांची पायाभरणीच म्हणावी लागेल.

युआन चीनला परत गेल्यानंतरसुद्धा त्याने भारत आणि चीनच्या परस्पर संबंधांवरती लक्ष ठेवले होते आणि दोन्ही राज्यांना मदत केली होती. अनेक नगरे ओलांडून बोधगयेला पोचल्यावर युआन अतिशय भावुक झाला. बोधि वृक्षाजवळ गेल्यावर त्याला रडू कोसळले. तो म्हणतो, 'जेव्हा गौतमबुद्धाला ज्ञानप्राप्ती झाली तेव्हा या जन्ममृत्यूच्या फेऱ्यांमध्ये मी कुठेतरी अडकलो असेल आणि आता या क्षणी मी येथे आहे. माझ्या अनंत जन्मांच्या पापांच्या भाराने मी आता थकून गेलो आहे.' बोधिवृक्ष या पिंपळ वृक्षाची पाने वर्षभर गळत नाहीत; पण बुद्धाच्या निर्वाणाच्या दिवशी सगळी पाने गळून पडतात आणि दुसऱ्या दिवशी नवीन येतात, असे तो म्हणतो.

भारतात त्याच्या विद्वत्तेचे कीर्ती विजेसारखी पसरली होती. युआन च्वांग नालंदा विश्वविद्यालयात आला तेव्हा तेथील २०० भिक्षू आणि हजारो नागरिक त्याच्या स्वागतासाठी सात योजने पुढे आले. त्याला घेऊन नालंदा विद्यापीठाकडे एक भव्य मिरवणूकच निघाली. मोठमोठे धर्मध्वज फडकत होते. युआनवर छत्र धरले होते. चवऱ्या ढळत होत्या. जागोजागी फुलांची उधळण होत होती. सुगंधी द्रव्यांचा सडा पडत होता. नालंदा विद्यापीठ उत्साहाने फुलून गेले होते. स्वागतसभेसाठी सुशोभित केलेले प्रांगण विद्यार्थ्यांच्या उत्साहाने सळसळत होते. मठाधिपतींच्या शेजारी खास आसनावर युआन विराजमान झाले होते.

आनने नालंदा विद्यापीठाच्या वैभवाचे केलेले वर्णन भारताच्या प्राचीन समृद्धीची ग्वाही देणारे आहे. तो म्हणतो की, नालंदा विद्यापीठाची स्थापना इ. स. पूर्व पहिल्या शतकात झाली होती. विद्यापीठाच्या सर्व इमारती अतिशय नियोजनबद्ध होत्या आणि एकूण ५६ एकर जमिनीवर पसरल्या होत्या. वेगवेगळ्या राजांनी या इमारतींची बांधणी केली होती. यावरून निष्कर्ष काढता येतो की, प्राचीन भारतातील बहुतेक सर्वच राजांना विद्यादानाचे महत्त्व माहिती होते. आचार्य आणि विद्यार्थी मिळून तेथे कमीत कमी १० हजार माणसे असायची.

वेद, तर्कशास्त्र, हेतूविद्या, चिकित्सा, गणित, भूगोल, खगोलशास्त्र, आयुर्वेद, बौद्ध धर्मातले सर्व पंथ, तत्त्वज्ञान, सांख्य व अथर्ववेद अशा अनेक विषयांवर तेथे मार्गदर्शन मिळत असे. प्रवेश घेण्यासाठी संस्कृतचे ज्ञान असणे आवश्यक असायचे. शिक्षणाचा मुख्य भर पुस्तकी ज्ञानावर नसायचा. भाषण, वादविवाद आणि चर्चा अशा माध्यमांतून शिक्षण व्हायचे. वाचनालयांची नावे रत्नसागर, रत्ननिधी आणि रत्नरंजन अशी होती. एक वाचनालय नऊ मजल्यांचे होते. एकाच वेळी १०० वर्ग भरण्याची क्षमता या विद्यापीठामध्ये होती. विद्यापीठाची आर्थिक स्थिती उत्तमहोती. कारण १०० गावांचे उत्पन्न राजा या विद्यापीठाला द्यायचा. विद्यार्थ्यांना भिक्षा मागून पोट भरावे लागायचे नाही. त्यामुळे ते पूर्णवेळ अभ्यासावरच लक्ष केंद्रित करायचे. नालंदा विद्यापीठाचे वर्णन करताना युआन म्हणतो, विद्यापीठाचे मनोरे धुक्यात हरवलेल्या टेकड्यांसारखे दिसतात. येथील निळ्यासावळ्या तळ्यांमध्ये निळी कमळे वाऱ्याच्या झोक्यावर डोलत आहेत. सगळीकडे दाट आमराई आहे.

आमराईच्या सावलीत विद्यार्थी आयुष्याचे गहन तत्त्वज्ञान समजून घेण्यात मग्न झाले आहेत. युआन विद्वान आचार्यांच्या देखरेखीखाली २२ महिने राहिला. संस्कृत, तर्कशास्त्र, व्याकरण, बौद्ध धर्म ग्रंथ अशा अनेक महान ग्रंथांचा त्याने अभ्यास केला. शीलभद्र आचार्यांकडून गुह्यतत्त्वांचे शिक्षण घेतले. नालंदात सखोल चिंतनमनन करून पुढे भावनगर, सुरत, जुनागड करत उज्जैन- महेश्वरपूर मार्गाने तो पार सिंध प्रांतात मुलतानपर्यंत गेला. मुलतानमध्ये सूर्याचे सोन्याची मूर्ती असलेले भव्य देऊळ आहे, असे त्याने लिहून ठेवले आहे. पण इतिहास सांगतो की, या देवळाचा इ. स. १००५ मध्ये महमूद गझनीने पार विध्वंस केला.

एकदा अचानक त्याला स्वप्नात दिसले की, नालंदा विद्यापीठ पूर्णपणे उद्ध्वस्त झाले आहे. विद्यापीठाच्या आवारात म्हशी बांधलेल्या आहेत. विश्वविद्यालयाचा जणू गोठाच झाला आहे. आत गेल्यावर चौथ्या मजल्यावर मंजुश्री बोधिसत्व उभे असलेले त्याला दिसले. युआनने त्यांना विनंती केली की, त्याला उचलून वर घ्या. मंजुश्री म्हणाले की, 'अद्याप एवढी प्रगती झाली नाही तुझी. आता तू तुझ्या देशात परत जा.' एकदा नालंदामधील विद्यार्थ्यांनी त्याला विचारले, 'तुला पुन्हा चीनमध्येच का जायचे आहे ?' त्यावर तो मार्मिकपणे म्हणाला, 'बुद्धांच्या शिकवणुकीचा फायदा आपल्याला झाला. मग जे वंचित राहिले. त्यांच्यापर्यंत बुद्धांना पोहोचवणे आपले कर्तव्य नाही का?' इ. स. ६४५ मध्ये युआन चीनला परत गेला. भारतातून ६५७ ग्रंथ घेऊन गेला. गौतमबुद्धांच्या अस्थी, केस, वस्त्र, वापरातील भांडीही त्याने नेली. त्याच्या स्वागतासाठी चीनमध्ये तोबा गर्दी उसळली. ज्ञानाच्या प्रचंड लालसेने रात्रीच्या अंधारात भारतात पळून गेलेल्या चिनी प्रवाश्याचे पुन्हा चीनमध्ये जंगी स्वागत झाले.

आनंद स्पदंन

डॉ. अविनाश मोहरील

# क्रोकरी

त्या दिवशी एका घरी स्वयंपाकघरात भांड्याच्या रॅकवर स्टीलच्या भांड्यांचा संवाद सुरू होता. सगळ्यात वरच्या रांगेतील लोटी व दोन प्याले यांच्यात संवाद सुरू होता- संपले बुवा जीवन आपले. या फळकुटावर आता एकच रांग राहिली. खालच्या सर्व फळ्यांवरील आपल्या बांधवांचे तर काय झाले कुणास ठाऊक.

खरे तर आपण आता केवळ वस्तू नाही आहोत रे! आपल्या प्रत्येकासोबत या घरातील लोकांची एक आठवण जोडली गेली आहे. आपण जेव्हा या घरात आलो तेव्हा आपल्याला ज्यांनी या घरातील मंडळींकडे सुपूर्द केले तेव्हा त्यांनी त्यांची नावे आपल्यावर गोंदल्यामुळे आपण येथेच कायमस्वरूपी राहिलो. या घरातील प्रत्येक सुख-दुःखांच्या प्रसंगांमध्ये आपण सामील झालो. कधी कधी रागामध्ये आपटल्याही गेलो. वस्तूंनादेखील जीव लावला तर त्या आपल्या होतात, या संकल्पना पार मोडकळीत काढून माणसांनाही फार जीव लावू नये, असा विचार असलेल्या समाजव्यवस्थेत मोठी झालेली या घरची नवी सूनबाई आता एक एक करून आपल्याला या घरातून हद्दपार करीत आहे. आता आपणच केवळ उरलोय. बघूया काय होतं ते!

जुन्या काळी दिल्या जात असलेल्या भेटवस्तू गृहोपयोगी भांड्यांच्याच स्वरूपात असायच्या. माहेरवाशीण तर हमखास आपल्या माहेरच्यांना साडीच्या ऐवजी भांडी देण्याचा आग्रह करीत असे. मग ही भांडी देताना ज्यांनी ती दिलेली आहेत त्याचे नाव त्या भांड्यांवर गोंदवून टाकणारा माणूस त्याची हत्यारे घेऊन त्या भांड्यांच्या दुकानासमोर बसलेला असायचा. नंतर ती नावे लिहिण्याची मशीन पण आली. प्याले, ताटे, फुलपात्रे इत्यादींवर नावे टाकली जायची. त्या व्यक्तीच्या नावामुळे ते भांडे केवळ भांडे न राहता त्या व्यक्तीची आठवण बनून जायची. जेव्हा जेव्हा त्या भांड्यांचा वापर होत असे त्या त्या वेळी त्या भांड्यावरील नाव असलेल्या व्यक्तीची किमान एक आठवण मनात दाटून येत असे. अशा प्रकारे स्नेहीजनांच्या आठवणीची प्रतीके असणारी भांडी आपल्यापैकी प्रत्येकाच्या घरात आहेत. आता मात्र काळ बदललेला आहे. नव्या काळासोबत चालत असताना नवे बदल स्वीकारायलाच हवे, असेही बरेच लोक म्हणतात. परंतु बदल घडवून आणताना ते बदल हळुवारपणे आणि जुन्या भावना न दुखविता अंमलात आणले तर काय हरकत आहे! कारण ज्या चकचकीत काचेच्या क्रोकरीस आपण घरात स्थान देतो तेव्हा त्याबाबतीत एक महत्त्वाचा मुद्दा लक्षात येतो; तो म्हणजे या क्रोकरीच्या भांड्यांवर नावे लिहिता येत नाहीत. शिवाय काच फुटली की संपले. त्यामुळे त्या काचेच्या प्याल्याबाबत किंवा ताटलीबद्दल आपल्याला आता आत्मियता वाटण्याची गरजच भासत नाही. त्याकडे आपण केवळ उपयोगीतेच्या किंवा चकाकणा भूमिकेतूनच बघायला लागलो आहे.

काचेची चकचकीत भांडी दिसायला छानच दिसतात, परंतु ज्या भांड्यांची जागा घेतात त्यांच्याभोवती असलेले विश्व विसरायला नको. घरातले बारा प्याले आईने पहिल्या बाळाच्या जन्माच्या वेळी माहेरच्यांकडून मागितलेले असतात. त्या प्रत्येक प्याल्यावर बाळाच्या मामांची व मावशींची नावे आवर्जून घातलेली असतात. त्या प्याल्यातून बाळाला पाणी पाजताना बाळाला मामा व मावशीच्या किती आठवणी त्याच्याशी बोबड्या आवाजात बोलताना आईने सांगितलेल्या असतात. या आठवणी त्या बाळाला जरी आठवत नसल्या तरी आईच्या स्मरणात असतात. आपले बाबा नेहमी एकाच ठरावीक पितळी ताटात का जेवतात हे कळतच नाही. परंतु त्यांना विचारल्यावर त्यांनी सांगितलेली गोष्ट अंगावर काटा उभा करते. बाबा लहान असताना एवढी प्रचंड गरिबी होती की रात्रीचे जेवण मिळणेही दुरापास्त असायचे. त्यावेळी घरात एकच ताट होते. त्या ताटावर बाबांच्या आईचे नाव लिहिलेले होते; जी त्यांना वयाच्या सहाव्या वर्षी सोडून गेली होती. रात्रीच्या वेळी उपाशापोटी झोपले असताना मध्यरात्रीनंतर कडाडून भूक लागली असायची. खायला काही नसल्याने आईचे नाव लिहिलेले ते ताट उराशी घेऊन झोपले की झोप लागायची. अशा अनेक उपाशी रात्री त्या ताटाच्या भरवश्यावर काढल्यामुळे त्याच ताटात आयुष्यभर त्यात पडेल ते अजिबात नावे न ठेवता जेवायचे, असा दंडक असतो. अगदी भाजीत मीठ नसेल तरीही कधीही सांगायचे नाही. कारण त्या आईचे नाव लिहिलेल्या ताटात वाढलेले आहे. माणूस त्या जुन्या वस्तूंशी भावनिकदृष्ट्या इतका जास्त गुंतू शकतो, हे क्रोकरीची भांडी वा असलेल्या मंडळींना कसे कळणार?

जुन्याचा काळ संपून नव्याने त्याची जागा घ्यावी ही जगरहाटीच आहे. या हस्तांतरणामध्ये कधी कधी काही बाबी बदलवित असताना त्यांच्यामागील भावनांना समजण्याची आवश्यकता असते. अशाच क्रोकरीची आवड असलेल्या एका सूनबाईंनी घरातील सारे प्याले बदलून काचेचे प्याले वापरण्याचे ठरविले. सासूबाई या निर्णयाने जरा नाराज होत्या. कारण मोठ्या मुलाच्या मौंजीत माहेरकडून मिळालेली ती भेट होती. पण सूनबाईंच्या हट्टाखातर त्यांनी बदल मान्य केला; त्या प्याल्यांपैकी एक जरासा मोठा असलेला प्याला मात्र त्यांनी मोडीत देण्यास नकार दिला. (पान ६ वर)



विवेचन

श्रीरंग श्री. हिर्लेकर

# पातंजल योगसूत्रे परिचय (पूर्वार्ध)

भगवान पतंजली हे भारतीय परंपरेतील महान ऋषी, व्याकरणकार आणि योगतत्त्वज्ञ मानले जातात. कृष्णाने गीतेत म्हटले- '**इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम्। विवस्वान मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत्।**' पूर्वी जो योग मी सूर्याला, सूर्याने मनूला आणि मनूने इक्ष्वाकूला सांगितला, तोच आता तुला मी पुन्हा सांगतो. गीतेतील योगाचा अर्थ कर्मयोग, ज्ञानयोग, भक्तियोग, समत्वयोग असा व्यापक आहे. दोघांचेही अंतिमध्येय आत्मसाक्षात्कार किंवा कैवल्यप्राप्ती हेच असले तरी दृष्टिकोन भिन्न आहेत.

'**योगेन चित्तस्य पदेन वाचां। मलं शरीरस्य च वैद्येकेन। योऽपाकरात्तं प्रवरं मुनीनां। पतंजलिं प्रांजलिरानतोऽस्मि।।**' ज्यांनी योगाच्या सहाय्याने चित्ताचे, व्याकरणाने वाणीचे आणि वैद्यकाने शरीराचे मल दूर केले त्या पतंजली मुनींना मी वंदन करतो. संत हे जीवनमुक्तच असतात. स्वतःसाठी काही मिळवावे अशी त्यांना इच्छाच नसते.


'**जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती। उपकारा।।**' म्हणून क्वचित लोककल्याणासाठी, भक्ताच्या परित्राणासाठी, त्यांच्यावर अनुग्रह करण्यासाठी संतमंडळी यांचा उपयोग करतात. योगशास्त्रातील काही महत्त्वाच्या सिद्धीसंबंधीची पातंजल योगसूत्रे पाहण्यासारखी आहेत. अष्टमहासिद्धींचा उल्लेख योगसूत्रात असा आला आहे-

'**अणिमा महिमा चैव लघिमा गरिमा तथा। प्राप्तिः प्राकाम्यमीशित्वं वशित्वं चाष्टसिद्धयः।।**

१) अणिमा- शरीर परमाणुप्रमाणे सूक्ष्मकरणे. २) महिमा- शरीर वाटेल तितके मोठे करणे. ३) लघिमा कापसापेक्षाही हलके होणे. ४) गरिमा- शरीर अत्यंत वजनदार करणे. ५) प्राप्ती- चन्द्रबिंबासारख्या वस्तूला बसल्या ठिकाणाहून बोटाने स्पर्श करणे. ६) प्राकाम्य- कोणतीही इच्छा पुरी होणे. ७) ईशत्व- सर्व सृष्ट पदार्थांवर सत्ता चालविणे. ८) वशित्व- सर्व भूतमात्रांना वश करणे. याव्यतिरिक्त मंत्र-तंत्रांच्या योगाने प्राप्त होणार्या काही क्षुद्र सिद्धी आहेत. त्या साधकाजवळ काही दिवसच राहतात. मात्र, साधकाच्या अंतिमकाळी त्यांचा विपरीत परिणामभोगावा लागतो. योगसूत्रात उल्लेखिलेल्या ५० सिद्धींपैकी अनेक संतचरित्रात आढळणाऱ्या सिद्धींविषयीची सूत्रे आपण पाहू...

साधनपादः-'**वैरत्याग-अहिंसा-प्रतिष्ठायां तत्संनिधौ वैरत्यागः।**' (२,३५.) अहिंसाव्रताचे परिपालन केल्याने, योग्याचे सर्व प्राणिमात्रांशी मित्रत्व होते. 'वाचासिद्धी- **सत्यप्रतिष्ठायां क्रियाफलाश्रयत्वम्।**' (२,३६.) सत्याच्या अभ्यासाने वाचासिद्धी प्राप्त होते. 'दिव्यरत्नप्राप्ती- **अस्तेय प्रतिष्ठायां सर्वरत्नोपस्थानम् ।**' (२,३७.) अस्तेय व्रतामुळे सर्व संपत्ती चालून येणे.

वीर्यलाभ :- '**ब्रह्मचर्यप्रतिष्ठायां वीर्यलाभः**' (२,३८.) ब्रह्मचर्य पालनाने उत्तम शरीरसामर्थ्य प्राप्त होणे.. इष्टदेवता प्रसन्न होणे- '**स्वाध्यायादिष्टदेवतासंप्रयोगः**' (२,४४.) स्वाध्यायाने इष्टदेवता प्रसन्न होऊन दर्शन देते. समाधिसाधनः- '**समाधिसिद्धिरीश्वरप्रणिधानात्।**' (२,४५.) ईश्वर प्रणिधानाने समाधी सिद्ध होते. शीतोष्णादी पीडांचा '**ततो द्वन्द्वानभिघातः।**' (२,४८.) आसनाभ्यासाने शीत, उष्ण, भूक, तहान इत्यादी नष्ट होतात.



इंद्रियजयः- '**ततः परमावश्यद्रिरयाणाम्।**' (२,५५.) प्रत्याहाराने इंद्रिये पूर्णपणे स्वाधीन होतात.

संयमः- योगसूत्रात जागोजागी हा शब्द आढळतो. याचा अर्थ प्रचलित पद्धतीने संयमपाळणे, इंद्रियदमन इतकाच मर्यादित नसून व्यापक आहे. सूत्र ३- ४ या मध्ये पतंजली म्हणतात- '**त्रयमेकत्र संयमः।**' त्रयम् म्हणजे धारणा, ध्यान आणि समाधी. मन एका जागी स्थिर करणे, एकाच विषयावर सर्व मानसिक प्रवाह केंद्रित करणे आणि साधक, ध्यान आणि ध्येय यांच्यातील भेदाचा लय करणे. या तीनही प्रक्रिया साधणे म्हणजे संयम.

**विभूतिपाद :** 'उत्तमज्ञान- तज्जयात्प्रज्ञालोकः।' (३,५) संयमाच्या अभ्यासाने प्रज्ञाजागृती होते. 'भूतभविष्य ज्ञान- परिणामत्रय संयमादतीतानागतज्ञानम्।' (३,१६.) निरोध, समाधी आणि एकाग्रता या तीन परिणामांच्या ठिकाणी संयमकेल्याने भूत व भविष्य काळाचे ज्ञान होणे.

'परचित्त ज्ञान- प्रत्ययस्य परचित्तज्ञानम्।' (३,१९.) दुसर्याच्या देहावरील चिन्हांवर संयमकेला तर त्याच्या मनातील गुह्य जाणणे. अदृश्य होणे- '**कायरूपसंयमा त्तदयाग्राह्य शिततस्तंभे चक्षुः प्रकाशासंप्रयोगेऽन्तर्धानम्।**' शरीररूपांवर संयमकरून, रूपग्रहणाच्या सामर्थ्यावर निरोध करून, चक्षू आणि प्रकाश यांचा वियोग करून योग्याला अंतर्धान पावता येते.

सूक्ष्मदृष्टीची प्राप्ती- '**प्रवृत्त्यालोकन्यासात्सूक्ष्म व्यवहितवि प्रकृष्टज्ञानम।।**' (३,२४.) मनातील ज्योतिष्मती प्रवृत्तीवर संयमकेला की कोणत्याही अडथळ्यापार वस्तूंचे, भूमिगत द्रव्यादिकांचे, अतिसूक्ष्मकिंवा अतिदूरच्या वस्तूंचे दर्शन होऊन ज्ञान होते. क्षुधातृपानिवृत्ती- '**कण्ठकूपे क्षुत्पिपासानिवृत्तिः।।**' (३,२९.) कंठावर संयमकेल्याने भूक आणि तहानेची शांती होते. सिद्धांच्या भेटी-'मूर्धज्योतिषि सिद्धदर्शनम।।' (३,३१.) ब्रह्मरन्ध्र किंवा सहस्त्रारपद्म यांच्या ठिकाणी संयमकेल्याने गुप्त संचार करणार्या सिद्धांचे दर्शन होते.

ज्ञानस्फुरण- 'प्रातिभाद्वा सर्वम्।' (३,३२.) प्रतिभेच्या ठिकाणी संयमकेल्यास सर्व विशयांचे ज्ञान होते. चित्तज्ञान- 'हृदये चित्तसंवित्।' (३,३३). हृदयकमलाच्या ठिकाणी संयमकेला असता आपल्या व परक्यांच्या चित्ताचे वासनांसहित ज्ञान होते. दिव्य शब्द स्पर्शादिंचे ज्ञान- 'ततः प्रातिभ श्रावणवेदना दर्शास्वादवार्ता जायन्ते।' (३,३५.) स्वार्थ - भोग-संयमापासून दिव्य श्रवण, दिव्य दर्शन, दिव्य आस्वाद, दिव्य गंध ज्ञात होतात.

कशालाही स्पर्श न करता अडथळ्यांशिवाय चालणे, इच्छामरणी होणे- '**उदानजयाज्जल पङ्कण्टकादि ष्वसङ्गउत्क्रान्तिश्च**' (३,३८.) उदानवायूवर संयमकेल्यास पाणी, चिखल, काटे इत्यादीवरून त्यांना स्पर्श न करताही चालता येते व स्वेच्छेने प्राणोत्क्रमण करता येते. अग्नीसारखे तेजस्वी होणे- 'समानजयाज्ज्वलनम्।' (३,३९.) समानवायूवर संयमकेल्याने योगी अग्नीसारखा तेजस्वी दिसतो. दूरध्वनीश्रवण- 'श्रोत्राकाशयोः संबंधसंयमाद्दिव्यं श्रोत्रम्।' (३,४०.) श्रोत्रेंद्रिये व बाह्याकाश (ईथर) यांच्यामधील संबंधावर संयम केला की श्रोनेंद्रिय दिव्य होऊन वाटेल तेथील शब्द स्पष्ट ऐकू येतो.

**नभोगमन-(आकाशसंचार):**

'काशाकाशयोः संबंधसंयमाल्लघुतूल सम ापत्तेश्चाकाशगमनम्।' (३,४१.) शरीर व शरीराकाश यांच्या संबंधाच्या ठिकाणी किंवा लघु पदार्थ व कापूस ह्यांच्यावर संयमकेला असता नभोविहार सिद्ध होतो. पाण्यावरून चालत जाणे, कोळ्याच्या जाळ्यांच्या तंतूंवरून आनंदाने विहार करणे, इतकेच काय पण सूर्यकिरणांबरोबर फिरणेही योग्याला साधते. पंचमहाभूतांवर विजय- स्थूलस्वरूप सूक्ष्मान्वयार्थवत्त्व संयमाद् भूतजयः (३,४३.) पंचम हाभूतांपैकी प्रत्येक भूताच्या स्थूल, स्वरूप, सूक्ष्म, अन्वयत्त्व व अर्थवत्त्व अशा पांच प्रकारच्या विशेष अवस्थांवर संयमकेला असता महाभूते स्वाधीन होतात. मनाच्या वेगाने गमन करण्याची शक्ती व इंद्रियसामर्थ्य- 'ततो मनोजवित्वं विकरणभावः प्रधानजयश्च।' (३,४७.) इंद्रियजय झाल्याने शरीराला मनाप्रमाणे गती प्राप्त होते. शरीराच्या साहाय्यावाचून इंद्रिये कामकरतात व सर्व जगत् वश होते. वरील सिद्धींवर आधारित असे संतचरित्रातील अनेक प्रसंग भौतिकशास्त्राच्या चौकटीत अजिबात बसत नाहीत. उत्तरार्धात त्याविषयी बघू...

पर्यावरण

मिलिंद बेंडाळे

> सोमधाराची शांतता आजही तशीच आहे; परंतु त्या शांततेत एक संदेश दडला आहे. निसर्ग आपल्याला सर्व काही देतो; पण किंमत ओळखली नाही, तर तो आपल्याला मर्यादांची जाणीव करून देतो. हिमालयातील या दुर्गमप्रदेशाकडे पाहताना केवळ सौंदर्याची स्तुती न करता या प्रदेशाच्या संरक्षणाची जबाब- दारीही स्वीकारली पाहिजे. कारण पर्वतांचे भविष्य आणि आपले भविष्य वेगळे नाही, तर एकमेकांशी घट्ट जोडलेले आहे.



# सोमधाराचा सांगावा

हिमालयाकडे पाहण्याची आपली सवय बहुतेक वेळा त्याच्या उंचीच्या, भव्यतेच्या किंवा पर्यटनाच्या संदर्भातून तयार झालेली असते. जगातील सर्वोच्च पर्वतरांगा, साहसी मोहिमा, हिमाच्छादित शिखरे आणि धार्मिक यात्रांचे मार्ग यातून हिमालयाची ओळख अनेक स्तरांवर उलगडत जाते; मात्र या विशाल पर्वतराजीत काही ठिकाणे अशी आहेत, जी प्रसिद्धीच्या झोतात नसतात; पण त्यांचे अस्तित्वच आपल्याला निसर्ग, इतिहास आणि मानवी संस्कृतीबद्दल नव्याने विचार करायला भाग पाडते. उत्तराखंडच्या कुमाऊं हिमालयातील सोमधारा हा असाच एक प्रदेश आहे. भारत- तिबेट सीमेजवळ वसलेला हा उंच पर्वतीय भाग केवळ भौगोलिकदृष्ट्या महत्त्वाचा नाही, तर हिमालयाच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणीय वारशाचे प्रतीक मानला जाऊ शकतो.

आज जेव्हा विकास, हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांच्या वापराबाबत जागतिक स्तरावर चर्चा सुरू असताना सोमधारासारख्या प्रदेशांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक व्यापक आणि संवेदनशील असणे आवश्यक आहे. सोमधारा हे नावच आपल्या कल्पनाशक्तीला स्पर्श करणारे आहे. 'सोम' म्हणजे चंद्र आणि 'धारा' म्हणजे प्रवाह. या नावातच शीतलता, शांतता आणि जीवनदायी ऊर्जा दडली आहे. हिमालयाच्या उंच शिखरांमधून उगमपावणाऱ्या जलप्रवाहांप्रमाणेच या प्रदेशाचे महत्त्वही दूरवर पसरले आहे. अनेकदा आपण नद्यांच्या प्रवाहाकडे पाहतो; पण त्या निर्माण करणाऱ्या हिमनद्या, पर्वत आणि जलसंकलन क्षेत्रांकडे दुर्लक्ष करतो. प्रत्यक्षात नदीच्या प्रत्येक थेंबामागे अशा पर्वतीय प्रदेशांचे मौन योगदान असते. हिमालय हा केवळ भूभाग नाही, तर तो भारतीय उपखंडाच्या जलव्यवस्थेचा कणा आहे. गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा आणि उपनद्या हिमालयातील हिमनद्यांमधून पोसल्या जातात. सोमधारासारख्या प्रदेशांतील बर्फ आणि हिमनद्यांमधून निर्माण होणारे पाणी पुढे अनेक नद्यांमध्ये मिसळते. या जलप्रवाहांवर शेती, जंगल, जैवविविधता आणि लाखो लोकांचे जीवन अवलंबून आहे. त्यामुळे अशा भागांचे महत्त्व केवळ स्थानिक नसून राष्ट्रीय स्तरावरील आहे. हिमालयाच्या संदर्भात आणखी एक महत्त्वाचा पैलू म्हणजे त्याचे आध्यात्मिक स्थान. भारतीय परंपरेत पर्वतांना केवळ दगड- मातीचे समूह मानले गेले नाही, तर स्थैर्य, तपश्चर्या आणि उच्च चेतनेचे प्रतीक मानले गेले. ऋषिमुनींनी हिमालयातील एकांत प्रदेशात साधना केली, अनेक तीर्थक्षेत्रे येथे विकसित झाली आणि निसर्गाशी एकरूप होण्याची संस्कृती निर्माण झाली. सोमधारासारख्या प्रदेशांबाबत लोकमानसात असलेली पवित्रतेची भावना याच परंपरेचा भाग आहे. या श्रद्धेचा सामाजिक परिणामही महत्त्वाचा आहे. ज्या प्रदेशाला लोक पवित्र मानतात, त्याचे संरक्षण करण्याची नैतिक जबाबदारी ते स्वतः स्वीकारतात.

आधुनिक पर्यावरणशास्त्राने ज्या संवर्धनाच्या संकल्पना मांडल्या, त्यांची मुळे अनेकदा अशाच पारंपरिक श्रद्धांमध्ये सापडतात. नद्या माता आहेत, पर्वत देव आहेत आणि जंगल जीवनदायी आहेत, ही भावना अनेक शतकांपासून भारतीय समाजात अस्तित्वात आहे. त्यामुळे निसर्गाचे संरक्षण हे केवळ कायद्याचे नव्हे, तर संस्कृतीचेही कार्य बनते. सोमधाराचा इतिहास खूप महत्त्वाचा आहे. आज जो प्रदेश अत्यंत दुर्गम वाटतो, तो एकेकाळी व्यापार, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि मानवी संपर्काचा मार्ग होता. हिमालयाकडे अनेकदा सीमा म्हणून पाहिले जाते; परंतु इतिहास सांगतो की, तो विविध संस्कृतींना जोडणारा पूलही होता.

भारत आणि तिबेट यांदरम्यान शतकानुशतके व्यापार चालत होता. मीठ, लोकर, धान्य, रेशीम आणि इतर वस्तूंची देवाणघेवाण या मार्गांनी होत असे. भोटिया समाजासारख्या समुदायांनी या कठीण मार्गांवरून प्रवास करून आर्थिक आणि सांस्कृतिक संबंध जिवंत ठेवले. या संपर्कातून धार्मिक कल्पना, लोकपरंपरा, भाषा आणि जीवनशैली यांचाही परस्पर प्रभाव वाढला. त्यामुळे हिमालय हा केवळ भू- राजकीय सीमा नसून सांस्कृतिक संवादाचा प्रदेश होता, हे विसरता कामा नये. ब्रिटिश काळात हिमालयाचे महत्त्व आणखी एका कारणामुळे वाढले. साम्राज्यवादी शक्तींना भूगोल समजून घ्यायचा होता, नकाशे तयार करायचे होते आणि सीमांचे आकलन करायचे होते. या प्रक्रियेत भारतीय सर्वेक्षकांनी मोठी भूमिका बजावली. त्यांनी अत्यंत कठीण परिस्थितीत प्रवास करून दुर्गम प्रदेशांची माहिती गोळा केली. हिमालयातील अनेक भाग जगाच्या नकाशावर आणण्यात या प्रयत्नांचे मोठे योगदान आहे; परंतु इतिहास, अध्यात्म आणि भूगोल यांच्या पलीकडे जाऊन आज सर्वात गंभीर प्रश्न पर्यावरणाचा आहे. हवामान बदल हा आता भविष्यकाळातील धोका राहिलेला नाही, तर वर्तमनातील वास्तव बनला आहे. आज हिमालयातील हिमनद्या वेगाने वितळत असल्याचे विविध अभ्यासांमधून समोर आले आहे. तापमानातील वाढ, पर्जन्यमानातील बदल आणि नैसर्गिक चक्रांमध्ये होणारे हस्तक्षेप यांचा परिणामसंपूर्ण पर्वतीय परिसंस्थेवर होत आहे. या बदलांचे परिणामदूरगामी असू शकतात. सुरुवातीला हिमनद्या वितळल्याने पाण्याचे प्रमाण वाढल्यासारखे वाटू शकते; परंतु दीर्घकालीन दृष्टीने हिमसाठा कमी होणे म्हणजे भविष्यातील जलस्रोतांवर संकट येणे होय.

भारतातील मोठ्या लोकसंख्येचे जीवन नदीप्रणालींवर अवलंबून आहे. शेती, पिण्याचे पाणी, जलविद्युत प्रकल्प आणि औद्योगिक गरजा या सर्वांसाठी नदीचे अस्तित्व अत्यावश्यक आहे. त्यामुळे हिमालयातील बदलांचा परिणाम मैदानी भागांवरही होणार हे निश्चित आहे. सीमावर्ती आणि पर्वतीय प्रदेशांमध्ये पायाभूत सुविधा उभारणे आवश्यक आहे. रस्ते, दळणवळण, आरोग्य आणि सुरक्षा या गरजांकडे दुर्लक्ष करता येणार नाही; परंतु विकासाची प्रक्रिया पर्यावरणाशी सुसंगत असली पाहिजे. हिमालयातील अनेक भागांनी गेल्या काही वर्षांमध्ये अतिवृष्टी, भूस्खलन आणि पूर यांचे परिणामअनुभवले आहेत. या घटनांमागे मानवी हस्तक्षेपाचाही वाटा असू शकतो. अनियोजित बांधकामे, जंगलतोड आणि पर्यावरणीय नियमांकडे दुर्लक्ष यामुळे पर्वतीय प्रदेशांची संवेदनशीलता वाढते. त्यामुळे विकासाच्या प्रत्येक निर्णयामध्ये पर्यावरणीय परिणामांचे गांभीर्याने मूल्यांकन करणे आवश्यक आहे.

सोमधारासारख्या प्रदेशांचा विचार करताना आणखी एक महत्त्वाचा मुद्दा समोर येतो, तो आपल्या निसर्गदृष्टीचा. आधुनिक जीवनशैलीने आपल्याला वेग, उपभोग आणि तत्काळ परिणामयांची सवय लावली आहे. त्याउलट हिमालय आपल्याला संयम, स्थैर्य आणि दीर्घकालीन विचार शिकवतो. पर्वतांची निर्मिती लाखो वर्षांमध्ये होते. हिमनद्या हजारो वर्षांची स्मृती जपतात आणि नद्या शेकडो किलोमीटरचा प्रवास करून जीवन निर्माण करतात. या विशाल कालमानाच्या तुलनेत मानवी आयुष्य अत्यंत लहान आहे. म्हणूनच सोमधारा ही केवळ एक भौगोलिक जागा नाही. ती निसर्गाच्या सामर्थ्याचे, इतिहासाच्या सातत्याचे आणि मानवी जबाबदारीचे एक स्मरणपत्र आहे. ती आपल्याला सांगते की सभ्यता कितीही आधुनिक झाली, तरी तिचे अस्तित्व शेवटी पाणी, हवा, जंगल आणि पर्वत यांच्यावरच अवलंबून आहे. आज गरज आहे ती अशा प्रदेशांकडे केवळ पर्यटनस्थळ किंवा सीमावर्ती भूभाग म्हणून न पाहता, त्यांना राष्ट्रीय नैसर्गिक वारसा म्हणून जपण्याची.

वैज्ञानिक संशोधन, स्थानिक समुदायांचा सहभाग, शाश्वत विकास धोरणे आणि पर्यावरणीय शिक्षण यांचा समन्वय साधल्याशिवाय हे शक्य होणार नाही. हिमालयाचे संरक्षण म्हणजे केवळ पर्वतांचे संरक्षण नाही, तर ते भविष्यातील पिढ्यांच्या जलसुरक्षेचे, पर्यावरणीय स्थैर्याचे आणि सांस्कृतिक वारशाचे संरक्षण आहे. (लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत)

पान १ वरून

## इस्रायलची आत्मनिर्भरता भारतासाठी संधी!

आतापर्यंत इस्रायलचे युद्धतंत्र छोट्या आणि मध्यम कालावधीचे, तसेच मुख्यतः हमास आणि हिजबुल्लासारख्या दहशतवादी संघटनांशी लढण्यासाठी विकसित करण्यात आले होते. इस्रायलची शस्त्रास्त्रे अत्याधुनिक आणि अचूक असली, तरी त्यांची वार्षिक उत्पादन क्षमता मर्यादित आहे. त्यांची किंमतही जास्त आहे. इराणच्या सुमारे ३० हजार किमतीच्या शहीद ड्रोनला उद्ध्वस्त करण्यासाठी वापरण्यात येणारे क्षेपणास्त्र काही लाख डॉलर किमतीला पडते. इस्रायलची हवाईहल्ले प्रतिरोधक यंत्रणा त्रिस्तरीय असून, त्यातील थाड क्षेपणास्त्र अमेरिकेचे असून, रो हे क्षेपणास्त्र अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे बनवले आहे.

अमेरिकेची शस्त्रास्त्रे रशिया- युक्रेन युद्धात, तसेच इराणमधील युद्धामध्येही मोठ्या प्रमाणावर वापरली गेली आहेत. त्यांचे साठे मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहेत. त्याला अमेरिकेच्या राजकारणाच्या लहरीपणाची जोड दिल्यास इस्रायल केवळ अमेरिकेवर अवलंबून राहू शकत नाही. म्हणून, इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहूंनी लष्करीदृष्ट्या इस्रायलला आत्मनिर्भर करण्याचा नारा दिला आहे. भारतासाठी ही सुवर्णसंधी आहे. गेल्या अनेक वर्षांपासून भारत आणि इस्रायलमधील संरक्षण क्षेत्रातील संबंध मजबूत होत आहेत. पूर्वी हे संबंध भारताने इस्रायली शस्त्रास्त्रे खरेदी करण्यापुरते होते. कालांतराने मेक इन इंडिया धोरणामुळे भारताला विकण्यात येणाऱ्या शस्त्रांचा काही हिस्सा भारतात बनवू लागला.

गेल्या काही वर्षांमध्ये भारताने आत्मनिर्भरतेचा मार्ग पत्कारला असून, गेल्या काही वर्षांत भारत शस्त्रास्त्रांचा मोठा आयातदारापासून निर्यातदार बनला आहे. भारतालाही ऑपरेशन सिंदूरनंतर अमेरिकेकडून मोठा धक्का बसला आहे. या परिस्थितीमुळे भारत आणि इस्रायलमधील संरक्षण क्षेत्रातील संबंध अधिक प्रगल्भ होऊ लागले आहेत.

## उबाठा सेनेची ढासळती इमारत!

आपलेच नेते आपल्याला सोडून जात आहेत, यातही उद्धव ठाकरे यांना स्वतःत काही दोष दिसतच नाही. थोरामोठ्यांवर टीका केल्याने लिंबूटिंबूंनाही प्रसिद्धी मिळते, तीच उबाठाची परिस्थिती. उबाठाचे एकनिष्ठ सेवक संजय राऊत यांनी त्याचे खापर भाजपवर, त्याहीपेक्षा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर फोडले. फडणवीस यांचे वर्तन रामद्रोही आणि घटनाद्रोही असल्याचा फुटकळ आरोप त्यांनी केला. त्याचे स्पष्टीकरण काय ते त्यांनी दिलेले नाही. सुज्ञ व्यक्ती ते विचारणारही नाही. पण, फडणवीस हे पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून उभे राहू नयेत, यासाठी केंद्रातूनच त्यांना महाराष्ट्रातच अडकवून ठेवण्यासाठी ऑपरेशन टायगर सुरू केल्याची आधारहीन टीका त्यांनी केली. या टीकेतील तर्कसंगती ज्याच्या लक्षात येईल, तो खरा चाणक्य म्हटला पाहिजे. उद्धव ठाकरे यांनी पुष्कळ संदर्भहीन टीका केली आहे. तिची दखलही घेण्याचे कारण नाही, इतकी ती पोकळ उबाठा सेनेचे खासदार व आमदार हे आपणहूनच हा पक्ष सोडण्यास उतावीळ झाले आहेत, त्याला भाजप किंवा एकनाथ शिंदे काय करणार? आपलेच नेते आपल्याला का सोडून जात आहेत, याचा विचार ठाकरे यांनी कधीच केला नाही. तसा तो केला असता, तर आज त्यांच्यावर ही वेळ आली नसती. आपल्या नेतृत्वात काही कमजोरी आहे, हे ठाकरे कधीच मान्य करणार नाहीत. निदान आपल्या नेत्यांच्या ते कायम संपर्कात राहिले असते आणि त्यांची मते ऐकून घेतली असती, तर कदाचित आज त्यांच्यावर ही वेळ आली नसती. उद्धव ठाकरे यांनी नुकताच विदर्भ आणि मराठवाड्याच्या काही भागांचा दौरा केला. तो कशाला केला, हे त्यांचे त्यांनाच ठाऊक. पण, आपला नेता आपल्याला भेटत तर नाहीच; पण त्याच्याशी संपर्कही होऊ शकत नाही, ही उबाठा सेनेच्या नेत्यांची कायमची तक्रार असते. आता या भागातील उबाठाच्या खासदारांनी शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केल्यावर उद्धव यांच्या दौऱ्याला काही अर्थच उरत नाही. आपल्याच कार्यकर्त्यांची भेट घ्यायची नाही किंवा त्यांचे म्हणणेही ऐकून घ्यायचे नाही, ही जगावेगळी नेतेगिरी उद्धव ठाकरे करीत होते.

ज्यांना आपल्याच पक्षात काय घडते आहे, त्याची गंधवार्ता नसते; त्यांनी दुसऱ्या पक्षातील नेत्यांमध्ये शह- काटशहाचे राजकारण कसे चालू आहे, यावर भाष्य करणे हे हास्यास्पदच. उबाठा हे दिवसेंदिवस असेच हास्यास्पद बनत चालले आहेत. म्हणूनच, उद्धव ठाकरे यांनी आता राजकारण सोडावे आणि लग्नसोहळे सुरू करावेत, अशी टीका भाजपने केली. त्याचा उद्धव ठाकरे यांनी जरूर गांभीर्याने विचार करावा. अतिअहंकार आणि सत्तेच्या नशेमुळे काय होते, ते तृणमूल काँग्रेसच्या अभिषेक बॅनर्जी यांच्या उदाहरणावरून कळून येते. तेव्हा, ठाकरेंनी दिल्लीची चिंता सोडावी आणि महाराष्ट्रातील आपले उरलेसुरले आमदार आपल्यासोबत राहतील का, याचा विचार केला तरी पुरे!

## चलनाचा बदलता चेहरा

कराव्या लागतात. याउलट पॉलिमर नोटा चलनातून बाद होतात, तेव्हा वितळवून त्यांच्यापासून प्लास्टिकच्या इतर वस्तू बनवता येते. तसेच, दीर्घ आयुष्यामुळे नव्या नोटा वारंवार छापण्याची गरज पडत नसल्याने कागद निर्मितीसाठी होणारी वृक्षतोड आणि पाण्याचा वापर कमी होतो. दुसरीकडे प्लास्टिक नोटांच्या अंमलबजावणीमध्ये अनेक व्यावहारिक, आर्थिक आणि पर्यावरणीय अडचणी आहेत, ज्या या निर्णयाला मअनावश्यक खर्चफ ठरवण्यास कारणीभूत ठरतात. प्लास्टिक नोटांच्या छपाईचा सुरुवातीचा खर्च कागदी नोटांच्या तुलनेत अत्यंत जास्त असतो. पॉलिमर फिल्मची आयात, विशेष शाई आणि प्रगत छपाई यंत्रसामग्री यासाठी अब्जावधी रुपयांची गुंतवणूक करावी लागेल. भारतासारख्या विकसनशील देशासाठी, जिथे आधीच वित्तीय तूट आणि इतर सामाजिक क्षेत्रांवर खर्च करण्याचे आव्हान आहे, तिथे केवळ नोटा बदलण्यासाठी एवढा मोठा खर्च करणे कितपत व्यवहार्य आहे, हा मोठा प्रश्न आहे. हा खर्च केवळ नोटा छपाईपुरता मर्यादित नाही. देशातील लाखो एटीएम मशिन्स, बँकांचे कॅश काऊंटिंग मशिन्स आणि व्हेंडिंग मशिन्स हे कागदी नोटांच्या जाडीनुसार आणि वजनानुसार डिझाईन केलेले आहेत. प्लास्टिक नोटा आल्यास देशभरातील सर्व एटीएम मशिन्सचे कॅलिब्रेशन बदलावे लागेल.

**हायब्रिडचा पर्याय सुरक्षितः-** रिझर्व्ह बँकेने मागे जयपूर, शिमला, भुवनेश्वर, म्हैसूर आणि कोची या पाच शहरांमध्ये हवामानातील विविधतेचा अंदाज घेण्यासाठी १० रुपयांच्या प्लास्टिक नोटांची चाचणी घेण्याचे ठरविले होते. या चाचण्यांचे निष्कर्ष संमिश्र राहिले. भारताच्या अत्यंत उष्ण हवामानात प्लास्टिक नोटा वितळणार किंवा कडक होणार नाहीत ना, याची खात्री करणे गरजेचे आहे. प्लास्टिक नोटांच्या दोन्ही बाजू पाहिल्यानंतर, ही व्यवस्था संपूर्ण सुरक्षित किंवा पूर्णपणे अनावश्यक अशा टोकाच्या चौकटीत बसवता येत नाही. त्यावर एक सुवर्णमध्य काढण्याची गरज आहे. संपूर्ण प्लास्टिक नोटांऐवजी कागद आणि पॉलिमर यांचे मिश्रण असलेल्या हायब्रिड नोटांचा विचार केला जाऊ शकतो. यामुळे सुरक्षाही वाढेल आणि खर्चही मर्यादित राहील. १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटांचा चलनात सर्वाधिक वापर होतो आणि त्या लवकर खराब होतात. त्यामुळे सुरुवातीला केवळ या लहान नोटाच प्लास्टिकमध्ये बदलल्या जाव्यात तर ५०० रुपयांसारख्या मोठ्या नोटा डिजिटल व्यवहारांकडे वळवाव्यात. भौतिक चलनावरचा खर्च कमी करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे डिजिटल साक्षरता वाढविणे. ग्रामीण भागातही इंटरनेट आणि यूपीआयचा प्रसार वाढल्यास नोटा छापण्याची गरजच निम्म्याने कमी होईल. प्लास्टिक नोटांची दिशा ही केवळ एका धातू किंवा कागदाची जागा दुसऱ्या घटकाने घेणे इतकी मर्यादित नाही, तर तो देशाच्या आर्थिक धोरणाचा भाग आहे. तात्कालिक दृष्टिकोनातून पाहिल्यास हा खर्च अनावश्यक आणि महागडा वाटू शकतो; परंतु दीर्घकालीन आर्थिक सुरक्षा, बनावट नोटांचे समूळ उच्चाटन आणि छपाई खर्चाची बचत लक्षात घेता हे सुरक्षित आणि शाश्वत चलनव्यवस्थेकडे टाकलेले एक धाडसी पाऊल ठरेल. (लेखक आर्थिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

> पाण्या- पावसाशिवाय आपलं जग अधुरं आहे. आताच्या घडीला भारतासह जगभरातच विचित्र परिस्थिती निर्माण झाली आहे. 'जागतिक हवामान संघटने'च्या ताज्या अहवालानुसार, 'एल निनो'मुळे हवामान बदलाची गती वाढली असून, काही देशांत भीषण पूर, तर काही भागांत तीव्र दुष्काळी स्थिती निर्माण झाली आहे. भारतात ४ जून रोजी केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाले. सध्या मान्सून कर्नाटक, तेलंगण आणि आंध्र प्रदेशच्या काही भागांत पुढे सरकला असून, सुरुवातीच्या टप्प्यात देशभरात सरासरीपेक्षा २६ टक्के कमी पावसाची नोंद झाली आहे. दुसऱ्या बाजूला दक्षिण चीनमधील अनेक प्रांतांत, पावसामुळे भीषण पूर आला आहे. एका बाजूला या असमतोल वातावरणाशी झुंज देतानाच, दुसऱ्या बाजूला आपल्यासमोर मानवनिर्मित आव्हान येऊन ठेपलं आहे. हे आव्हान आहे, कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रवाह सुरळीत सुरू राहाण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पाण्याचं!

# तहानलेलं पाणी...

वेधक

मुकुल आव्हाड



आपण जेव्हा इंटरनेटवर काहीही शोधतो किंवा 'एआय' वापरतो, तेव्हा ती सर्व माहिती कुठेतरी साठवली जाऊन, त्यावर प्रक्रिया होते. ही प्रक्रिया ज्या हजारो कॉम्प्युटर्स (सर्व्हर्स) द्वारे केली जाते, त्यांना 'डेटा सेंटर्स' म्हणतात. हे सर्व्हर्स २४ तास सुरू असल्याने तापतात. त्यांना थंड ठेवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाण्याची आणि विजेची गरज असते.

जगातील आघाडीची तंत्रज्ञान कंपनी 'ॲमेझॉन'ने पहिल्यांदाच जाहीर केले की, त्यांच्या जगभरातील डेटा सेंटर्सनी २०२५ या वर्षात तब्बल नऊ अब्ज लिटर्सपेक्षा जास्त पाण्याचा वापर केला. पाण्याचा हा आकडा खूपच मोठा वाटत असला तरी 'ॲमेझॉन'चे म्हणणे आहे की, त्यांचे डेटा सेंटर्स त्यांच्या प्रतिस्पर्धी कंपन्यांपेक्षा (उदा. 'मायक्रोसॉफ्ट', 'गुगल' आणि 'मेटा') खूप जास्त कार्यक्षम आहे.

'ॲमेझॉन'च्या आकडेवारीनुसार, त्यांनी २०२५ मध्ये किलोवॅट प्रतितास विजेमागे फक्त ०.१२ लिटर पाण्याचा वापर केला, जो इतर कंपन्यांच्या तुलनेत सर्वांत कमी आहे. त्यांचा डेटा सेंटर्सचा विस्तार होतानाही, थेट त्यांच्या मालकीच्या सेंटर्समधील पाण्याचा वापर २०२४च्या तुलनेत दोन टक्क्यांनी कमी झाला.

'ॲमेझॉन' ९० टक्के वेळा सर्व्हर्स थंड ठेवण्यासाठी बाहेरील नैसर्गिक हवेचाच वापर करते. फक्त खूप उष्णता असेल, तेव्हाच पाण्याचा वापर करण्यात येतो. 'ॲमेझॉन'चा हा दावा असला तरी तज्ज्ञांच्या मते, या आकड्यात नवीन डेटा सेंटर्स बांधण्यासाठी लागणारे पाणी आणि त्यांना वीज पुरवणाऱ्या पॉवर प्लांट्सना लागणाऱ्या पाण्याचा समावेश केलेला नाही.

पर्यावरणासंबंधित प्रश्नांमुळेच अमेरिकेत डेटा सेंटर्सच्या उभारणीला आणि वाढत्या पाणीवापराला स्थानिकांचा तीव्र विरोध आहे. 'ॲमेझॉन'च्या कर्मचाऱ्यांनीही यावर चिंता व्यक्त केली होती, ज्यामुळे सिटलमध्ये नवीन डेटा सेंटर्स उभारणीवर एक वर्षाची बंदी आली आहे. यासंदर्भात जगभरातील डेटा सेंटर्सच्या पाणी वापराबाबत पारदर्शकता आणण्यासाठी कायदे असावे, यासाठी अनेक संस्था विचाराधीन आहेत. 'युनायटेड नेशन्स युनिव्हर्सिटी'च्या एका अहवालानुसार, २०३० पर्यंत जगभरातील डेटा सेंटर्सचा एकूण 'वॉटर फूटप्रिंट' (पाण्याचा वापर) ९.३ ट्रिलियन (९ लाख, ३० हजार कोटी) लिटर्स एवढा प्रचंड असेल.

'ॲमेझॉन'ने म्हटले आहे की, २०३० पर्यंत ते 'वॉटर पॉझिटिव्ह' होती. म्हणजेच, ते आपल्या व्यवसायासाठी जितके पाणी वापरतील, त्यापेक्षा जास्त पाणी ते वेगवेगळ्या प्रकल्पांच्या माध्यमातून (उदा. सांडपाण्यावर प्रक्रिया करून ते पुन्हा वापरणे) समाजाला परत करतील. 'ॲमेझॉन'च्या या दाव्यामध्ये जरी तथ्य असले, तरी येणाऱ्या काळामध्ये 'एआय'च्या वाढत्या वापरामुळे जन्माला येणाऱ्या कंपन्या अशा पद्धतीचं अनुकरण करतीलच का? हा प्रश्नच आहे.

वाढत्या डिजिटल आणि 'एआय' युगात, डेटा सेंटर्स ही जगाची गरज असली, तरी त्यासाठी होणारा पाण्याचा प्रचंड वापर पर्यावरणावर मोठाच ताण निर्माण करेल. 'ॲमेझॉन'ने आपली कार्यक्षमता सिद्ध करण्याचा प्रयत्न केला असला, तरी भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई पाहता, हा दावा आश्वस्त करणारा आहे का? हा प्रश्नही पडताचे. एका बाजूला इंटरनेटशिवाय जग काही काळ चालू शकते; पण पाण्याशिवाय मानवी अस्तित्वाची कल्पनाच अशक्य आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात या समस्यांवर तोडगा काढण्याशिवाय आपल्याकडे तरणोपाय नाही, हे नक्की!

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर


# सावित्री

वटपौर्णिमा सण नुकताच साजरा झाला. गेल्या पाव शतकापासून या दिवसाच्या काही दिवस आधीपासून एका विशिष्ट आशयाचा संदेश विविध माध्यमातून प्रसृत होतो आणि चहूबाजूंनी अंगावर येऊन कोसळू लागतो. या सत्यवान सावित्रीच्या मागे जाण्यापेक्षा आधुनिक काळात स्त्री शिक्षणासाठी झटणाऱ्या सावित्रीबाई फुलेंचे स्मरण करा असा घोषाच त्यात लावलेला असतो.

सावित्रीबाई फुले (३ जानेवारी, इ. स. १८३१- १० मार्च, इ. स. १८९७) यांचं कार्य निर्विवादपणे मोठंच आहे. पण राजकीय स्वार्थासाठी प्राचीन भारतात होऊन गेलेल्या सावित्री या पतिव्रतेला कमी लेखून सनातनी आस्था, श्रद्धांचा जाणीवपूर्वक उपहास आणि अवहेलना करण्यात येते आहे, हे आपलं दुर्दैवच. ज्या नेते मंडळींनी हा उद्योग केला आहे त्यांचे भारतीय कुटुंब व्यवस्था मोडकळीला आणण्याचे प्रयत्न आहेत, हे विसरून चालणार नाही. त्यांचे ते प्रयत्न हाणून पाडायचे तर ही सावित्री कोण आहे, हे समजून घेणं आवश्यक आहे.

महाभारतात वनवासात असलेल्या पाच पांडव आणि द्रौपदीचं क्षेमकुशल जाणण्यासाठी मार्कंडेय ऋषी येतात. त्यांच्याशी विविध विषयांवर चर्चा करीत असताना युधिष्ठिर त्यांना विचारतो, द्रौपदीसारखी तेजस्वी, बुद्धिमती, वाक्चतुर, पतिव्रता अन्य कोणती स्त्री आहे का? त्यावर ऋषिवर त्याला सावित्रीची गोष्ट सांगतात...




मद्रदेशाचा राजा अश्वपती निपुत्रिक होता. त्यानं थोडी थोडकी नव्हे, तब्बल १८ वर्षे सवितादेवाची म्हणजे सूर्याची आराधना केली. त्यामुळे प्रसन्न होऊन सवितादेवानं त्याला कन्यारत्नाचा आशीर्वाद दिला. तिचं नाव सावित्री!

सूर्यासारखी तेजस्वी आणि प्रखर बुद्धिमत्तेची ही राजकन्या योग्य वयात सर्व विद्या आणि कलांत पारंगत झाली. त्यानंतर तिच्यासाठी योग्य तो वर शोधण्याची मोहीम सुरू झाली. त्यात राजा आणि राणी दोघांनीही निर्णय घेण्याचा पूर्ण अधिकार सावित्रीलाच दिला होता. वर शोधण्यासाठी सख्या, आमात्य आणि सेवकांसह सावित्री बाहेर पडली. विविध प्रांतांत जाऊन वर संशोधन करीत असताना तिला एका वनात एक तेजस्वी तरुण सरपण गोळा करताना दिसला.

पाहता क्षणी तो तिला आवडला. तिनं त्याची चौकशी केली. तो शाल्वदेशाचा पदच्युत राजा द्युमत्सेनाचा एकुलता एक पुत्र असल्याची माहिती मिळते. राजा द्युमत्सेन राज्य करीत असताना त्याला अंधत्व येतं. त्याच्या आसपासचे लोक कटकारस्थान करून त्याला राज्याबाहेर घालवतात.

तो आपल्या राणी आणि अल्पवयीन पुत्रासह वनात आयुष्य कंठत असतो. तोच त्याचा पुत्र आता तरुण झालेला असतो. त्याचं नाव सत्यवान. सावित्रीनं त्याला वर म्हणून पसंत केलं. राजगृही परतल्यानंतर तिनं आपला निर्णय मातापित्याला कळवला. त्याच वेळी देवर्षी नारद तिथे येतात आणि सत्यवान अल्पायुषी असल्याचं सांगतात.

आजपासून एका वर्षाच्या आत सत्यवानाचा मृत्यू निश्चित आहे. इतक्या स्पष्ट शब्दांत ते बोलतात. तरीही आपण त्याला मनानं आपला पती मानलं आहे, असं स्पष्टीकरण देत सावित्री आपल्या निर्णयावर ठाम असते. विवाहानंतर आपल्या माहेरचं सगळं वैभव, सुखसुविधा आणि भोगविलास त्यागून ती पतीच्या पर्णकुटीत राहू लागते. आपल्या वृद्ध सासू व अंध सासऱ्यांची सेवा करू लागते. बघता बघता वर्ष सरतं आणि सत्यवानाच्या मृत्यूचा दिवस जवळ येऊन ठेपतो.

सावित्रीची पतिनिष्ठा आणि पातिव्रत्याच्या तेजामुळे सत्यवानाचे प्राण हरण्यासाठी साक्षात यमराज येतात. इथून पुढे ही कथा अतिशय रंजक जाते. कारण त्यात सावित्रीचं वाक्चातुर्य आणि वाक्पटुत्व उलगडत जातं. एखाद्या कोर्टरूम ड्रामामध्ये एखादा निष्णात वकील जशी अशिलाची बाजू मांडतो, तशी ती स्वतःची आणि नवर्याची बाजू यमराजासमोर मांडत जाते. यम राज ही भारतीय प्राचीन वाययातील विलक्षण अशी व्यक्तिरेखा.

याचं दुसरं नाव धर्मराज असं आहे. कारण तो नीतिनियमांचं पालन करताना कोणत्याही प्रकारच्या काम- क्रोध- लोभ- मोह- मद- मत्सर या सहा विकारांना दूर ठेऊन आपले निर्णय घेत असतो. प्रत्येक सजीवाच्या मृत्यूची आणि त्याची कृत्यानुसार वागणूक देण्याची जबाबदारी सर्वस्वी यमराजाचीच असल्यामुळे तो न्यायकर्ता आहे. त्यामुळे त्याच्या समोर आपली केस (अभियोग) ठेवताना अतिशय काळजीपूर्वक आणि नेमके तेच बिंदू मांडावे लागतात.

सावित्रीत ही कौशल्य पुरेपूर भरलेली आहेत. तिची वाणी आणि तिची कृती अस्सल भारतीय परंपरांना साजेशी आणि मर्यादाशील आहे. यमराजानं सत्यवानाचे प्राण हरण केले आणि ते यमलोकाच्या दिशेनं निघाले. नवऱ्यांच प्रेत तिथेच सोडून सावित्रीदेखील त्याच्या पाठोपाठ निघाली. ते रेड्यावर आणि ती पायी. तिला मागे येताना बघून यमराज थांबले. त्यांनी तिला पतीच्या प्रेताचं और्ध्वदैहिक म्हणजे दहनादि क्रिया करण्याचा सल्ला दिला. त्यावर ती ठाम स्वरात म्हणाली की, ममाझे पती जिथे जातील किंवा त्यांना जिथे नेलं जातंय तिथे जाणं हाच पत्नी म्हणून माझा पतिव्रता धर्म आहे आणि त्याचं पालन मी करते आहे. तिच्या स्वरव्यंजनांच्या अचूक उच्चारांनी आणि शब्दांच्या योग्य योजनेनं धर्मराज प्रसन्न होतो.

तिनं परत जावं म्हणून तिला तीन वर देतो. तिच्या सासर्यांची दृष्टी आणि बल परत यावं. सासर्याचं गेलेलं राज्य परत मिळावं आणि तिच्या वडिलांचा वंश चालावा म्हणून त्यांना पुत्र व्हावा असे तीन वर मागून घेते.

यमराज तिला तथास्तु म्हणतात आणि चालायला लागतात. तरीही ती त्यांच्यामागोमाग चालतच राहते. आता काय? असा प्रश्न विचारल्यावर पुन्हा ती तिच्या पतिव्रता धर्माचा संदर्भ देते. ते तिला शंभर औरस पुत्र होतील, असा आशीर्वाद देतात. त्यामुळे त्यांना सत्यवानाचे प्राण परत द्यावे लागतात.

हा सगळा प्रसंग घडत असतो, त्यावेळी सावित्रीनं यमराजांशी मैत्री केलेली आहे. त्यासाठी ती शब्द वापरते सखा साप्तपदिनः सात पावलं सोबत चालल्यामुळे झालेला सखा. त्याचाच आधार घेऊन तिची बाजू मांडते.

वाटाघाटी करते. साक्षात यमराजासारख्या धर्म नीतिनियमांच्या ज्ञात्याला तिला हितकर आणि श्रेयस्कर असं सारं काही देण्यासाठी बाध्य केलं. ती तिच्या पतीवर आणि संपूर्ण परिवारावर प्रेम करणारी सुविद्य, सुसंस्कारी, मृदुभाषी, विवेकी, प्रगल्भ आणि मेधावी स्त्री आहे. आजच्या भाषेत ती एक उत्कृष्ट निगोशिएटर आहे. अशा या सावित्रीची ही आठवकथा...


बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे


# संतांचे भाषिक आदानप्रदान

मराठी संतांच्या गद्य- पद्य रचनांपासून प्रेरणा घेऊन इतर भाषक संतांनी, कवींनी त्यांच्या भाषेत काव्यरचना करणे किंवा इतर भाषकांपासून प्रेरणा घेऊन मराठी भाषक संतांनी गद्य- पद्य रचना करणे या दोन्ही प्रक्रिया भाषिक आदान-प्रदानाच्या सांस्कृतिक कार्याची महत्ता अधोरेखित करणाऱ्या आहेत. १३ व्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रात भाषिक आदान- प्रदानाच्या सांस्कृतिक प्रक्रियेतून संतांनी भाषिकस्वातंत्र्य, भाषिकसमता आणि भाषिक बंधुता निर्माण करण्याचे प्रयत्न केले. संतांचे हे सांस्कृतिक कार्य भाषाभानाची प्रगल्भ जाणीव देणारे आहे, या जाणिवेतून लोकजिव्हेवर असणारे विविध भाषांमधील शब्द संतांनी सहज स्वीकारले आहेत. मराठी आणि कानडी या भाषा भगिनी आहेत. मराठी माणसांच्या बोलण्यात कानडी शब्द होते. कानडी आणि मराठी या भाषांमध्ये शब्दांची देवघेव सुरू होती. कन्नड कवी कुमारव्यासांच्या कन्नड भारतात बोली भाषेत असणारे फारसी, अरबी, मराठी शब्द सहजपणे आले आहेत. तर, कलाकवी मुक्तेश्वराने आपल्या महाभारतात प्रारंभी व्यासांसह कन्नड कवी कुमारव्यासांचेही नमन केले आहे.

भाषांचे परस्पर साहचर्य हे भाषा आणि समाज जिवंत असण्याचे लक्षण आहे. भाषांचे परस्पर साहचर्य आणि लोकभाषा किंवा बोलींचे प्रवाही जिवंत रूप या दोहोंचे सामर्थ्य नाथसंप्रदायाने नेमके ओळखले आहे, त्यामुळे या संप्रदायाच्या बैरागी भाषेतील साहित्य संपदेचे नाते भारतातील विविध प्रांतातील लोकभाषांशी आहे. भाषेच्या संमिश्र स्वरूपातून भारतातील भिन्न भिन्न भाषक समुदायांमध्ये वैचारिक आदान-प्रदानाची प्रक्रिया गतिमान करण्याच्या संदर्भातले गोरक्षनाथांसह इतर नाथपंथीयांचे प्रयत्न फार महत्त्वाचे आहेत.

गोरखवाणीमध्ये मराठी बोलीतील अनेक शब्द आले आहेत. गोरक्षनाथांच्या गोरखवाणी आणि नाथपंथीयांच्या इतर अनेक रचनांवर मराठी भाषेचा जसा संस्कार आहे तसाच गोरक्षनाथांच्या आणि इतर नाथपंथीयांच्या बैरागी भाषेचा संस्कार, महात्मा चक्रधरांच्या निरूपणासह नामदेवांपासून तुकारामापर्यंतच्या अनेक संतांच्या काव्यरचनेवर झालेला आहे. म्हणूनच मगोरक्षनाथांचा विराट आत्मा चक्रधरांच्या नाडीतून वाहतो आहे, ज्ञानेश्वरांच्या श्वसनातून दरवळतो आहे, कबिराच्या कंठातून हुंकारतो आहे, नानकाच्या समदृष्टीतून बरसत आहे आणि समग्र संतवाणीतून गंगेसारखा धावत आहे. हे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे विधान गोरक्षनाथांच्या भाषा प्रभावाच्या आणि भाषिक आदान- प्रदान प्रक्रियेच्या दृष्टीने फार अन्वर्थक आहे. मानवी समूहाला जसा विशिष्ट सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय इतिहास असतो, तसाच त्या समूहाच्या विशिष्ट शब्दांनाही इतिहास असतो. जेव्हा भिन्न भाषा बोलणारे मानवी समूह विशिष्ट सांस्कृतिक, सामाजिक, राजकीय परिस्थितीत एकमेकांच्या नित्य संपर्कात येतात, तेव्हा सांस्कृतिक- वैचारिक आदान- प्रदान प्रक्रियेत कळत- नकळत भाषिक आदान- प्रदानाची प्रक्रिया घडत असते. या प्रक्रियेचा प्रारंभ शाब्दिक आदान- प्रदानाद्वारा घडत असतो, म्हणूनच भाषेतील शब्दांतील स्थित्यंतरे ती भाषा बोलणार्या समाजातील स्थित्यंतरांचे निर्देशनच करीत असते तसेच एका भाषेतील शब्दांचे दुसऱ्या भाषेत स्थलांतर होणे म्हणजे समाजाचे सांस्कृतिक आकलन वृद्धिंगत होणे होय. संत नरसी मेहता यांच्या गुजराती भाषेतील काव्यरचनांमध्ये मराठी शब्द आढळतात. नरसी मेहता नामदेवांचा गौरवपूर्वक उल्लेखही करतात. नामदेवांच्या कर्तृत्वाने प्रभावित झालेल्या नरसी मेहतांनी वैचारिकदृष्ट्या नामदेवांचा वारसा स्वीकारतानाच कळत- नकळत मराठी भाषेतील शब्दही स्वीकारले.

नामदेव नरसी मेहता यांच्यानंतर कितीतरी वर्षांनी तुकाराम नरसी मेहतांचे आख्यान रचतात. नामदेवांचा वैचारिक वारसा स्वीकारणारे तुकाराम नामदेवांच्या कर्तृत्वाने प्रभावित झालेल्या नरसी मेहतांचे गुजराती साहित्य वाचतात म्हणजे गुजराती भाषेचे अध्ययन करतात. नामदेवांचे विचार स्वीकारताना कळत- नकळत नरसी मेहतांनी मराठी शब्द स्वीकारले आणि नामदेवांचा वैचारिक वारसा स्वीकारताना तुकारामांना नरसी मेहतांच्या काव्यरचनांसाठी गुजराती भाषा समजून घ्यावी लागते. भाषिक आदान-प्रदानाची सांस्कृतिक प्रक्रिया वैचारिक आदान- प्रदान प्रक्रियेशी सुसंवादी असते.

साहित्य, विचार, ज्ञान हे कोण्या एका भाषकांपुरते मर्यादित नसावे, ते सर्वांसाठी असावे, असे प्रगल्भ भाषाभान नामदेव, एकनाथ, तुकाराम, रामदास या मराठी संतांसह भारतातील विविध भाषांमध्ये साहित्यनिर्मिती करणाऱ्या अनेक संतांना होते म्हणूनच संत वैचारिक आदान- प्रदान निकोप दृष्टीने करू शकले. एकनाथांनी महिंदू तुर्क संवादफ या प्रकरणातून दोन भिन्न धर्मीयांसह हिंदी- मराठी या दोन भाषा भगिनींमध्ये ही समन्वयाची सुसंवादाची गरज अन्वर्थकतेने प्रतिपादन केली. तुकारामांच्या ठायी प्रगल्भ असे भाषाभान असल्याने हिन्दी, दखनी या भाषांमधील तुकारामांच्या रचना, त्यांच्या काव्यातील शब्दसंपदा यांचा गंभीरपणे विचार केला असता असे लक्षात येते की सामंजस्याची, समन्वयाची, प्रबोधनाची सांस्कृतिक आणि राष्ट्रीय दृष्टी तुकारामांच्या ठिकाणी होती.

काव्यनिर्मितीच्या प्रेरणा जेव्हा समाजप्रबोधनाच्या जाणिवेशी नाते प्रस्थापित करतात तेव्हा विधायक विचारांचे काव्य निर्माण होते. महाराष्ट्रातील संतांनी आपल्या साहित्यातून असे भाषिक आदान-प्रदानाचे सांस्कृतिक कार्य केले तसे भारतातील विविध प्रांतातही वेगवेगळ्या भाषांमध्ये सुरूच होते. संतकवींचे भाषाभान प्रगल्भ होते. भाषेच्या पावलावर पाऊल ठेवून संस्कृती चालत असते, लोकमानसात परिवर्तन घडवून आणायचे असेल तर लोकभाषेतूनच विचार सांगितले पाहिजे, याची जाणीव मराठीसह एकूणच भारतीय संतांना होती. तामिळ संत कंबन कन्नड, संस्कृत तेलुगु भाषांमधील शब्दांचा वापर करतात. केरळचे संतकवी पंतानम् यांनी कलिकत राजदरबारात मल्याळम या बोलीभाषेत काव्यगायन केले. मणिप्रवाळ शैली म्हणजे संस्कृत व मल्याळम् शब्दांनी युक्त अशी भाषा पूंतानम् वापरतात. पालकुर्ती सोमनाथ या तेलुगु संतकवीने आपल्या तेलुगु काव्यात मराठी ओळींची जाणीवपूर्वक निर्मिती केली. शहा मुंतोजी ब्रह्मणी, हुसेन अंबरखान, अलमखान, शेख महंमद, शहा मुनी या आणि इतर अनेक मुसलमान संतकवींनी मराठी भाषेतून रचना केली. समर्थ रामदासांनी दक्षिण भारतात मराठी साहित्य व संस्कृतीचा प्रसार केला. वीरशैव संतांनी तेलुगू, मराठी व कन्नड भाषेत बसवेश्वरांचे साहित्य आणि विचार सांगितले. ही आणि अशी कितीतरी उदाहरणे मराठी संतांप्रमाणेच भारतातील इतर भाषक संतांच्या भाषिक आदान- प्रदानांच्या सांस्कृतिक कार्याची महती सांगणारी आहेत.

(पान ६ वर)





पर्यटन
भ्र. ९४०३७४९९३२
विश्वास देशपांडे


# उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास- भाग ५

आजचा आमच्या सहलीचा सहावा आणि अखेरचा दिवस. आज सकाळीच जिम कॉर्बेटच्या सफारीसाठी निघायचे होते. सकाळी साडेचारलाच उठलो. तयार होऊन बसमध्ये बसलो. जिम कॉर्बेट अभयारण्यापासून आमचे हॉटेल साधारण दहा किमी लांब होते. बरोबर पाच साडेपाचच्या सुमाराला जिम कॉर्बेटच्या धनगरी गेटजवळ पोहोचलो. तिथे सफारी जीप्स तयारच होत्या. तेथील अधिकाऱ्यांनी आमची आधार कार्ड्स ओळखीसाठी मागितली. जिम कॉर्बेट पार्कमध्ये मोबाईल नेण्यास बंदी घातली आहे. त्यामुळे मोबाईल गेटजवळ असलेल्या लॉकर्समध्ये जमा करावा लागतो. सफारी संपल्यावर आपल्याला तो परत मिळतो. वनाधिकाऱ्यांच्या परवानगीने कॅमेरा नेता येतो.

जिम कॉर्बेट हा भारतातील सर्वात जुना आणि पहिला व्याघ्रप्रकल्प आहे. इंग्रज वंशीय भारतीय शिकारी जिम कॉर्बेट यांचे नाव या अभयारण्याला देण्यात आले आहे. नामशेष होत चाललेल्या बंगाली वाघांचे संरक्षण करणे हा या पार्कचा प्रमुख उद्देश होता. त्यामुळे या प्रकल्पात वाघ हे पर्यटकांचे प्रमुख आकर्षण असतेच. आजमितीला जवळपास दोनशे पन्नास वाघ या अभयारण्यात आहेत अशी माहिती आमच्या गाईडने दिली. त्याशिवाय हत्ती, अस्वले, विविध वन्य प्राणी, पक्षी आणि वनस्पतींच्या विविध प्रजातींनी हे जंगल समृद्ध आहे. जिम कॉर्बेटमध्ये जाण्यासाठी अनेक प्रवेशद्वारे आहेत. धनगरी किंवा धनगडी या प्रमुख गेटवरून आम्ही जीप सफारी घेतली. एका जीप सफारीसाठी साधारणपणे ७५०० रू एवढे शुल्क आकारले जाते. एका जीपमध्ये सहा व्यक्तींना परवानगी आहे. या जीप्स उघड्या असतात. त्यामुळे जंगलाचे सौंदर्य मनसोक्त पाहता येते. उन्हाळ्याच्या दिवसात सकाळी साडेपाच ते साडेआठ किंवा सहा ते नऊ वाजेपर्यंत या जंगल सफारी चालतात. संध्याकाळी तीन ते सहा अशी साधारण वेळ असते. उन्हाळा किंवा हिवाळा या ऋतूंप्रमाणे वेळा थोड्या बदलतात. गेटवरील सर्व सोपस्कार आटोपून आमची जीप सफारी ढिकला क्षेत्रात जाण्यासाठी निघाली. सकाळची वेळ होती. प्रसन्न वातावरण होते. वातावरणात सुखद गारवा होता. गाडी लवकरच घनदाट जंगलात शिरली. रस्ते कच्चे आणि खडकाळ होते. पण सकाळच्या वेळी जंगलातील वातावरण पाहून मन अगदी हरखून गेले. इतके सुंदर जंगल एवढया सकाळी कधी पाहिले नव्हते.

सकाळबरोबरच जंगलातील वातावरणही जणू उमलतं. एक नवी कोरी सकाळ तुम्हाला बघायला मिळते. जंगलातील झाडांचा गंध काही वेगळाच असतो. आपल्या रोजच्या शहरी वातावरणात हा गंध आपल्याला कधी अनुभवायला मिळत नाही. हवा अतिशय शुद्ध होती. ही हवा मी मनसोक्त फुफ्फुसात भरून घेत होतो. थोडेसे अंतर पुढे गेल्यानंतर आम्हाला हरणांचे कळप दृष्टीस पडले. आता या जंगलातील प्राण्यांना बहुधा माणसांची सवय झाली असावी.



त्यामुळे जीप पाहूनही त्यांना काही फरक पडला नाही. ते आपले मजेत चरत होते. माकडांच्या टोळ्याही ठिकठिकाणी होत्या. विविध रंगीबेरंगी पक्षी आपल्या मधुर आवाजाने सकाळची भूपाळी गात होते. आणखी काही अंतर पुढे गेल्यानंतर पूर्ण पिसारा फुललेले मोर दृष्टीस पडले. जंगलात मधून मधून मुंग्यांच्या वारुळासारखी घरे दृष्टीस पडत होती. परंतु ती वाळवीची घरे आहेत असे आमच्या गाईडने सांगितले. ही घरे फारच सफाईदार पद्धतीने बांधलेली असते. त्यात अगदी शेवटपर्यंत हवा खेळती राहते. त्यामुळे या छोट्या जीवाचे कौतुक वाटल्याशिवाय राहत नाही. वाळवीचे आणखी एक वैशिष्ट्य गाईडने सांगितले की ती हिरव्या किंवा जिवंत झाडाला कधीच लागत नाही. वाळलेले लाकूड हे तिचे खाद्य! त्यामुळे लाकडाचे लवकर विघटन होऊन पर्यावरणात ते मिसळून जाते. अशा रीतीने वाळवी पर्यावरणासाठी सहायक ठरते.



या अभयारण्यात प्राण्यांसाठी ठिकठिकाणी पाण्याचे नैसर्गिक स्रोत आहेत. अशाच एका नाल्यात आम्हाला एक झाड पडलेले दिसले. त्या झाडाच्या एका फांदीलगत एक घोरपड दृष्टीस पडली. मध्येच रानडुकरांच्या काही टोळ्या आमच्यासमोरून गेल्या. भव्य अशा गरुड पक्ष्याचे दोन तीन वेळा दर्शन घडले. हा सरपन्ट ईगल आहे अशी माहिती आम्हाला मिळाली. जंगल नैसर्गिक आणि स्वच्छ राहण्यात इथले वनाधिकारी, गाईड आदी लोक महत्वाची भूमिका बजावतात. आपल्याजवळील खाद्यपदार्थांचे वेष्टन, कागद, प्लॅस्टिकच्या पिशव्या आदी गोष्टी ते जंगलात टाकू देत नाहीत. प्राण्यांना माणसांपासून कमीत कमी त्रास किंवा उपद्रव व्हावा याची काळजी ते घेतात.

जंगल सफारीचा वेळ आता संपत आला होता. बरेच फिरल्यावर देखील आम्हाला वाघ किंवा हत्ती वगैरे दिसले नाहीत. आमचा गाईड म्हणाला की वाघ दिसणे हा नशिबाचा भाग आहे. आमच्यातील काही मंडळी वाघ दिसला नाही म्हणून जरा नाराज झाली होती. पण मी त्याबद्दल फार काही वाटून घेतले नाही. याची दोन कारणे होती. एक म्हणजे वाघाचे दिसणे जरा दुर्मिळ आणि नशिबाचा भाग आहे हे मी जाणून होतो. आणि चंद्रपूरजवळील ताडोबाच्या अभयारण्यात मी वाघांना गाडीजवळून जाताना पाहिले होते. दुसरी गोष्ट म्हणजे मी केवळ वाघ पाहण्याच्या उद्देशाने गेलो नव्हतो. पहाटेच्या वेळी जंगल पाहणे आणि अनुभवणे हा माझा उद्देश होता. तो सफल झाला होता. जंगल पाहून मी ताजातवाना झालो होतो.

सफारीनंतर आम्ही हॉटेलवर परतलो. फ्रेश होऊन नाश्ता घेतला. थोडा आराम केला. परत धनगरी कॉर्बेट म्युझियम पाहण्यासाठी निघालो. जिम कॉर्बेट अभयारण्यातील वन्यजीवांची माहिती, मगर, वाघ, सांबर, हत्ती आदींचे जतन केलेले अवशेष इथे बघायला मिळतात. वन्य जीवांची माहिती आणि जिम कॉर्बेट अभयारण्याचा इतिहास या ठिकाणी आपल्याला जाणून घेता येतो. याच ठिकाणी एक सुवेनिर शॉप आहे. तिथे जिम कॉर्बेटबद्दल आणि वन्य जीवांबद्दल माहिती देणारी पुस्तके, हस्तकलेच्या माध्यमातून तयार केलेल्या विविध वस्तू आपण खरेदी करू शकतो.

दुपारी जेवणासाठी आम्ही पुन्हा हॉटेलवर परतलो. सुग्रास भोजनाचा आस्वाद घ्यायला मिळाला. विविध खाद्यपदार्थांची रेलचेल होती. जेवणानंतर थोड्या वेळाने आम्ही पुन्हा जिम कॉर्बेट यांचे निवासस्थान असलेल्या काळाढुंगी येथे गेलो. आपल्याला कल्पना असेल की जिम कॉर्बेट हे इंग्रज वंशाचे पण भारतीय शिकारी होते. ते केवळ शिकारी नव्हते तर वन्यजीवांचे अभ्यासक, एक उत्तम लेखकही आणि संशोधकही होते. त्यांनी ज्या शिकारी केल्या त्या केवळ नरभक्षक वाघांच्या केल्या.

(पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, ५ जुलै ते शनिवार, ११ जुलै २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार

'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, ५ जुलै-** भवानगिरी महाराज संजीवन समाधी शिरभावी (ता. सांगोला), तुळजाभवानी- भवानीशंकर मंदिर वर्धापन दिन कळस (ता.इंदापूर) ✻ **सोमवार, ६ जुलै-** पुनर्वसु रवि १२:०३ (वाहन घोडा), सप्तमी श्राद्ध, रामदासबाबा भालेराव महाराज पुण्यतिथी पेठ (आंबेगाव), संत किसनदास महाराज पुण्यतिथी ✻ **मंगळवार, ७ जुलै-** संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान देहू (जि. पुणे), कालाष्टमी, अष्टमी श्राद्ध ✻ **बुधवार, ८ जुलै-** संत ज्ञानेश्वर माऊली पालखी प्रस्थान आळंदी, पंचक समाप्ती दु.३.५९ समाप्ती, नवमी श्राद्ध ✻ **गुरुवार, ९ जुलै-** दशमी श्राद्ध, राजमाता जिजाऊ पुण्यतिथी (तिथीप्रमाणे), नृसिंह वर्धापन महोत्सव कणंगले, श्री दाविद महाराज पुण्यतिथी माधवनगर (सांगली) ✻ **शुक्रवार, १० जुलै-** योगिनी (स्मार्त) एकादशी, संत निवृत्तीनाथ यात्रा त्र्यंबकेश्वर, समर्थ संजीवास्वामी पुण्यतिथी नाझरे (ता. सांगोला), मातृसुरक्षा दिन, संत प्रल्हाद महाराज समाधी श्रीगोंदा ✻ **शनिवार, ११ जुलै-** भागवत एकादशी, संत निवृत्तीनाथ पुण्यतिथी त्र्यंबकेश्वर, जागतिक लोकसंख्या दिन

**मुहूर्त:-** ✻ **साखरपुडा-** ७, ८, ११ (११ नंतर) जुलै ✻ **बारसे-** ५ जुलै (१४ पर्यंत), ११ जुलै (११ नंतर) ✻**जावळ-** ५, ८, ९ जुलै ✻ **गृहप्रवेश-** ५ जुलै, ८ जुलै, (१२ पर्यंत), ११ जुलै (११ नंतर)

### मेष :- थेंबे- थेंबे तळे साचे

जीवनात सर्वात खोल समज निवांततेत जन्माला येत नाही. मंगळाबरोबर हर्षल त्यामुळे सध्या संघर्ष करावा लागेल. थेंबे- थेंबे तळे साचे हे कायम लक्षात ठेवायला हवे. कार्य सिद्धीसाठी सातत्य आवश्यक ठरते. धरसोडपणा टाळला तर चांगले मार्गक्रमण आपण करू शकाल. नव्या विचारांना विचाराने चालना द्यावी. सुख स्वास्थ्य लाभेल. शुभ ता. ७, ९

### वृषभ:- सामंजस्याने रहावे

कधी परिस्थितीमुळे आपला विश्वास डळमळतो, त्यामुळे परिस्थिती आपल्या हाताबाहेर जाणार नाही याची सदैव काळजी घ्यावी. विचाराने रहा, विचाराने कार्यसिद्धी होते, मनोधैर्याने नाही. विनाकारण धावपळ करणेही सध्या टाळायला हवे. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घेऊन वाटचाल करावी. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. शुभ ता. ५, ९

### मिथुन:- माणसे पारखून घ्या

भगवद्गीता म्हणजे ग्रंथ नाही, ती अंतर्गत स्पष्टता आहे. राशीतील रवि- बुधामुळे नव्हे तर व्ययातील मंगळ- हर्षलमुळे आपणास बरेच काही शिकायला मिळणार आहे. माणसे फक्त जमवू नका तर ती पारखून जमवा. आर्थिक बाबतीत फार चिंता करू नका. सर्व समस्यातून मार्ग निघत जाईल. अनावश्यक खर्च कसोशीने टाळावेत. डोळ्यांचीही काळजी घ्यावी. शुभ ता. ८, ११

### कर्क:- चणे खावे लोखंडाचे

जीवनाचे खरे शिक्षण समस्या नसताना होत नाही. सुखात असताना माणसाला खर्या अर्थाने जीवन बोध होत नसतो. चणे खावे लोखंडाचे असे उगाच म्हटले आहे का? गुरुकृपेने सत्याची वाटचाल निश्चितच चांगली होत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. सरकारी कामे विलंबाने होतील. शुभ ता. ७, ९

### सिंह:- अविचार अविचारच असतो

पुढे जाणं कठीण, मागे वळणे अशक्य. तो क्षण म्हणजे आपले कुरुक्षेत्र. राशीत शुक्र- केतू तर अष्टमात शनि- नेपच्यून त्यामुळे सर्व क्षण विचाराने व अनुभवानेच जगायला हवेत. कोणताही अविचार हा अविचारच असतो. शॉर्टकट जीवनात काही गोष्टी लवकर कट करतो. कार्यक्षेत्रात नेहमी जागृत रहावे. अनाठायी संघर्षही त्रासदायकच ठरण्याची शक्यता असते. शुभ ता. ७, ९

### कन्या:- षडरिपूपासून सावध रहावे

संघर्ष म्हणजे अपयश नाही. अंतर्गत जागृतीचा क्षण असतो. कर्मस्थ रवि- बुधामुळे कार्यक्षेत्रात चांगले मार्गक्रमण करू शकाल. नोकरी, व्यवसायात चांगल्या संधी अनुभवू शकाल. संततीबाबतच्या समस्या हलक्या होऊ शकतात. प्राप्तीचे प्रमाणही समाधानकारक राहील. षडरिपूपासून सावध राहिला हवे. ते केव्हाही आपल्याला खिंडीत गाठू शकतात. शुभ ता. ७, ८, ९

### तुला:- उडदा माजी काळे-गोरे

जीवनातील सर्वात खोल समज नेहमी युद्धाच्या मध्यभागी जन्माला येतो. अष्टमातील मंगळ- हर्षल आपणास सध्या बरेच काही शिकवणार आहे. उडदा माजी काळे-गोरे विचारानेच निवडावे लागतील. ज्ञानदान, बँक, विमा अशा क्षेत्रात चांगले मार्गक्रमण करू शकाल. प्रकृतीच्या तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. अंगीकृत कार्यात प्रगती होत जाईल. शुभ ता. ५, ९, ११

### वृश्चिक:- स्वमताग्रह टाळावा

शांतपणे स्वतःला विचारा, आपल्या आयुष्यात कोणतं रणांगण उभे आहे. राशी समोरच राशीस्वामी मंगळ- हर्षल उभा आहे. त्यामुळे पी हळद आणि व्हा गोरे, अशी भूमिका ठेवू नका. दैवीकृपेने विविध समस्यांवर यशस्वीरित्या मात करू शकाल. कौटुंबिक जीवनात स्वमताग्रह टाळावा. सामंजस्याने राहिलात तर विविध प्रश्न सोडवू शकाल. शुभ ता. ९, ११

### धनु:- विकारांपासून सावध रहा

नाव आणि बदनामी यात मोठा फरक असतो. वेळच तो ठरवितो. सुखस्थानी शनि- नेपच्यून समवेत जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन लगेच बदलू नका. विचारानेच तो साध्य करता येईल. संघर्ष करायचा, पण तो योग्य ठिकाणी हवा. काम-क्रोधादि विकारापासून सावध रहावे. ते आपले अधःपतन करू शकतात. स्वार्थी मित्रांपासून दूरच रहावे. शुभ ता. ९, ११

### मकर:- नव्या संधी सोनंच समजा

आपुलकीच्या नात्याला कधी दुरावा माहीत नसतो. राशी समोरच गुरु उच्च राशीत त्यामुळे आपले विचारही उच्च राहिला हवेत, असायलाही हवेत. कार्यक्षेत्रात निर्धाराने वाटचाल करू शकाल. नव्या कामांना गती देता येईल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. अडचणींवर मात करू शकाल. नव्या संधीना सोनेचं समजा. वेळीच स्वीकारा. शुभ ता. ५, ७

### कुंभ:- कालापव्य टाळावा

चालायला एक रुपयाही खर्च करावा लागत नाही. सर्वच बाबतीत प्रथम चालायला हवे. राशीतील राहू विनाकारण कालापव्य करणारा आहे. उद्या बघू, नंतर बघू अशी भूमिका नुकसानीची ठरू शकते. घरातील वातावरण ही किरकोळ कारणांवरून बिघडू देऊ नका. शिक्षण अनुभवाचा पुढील वाटचालीस चांगला उपयोग होऊ शकेल. शुभ ता. ९, ११

### मीन:- चालणं म्हणजे गतिमानता

गवतावर अनाठायी चाललं की, मन शांत होतं. तेही फुकट. चालणं म्हणजे गतिमानता आहे. सशाला पुढे जाऊ द्या, विजय शेवटी आपलाच आहे. श्रमाच्या मानाने यश कमी म्हणून लगेच निराश होऊ नका. देव- दैव आपले श्रम नेहमीच मोजत असते. फळ आज नाहीतर उद्या निश्चितच मिळतं. प्राप्तीचे प्रमाण समाधानकारक राहील. शुभ ता. ७, ९, ११

!! शुभ भवतु !!

पान ३ वरून

# क्रोकरी

तो प्याला त्यांनी स्वतःकडे ठेवून दिला. सूनबाईंना त्यामागील रहस्य कळले नव्हते. खूप विचारणा केल्यावर सासूबाईंनी तिला सांगितले- 'अगं बाळ, तुझा नवरा जेव्हा फार लहान होता तेव्हा ना त्याला जेवताना खूप ठसका लागायचा. त्यावेळी त्याला मी याच प्याल्याने पाणी पाजायची. माझा अंधविश्वास असेल, पण या प्याल्याने पाणी पाजले की त्याचा ठसका थांबायचा. म्हणून मी हा प्याला कायम त्याच्यासाठी माझ्याजवळ ठेवायची. आता तो इतका मोठा झाला तरीही त्याला ठसका लागतो, मला ठाऊक आहे. त्याला ठसका लागलेला मला माझ्या खोलीत कळतो. तू त्याला औषध देतेस. पण यापुढे त्या औषधानेही त्याला बरे वाटले नाही आणि त्याची इच्छा असेल तर त्याला माझ्या खोलीत पाठव. या प्याल्याने माझ्या लेकाला पाणी पाजून मी त्याचा ठसका बसविण्याचा प्रयत्न करीन.' हे सारे ऐकल्यावर सूनबाईंच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या आणि सारे जुने प्याले तिने पुन्हा त्यांच्या मूळ जागी ठेवून दिले.

काचेच्या प्याल्यांचा विचार सोडूनच दिला. ती देखील संवेदनशील होती म्हणून तिला त्या प्याल्यांमधील भावनिक गुंतणूक कळू शकली. अशी संवेदना मनात जागृत असायला हवी असे वाटते अन्यथा जुन्या भांड्यांना क्रोकरीसाठी जागा उपलब्ध करून द्यावीच लागेल. ती क्रोकरी काचेच्या कपाटात फारच आकर्षक दिसेल, पण त्याच्याशी आपले नाते मात्र जोडले जाणार नाही. त्याचे काय करावे?

## दर्शन घडो या वारकऱ्याला...

पाऊले निघाली
विठ्ठलाच्या वारीला
संतांच्या जयघोषात
हरिनाम दुमदुमला
मनी ध्यानी लागे
हुरहुर जीवाला
यंदाही दर्शन घडो
वारकर्याला

आषाढी कार्तिकी
नेम नाही चुकला
माझ्या विठूच्या भेटीला
जीव तळमळला
तुझ्या पायाखालची वीट
व्हावे मजला
यंदाही दर्शन घडो या
वारकऱ्याला

साजऱ्या त्या रूपाला
आहे
आभाळाएवढी माया
पंढरपुरी जाया होई
तयार जिवा शिवा
जय हरी विठ्ठल नाद
आसमंती घुमला
यंदाही दर्शन घडो या
वारकऱ्याला

भक्तासाठी तू रांजण
भरले
जनाबाईचे धान्य दळले
पुंडलिकाच्या विटेवर
उभा विठुराया

बघाया व्याकुळ वारकरी
झाला
यंदाही दर्शन घडो या
वारकर्याला.

सुवर्णा फडणवीस

## पादुका

संतांच्या पादुका
आहे वंदनीय
दाविती सन्मार्ग
आपणासी...१..

पादुकांच्या ठायी
साधनेची शक्ती
ईश्वरीय भक्ती
अंतर्यामी...२....

पदीच्या पादुका
बसे सिंहासनी
ऐश्वर्याच्या धनी
कर्मयोगे...३...

पादुका पूजन
नव्हे उपचार
संतांचे विचार
मार्गदर्शी... ४....

पादुका प्रतीक
योग तपस्येचे
स्थान पावित्र्याचे
पूजनीय ...५...

मंजुषा शिनखेडे



**तत्त्वदर्शन** डॉ. राजेंद्र डोळके

# भगवद्गीतेची महानता




भगवद्गीता हे इतिहास पुराणात्मक वाययातील उच्चतम रत्न आहे. या ग्रंथाला जगाच्या चिरंतन वाययात स्थान लाभले आहे. मानवाच्या वैचारिक इतिहासाचा एक टप्पा म्हणून गीतेकडे पाहिले जाते. परंतु मानवी इतिहासाचा एक टप्पा एवढेच त्याला महत्त्व नसून त्यात अनेक चिरंतन वैचारिक मूल्यही आहेत. ही चिरंतन मूल्ये सर्वच प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानात्मक आणि धर्मप्रधान ग्रंथांत सांगितली आहेत. परंतु गीतेत ती मार्मिक, नेमकी आणि आटोपशीररीतीने सांगितली आहेत. इतर ग्रंथांसारखा अनावश्यक फापटपसारा गीतेत नाही.

गीतेची थोरवी काय वर्णावी! हा इतका अद्वितीय आणि पवित्र ग्रंथ समजला जातो की, न्यायालयात शपथ घेताना याच ग्रंथावर हात ठेवावा लागतो. चाफेकरांनी फासावर लटकताना भगवद्गीताच हातात घेणे पसंत केले होते. यातील तत्त्वज्ञानाने तर बुद्धिवंतांना इतके मोहित केले की, अनेक थोरांनी त्याच्या रूपांतरात, विशदीकरणात आणि भाष्यीकरणात आपली बुद्धी खर्ची घातली आहे. यात शंकराचार्य दिसतात. ज्ञानेश्वर, वामन पंडित दिसतात. आधुनिक काळात एडविन आर्नोल्ड (इ. स. १८३२- १९०४) या पाश्चात्त्य विद्वानाने गीतेचा The Song Celertial or भगवद्गीता या नावाने अनुवाद केला होता. हा अनुवाद वाचूनच महात्मा गांधी गीतेच्या प्रेमात पडले होते. लोकमान्य टिळक, आचार्य विनोबा भावे यांचे गीताप्रेम आणि गीताभ्यास तर सर्वविख्यात आहे. याच परंपरेत आणखी इतरही विद्वान आहेत. अशा या थोर लोकांनी गीतेच्या प्रेमात पडावे यावरूनच गीता हा ग्रंथ किती महान आणि अद्वितीय असावा, याची कल्पना येते. खुद्द श्रीकृष्णानेच म्हटले की, मला या ग्रंथासारखा ग्रंथ पुन्हा सांगता येणार नाही. महाभारत युद्ध संपल्यानंतर युधिष्ठिराच्या राज्याभिषेकावेळी अर्जुनाने श्रीकृष्णाला म्हटले की, मला ते युद्धारंभी सांगितलेले दिव्य ज्ञान पुन्हा सांग. कारण ते माझे नष्ट झाले आहे. त्यावर श्रीकृष्णाने... **परं हि ब्रह्म कथितं योगयुक्तेन चेतसा। न शक्यं तन्मया भूयस्तथा वक्तूमशेषतः।। सहि धर्मः सुपर्याप्तो ब्रह्मणः परिवेदने। न च साद्य पुनर्भूयः स्मृतीमें संभवष्यिती।।** (अश्वमेधपर्व, अ. १६) असे उत्तर दिले. मला ही भगवद्गीता पुन्हा सांगता येणार नाही.

श्रीकृष्णाच्या या एकाच वाक्यात भगवद्गीतेचे श्रेष्ठत्व उत्तम रीतीने प्रतिपादिले आहे. तरीपण अर्जुनाने खूपच आग्रह केल्यानंतर श्रीकृष्णाने त्याला जे ज्ञान दिले किंवा जी गीता सांगितली त्याला अनुगीता असे म्हणतात. अनु म्हणजे अनुकरण. भगवद्गीतेच्या अनुकरणाने ती सांगितली म्हणून ती अनुगीता. परंतु या गीतेला भगवद्गीतेची सर नाही. शिवाय ही गीता खुद्द श्रीकृष्णोक्त आहे किंवा नाही याबद्दलही वाद आहेत.

गीतेचे वैशिष्ट्य सांगताना ते अनेकांनी आपापल्या परीने सांगण्याचा प्रयत्न केला आहे. अर्जुनाचा मोहनिरास करणे, स्वधर्म पालन करणे, संन्यास आणि कर्मयोगाचा समन्वय करणे, योगाचा उपदेश, समतेचे महत्त्व, ज्ञानयोग व भक्तियोग यावर विवेचन करणे वगैरे अनेक उद्देश विद्वानांनी सांगण्याचा प्रयत्न केला आहे आणि ते योग्यही आहे. परंतु या सर्वात मोहनिरास हे प्रमुख उद्दिष्ट गीता रचण्यामागे आहे, हे विशेषत्वाने दिसते. युद्ध टाळण्याचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरून युद्ध करण्याच्या उद्देशाने दोन्ही पक्षातील सैन्ये कुरुक्षेत्रावर समोरासमोर उभे ठाकले. त्यावेळी आपल्या रथाचे सारथ्य पत्करलेल्या श्रीकृष्णास अर्जुन म्हणतो, माझा रथ दोन्ही सैन्याच्या मधोमध उभा कर म्हणजे माझ्याबरोबर लढण्यासाठी कोण कोण जमले आहेत, हे मी पाहून घेतो. कृष्ण त्याच्या म्हणण्याप्रमाणे करतो. अर्जुन विरुद्ध पक्षाच्या सैन्यावरून नजर फिरवितो, तो त्याला काय दिसते? दोन्ही बाजूंना आपल्याच नातेवाईकांचा, सग्यासोयरांचा प्रचंड मेळावा उभा आहे. आजे, बाप, मुले, नातू, आप्तसंबंधाच्या चार पिढ्या मारण-मरणाच्या अंतिम निश्चयाने एकत्र आल्या आहेत, असे त्याला दिसते. या गोष्टीची कल्पना त्याला आधी नसेल असे नाही. पण प्रत्यक्ष दर्शनाचा एक वेगळाच परिणाम असतो.

तो सारा स्वजनसमूह पाहून त्याच्या हृदयाची कालवाकालव सुरू होते. त्याला फार वाईट वाटते आणि त्याची स्वजनासक्ती जागृत होते. आसक्तिजन्य मोहाने त्याची कर्तव्यनिष्ठा ग्रासते आणि त्याला तत्त्वज्ञान सुचते. मग तो युद्धच कसे पाप आहे, असे प्रतिपादन करू लागला आणि युद्धाचे वाईट व भीषण परिणाम तो कृष्णालाच समजावून सांगू लागला. त्यानंतर कृष्णाने त्याला स्वधर्माची आठवण करून देऊन आत्मज्ञान सांगितले आणि युद्धास प्रवृत्त केले. यावरून हेच सिद्ध होते की गीतेचा जन्म, स्वधर्माच्या आड येणारा जो मोह- त्याचे निवारण करण्याकरिता झाला आहे. अर्जुन जर मोहग्रस्त झाला नसता तर गीतेची निर्मिती झालीच नसती. अलिकडच्या काळात मानसोपचारांत समुपदेशनला (कौन्सिलिंग) फार महत्त्व आले आहे. मला वाटते, भगवद्गीता हे कौन्सिलिंगचे सर्वोत्कृष्ट उदाहरण आहे. या आजारात मनुष्याला स्वकर्तव्याचा विसर पडून तो कुठल्या तरी मोहात अडकला असतो. काऊन्सिलर तो मोह किती विनाशकारी आणि भयंकर आहे, हे त्या मोहग्रस्त व्यक्तीच्या मनावर सतत बिंबविण्याचा प्रयत्न करतो. ज्या गोष्टीच्या मोहात व्यक्ती अडकली असते ती कितीही आकर्षक आणि सुख देणारी असली, तरी ती जर स्वधर्माच्या विरुद्ध असेल तर त्या वस्तूच्या अंगिकारात विनाश अटळ आहे. मनुष्याला स्वधर्म किंवा स्वकर्तव्य माहित असतेच. फक्त अशावेळी त्यावर धूळ चढून त्याचा विसर पडलेला असतो. डॉक्टरचे कर्तव्य ती धूळ साफ करणे एवढेच असते.

एकदा का ती धूळ पूर्णपणे झटकल्या गेली की मोहमय वस्तूचा तिटकारा आपोआपच निर्माण होतो. श्रीकृष्णाने हेच केले. म्हणून अज्ञानाने झालेल्या मोहग्रस्त अर्जुनाचा मोहनिरास करणे किंवा त्याला स्वकर्तव्यपर करणे हाच गीतेचा मूळ उद्देश ठरतो. गीतेची महती कितीही सांगितली तरी कमीच आहे. लॉर्ड मेकॉले या विद्वान इंग्रज अधिकार्याला संपूर्ण हिंदुस्थानला इंग्रजीतून शिक्षण देऊन तो इंग्रज संस्कृतीमय करायचा होता; पण त्याचे हे स्वप्न शेवटपर्यंत पूर्ण होऊ शकले नाही. उलट भगवद्गीतेमुळे भारतीय संस्कृतीचाच तिकडे प्रसार व्हायला लागला. या ग्रंथाचे इंग्रजी भाषांतर वाचून काही पाश्चिमात्त्य लोक इतके खूश झाले की, ते त्या ग्रंथाकडे नीतिशास्त्र व अध्यात्मशास्त्र यावरील मानव जातीने प्रमाण मानावा असा एकमेव ग्रंथ, यादृष्टीने पाहू लागले. काहींनी त्यासाठी संस्कृतचे अध्ययन सुरू केले. एक रशियन बाई मॅडम ब्लॅव्हॅट्स्को व एक अमेरिकन नागरिक कर्नल ऑलकॉट यांनी न्यू यॉर्कमध्ये इ. स. १८७५ साली गीतेच्या अध्ययनासाठी थिऑसॉफिकल सोसायटी सुरू केली.

डॉ. ॲनी बेझंट यांनी या सोसायटीची भारतात शाखा सुरू केली आणि गीतेतील शिकवणुकीच्या अनुषंगाने सर्व जगात विश्वबंधुत्वाची कल्पना वाढवावी, अशी ईर्षा धरली. सारांश, गीतेत इतके ज्ञानभांडार साठवले आहे की, ज्याला जे पाहिजे ते त्याने घ्यावे आणि हे ज्ञानभांडार सदासर्वकाळ लागू पडणारे असल्यामुळेच ज्ञानेश्वरांनी त्याला मनित्यनूतनफ म्हटले आहे. गीतेला त्यांनी वेदांपेक्षाही श्रेष्ठ ठरविले आहे. एक गीता वाचली की जीवनाचा अर्थ समजण्यासाठी दुसऱ्या कोणत्याच ग्रंथाकडे जाण्याची आवश्यकता नाही. म्हणून ज्ञानेश्वरांनी गीतेला 'शास्त्रराज' म्हटले आहे.

पान २ वरून

# व्यापारासाठी सुरक्षितता, विद्येसाठी स्वतंत्रता!

त्याने ते खेळणे उघडून दुरुस्त तर केलेच; पण स्वतः तसेच नवीन खेळणे बनवले आणि अखेर याच विल्बर- ऑर्विल राईट बंधूंनी १९०३ साली पहिले विमान बनवले. पाठोपाठ १९०५-०६ साठी जर्मन संशोधक काउंट झेपेलिन यानेही विमान बनवले. गंमत म्हणजे, लिओनार्दो आणि ज्यूल्स व्हर्न यांच्यापासून प्रेरणा घेतलेल्या इगोर सिकोर्स्कीने १९०१ साली वयाच्या १२व्या वर्षी स्वतःच्या प्रयत्नांनी खेळण्यातले हेलिकॉप्टर बनवले होते. १९०८ साली इगोरला कळले की, अमेरिकेत राईट बंधूंनी आणि जर्मनीत फर्डिनांड झेपेलिन यांनी विमानाचा शोध लावलाच आहे; पण विमानांचे व्यापारी तत्त्वावर उत्पादन करणाऱ्या स्वतःच्या कंपन्या काढल्या आहेत. १९ वर्षांचा इगोर सिकोर्स्की झपाट्याने कामाला लागला. १९१२ साली २३ वर्षांच्या इगोरने बनवलेल्या विमानाला मॉस्कोच्या प्रदर्शनात पहिले बक्षीस मिळाले. १९१३ साली सेंट पीटर्सबर्गच्या लष्करी प्रदर्शनात त्याने बनवलेल्या विमानाचा नमुना रशियन सेनापतींनी पास केला आणि १९१४ साली तो रशियन लष्करासाठी बॉम्बफेकी विमाने बनवू लागला. त्याच साली महायुद्ध सुरू झाले. आपल्या साम्राज्यातल्या एका तरुण इंजिनिअरच्या या कर्तबगारीवर खुद्द सम्राट झार निकोलस दुसरा हा बेहद खूश होता. पण... १९१७ साली रशियात कम्युनिस्ट क्रांती झाली. नव्या साम्यवादी नेत्यांना स्वतंत्र बुद्धिमत्तेचे संशोधक नको होते. आपल्याला गोळी घालण्याचा लेखी आदेश निघाला आहे, हे समजताच इगोर कीव्हमधून पळाला आणि प्रथमपॅरिसला नि १९१९ साली न्यूयॉर्कला आला. १९२३ साली त्याने न्यूयॉर्क राज्यात रुझवेल्ट या ठिकाणी पहिली विमानोड्डाण कंपनी काढली. तेव्हापासून १९७२ साली वयाच्या ८३ व्या वर्षी मरेपर्यंत अनेक नवनवीन विमाने बनवणे, विमानोड्डाण शास्त्रावर व्याख्याने देणे आणि नवनवीन कंपन्या काढून यशस्वी व्यवसाय करणे, यात तो पूर्णपणे बुडालेला होता. त्याची सर्वात संस्मरणीय उपलब्धी म्हणजे त्याने जगातले पहिले हेलिकॉप्टर बनवले आणि दि. १४ सप्टेंबर १९३९ या दिवशी ते उडवून दाखवले. लिओनार्दोच्या चित्रातले हेलिकॉप्टर अशा रीतीने प्रत्यक्षात उतरले. यावेळी दुसरे महायुद्ध सुरू झालेलेच होते. साहजिकच, या नव्या विमानाचा अमेरिकन सैन्याला फार उपयोग झाला. अमेरिका, विमानोड्डाण क्षेत्राचा पाया घालणारे संशोधक, म्हणून राईट बंधूंना जितका सन्मान देते, तितकाच जन्माने रशियन- युक्रेनियन असलेल्या इगोर सिकोर्स्कीलाही देते. स्वतःच्या वैज्ञानिक यशाबद्दल सिकोर्स्की म्हणतो, 'मुक्त, स्वतंत्र जगात, मुक्त माणूस काय करू शकतो, याचे उदाहरण म्हणजे मी आहे.'

पान २ वरून

# मनाच्या सावलीत वाढणारं..

आज प्रश्न फक्त मानसिक आजारग्रस्त पालकांचा नाही. प्रश्न त्या लाखो मुलांचा आहे, जी आपल्या वयापेक्षा मोठी होण्याची घाई करत नाहीत, पण परिस्थिती त्यांना अकाली मोठं होण्यास भाग पाडते. कारण मनाच्या सावलीत वाढणारं बालपण दिसत नाही; पण त्याच्या जखमा अनेकदा आयुष्यभर सोबत राहतात. म्हणूनच, मानसिक आरोग्याच्या चर्चेत पालकांसोबत त्यांच्या मुलांचाही आवाज ऐकला जाणं, ही काळाची गरज आहे.

पान ५ वरून

# उत्तराखंडमधील एक निसर्गरम्य प्रवास

त्यांच्या या निवासस्थानाचे रूपांतर आता संग्रहालयात करण्यात आले आहे. इथे जिम कॉर्बेट यांच्या दैनंदिन वापरातील वस्तू, चित्रे, पेंटिंग्ज, त्यांची हस्तलिखिते आदी गोष्टी पाहता येतात. १९२२ मध्ये बांधलेला त्यांचा हा बंगला सुस्थितीत जतन करण्यात आला आहे. बंगल्याचा परिसर विशाल आणि निसर्गरम्य आहे. आजचा आमच्या सहलीचा हा अखेरचा दिवस होता. रात्री आम्ही याच द बनियन रिट्रीट या हॉटेलमध्ये विश्रांती घेतली. सकाळी नाश्ता करून आमचा परतीचा प्रवास सुरु झाला. बसने दिवसभर प्रवास करून आम्ही संध्याकाळी दिल्लीला पोहोचलो आणि पहाटेच्या सुमारास पुण्यात विमानाने परत आलो. आमच्यासोबत आमच्या सामानासोबतच होत्या या सहलीच्या साऱ्या रम्य आठवणी.

पान ५ वरून

# संतांचे भाषिक आदानप्रदान

शीख धर्मीयांच्या गुरुग्रंथसाहिब या ग्रंथात १० शीख धर्मगुरूंच्या वचनांसह संत नामदेवांचे ६० हिंदी अभंग, शेख फरीद या मुसलमान संताचे ११६ वचने आणि संत रविदास यांची ४१ गीते समाविष्ट आहेत. ही बाब संतांचे राष्ट्रीय समन्वयाचे भाषाधोरण अधोरेखित करणारी आहे.

आपल्या भाषेसह इतर भाषेलाही सन्मान देणे, एवढेच नव्हे तर भाषिक आदान- प्रदानातून राष्ट्रीय ऐक्य आणि प्रगतिशील विचार साधता येईल ही भारतीय जाणीव संतांना होती. मराठीसह भारतातील विविध भाषक संतांचे भाषिक आदान प्रदानाचे प्रयत्न त्यांच्या राष्ट्रीय दृष्टीचा प्रत्यय घडविणारे आहे. संतांच्या भाषिक आदान- प्रदानाच्या कार्याला ऐतिहासिक, भाषाशास्त्रीय, समाजशास्त्रीय व सांस्कृतिकदृष्ट्या व्यापक संदर्भ आहे. शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन या तुकारामांच्या शब्दांत भाषेविषयीचे सजग व्यापक समाजभान व्यक्त झाले आहे.

# राजकीय संक्रमण साधणारे अधिवेशन

**संसदेच्या २१ जुलै ते २१ ऑगस्ट दरम्यानच्या पावसाळी अधिवेशनामध्ये मांडले जाऊ शकणारे महिला आरक्षणाची अंमलबजावणी दिसणारे परिसीमन आयोग, एक देश, एक निवडणूक यांसारखे विषय केवळ कायदे नसून भारताच्या राजकीय पक्ष व्यवस्थेच्या नव्या आराखड्याशी संबंधित आहेत. त्यावर सविस्तर चर्चा होऊन निर्णय होणे आवश्यक आहे. त्यामुळे या अधिवेशनाकडे एका व्यापक राजकीय संक्रमणाच्या दृष्टीने पाहण्याची गरज आहे.**



वेध **प्रा. अशोक ढगे**

गेल्या दशकात केंद्रातील सत्ताधारी पक्षाने केवळ निवडणुका जिंकण्यावर भर दिला नाही, तर शासन व्यवस्थेच्या रचनेत दीर्घकालीन बदल घडवून आणण्याचा प्रयत्न केला. जीएसटी, कलम ३७० रद्द करणे, नागरिकत्व सुधारणा कायदा, नवीन फौजदारी कायदे, डिजिटल प्रशासन, थेट लाभ हस्तांतरण, सहकारी संघराज्याच्या नव्या व्याख्या अशा अनेक निर्णयांनंतर आता सरकारची नजर निवडणूक आणि प्रतिनिधित्वाच्या व्यवस्थेकडे वळली आहे. त्यामुळे पावसाळी अधिवेशन हे त्या प्रक्रियेतील पुढचे पाऊल ठरू शकते. राजकारणात बहुमत महत्त्वाचे असते; पण घटनात्मक बदलांसाठी केवळ बहुमत पुरेसे नसते.

संविधानात बदल करण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची आवश्यकता ही भारतीय लोकशाहीने जाणीवपूर्वक ठेवलेली सुरक्षितता आहे. कारण संविधान हा केवळ सत्ताधार्यांचा दस्ता-वेज नसून संपूर्ण राष्ट्राचा करार आहे. त्यामुळे कोणत्याही सरकारला आपल्या संख्याबळाचा वापर करून राज्यघटनेत सहज बदल करता येऊ नयेत, यासाठी ही तरतूद करण्यात आली आहे. याच ठिकाणी सध्याच्या राजकीय परिस्थितीचे महत्त्व वाढते. लोकसभेत सरकार मजबूत आहे. मित्रपक्षांचा पाठिंबा कायम आहे. शिवसेना आणि तृणमूल काँग्रेसमधील फुटीर खासदारांच्या भूमिकेमुळेही सरकारची ताकद वाढलेली दिसते. विरोधकांमधील विसंवाद आणि प्रादेशिक पक्षांच्या बदलत्या भूमिका सरकारसाठी अनुकूल वातावरण निर्माण करत आहेत; पण घटनादुरुस्तीच्या बाबतीत प्रत्येक मत महत्त्वाचे ठरते, म्हणूनच सरकारची राजकीय कौशल्याची खरी परीक्षा आता सुरू होणार आहे.

अलिकडेच पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनी विरोधी राजकारणातील विसंगती पुन्हा उघड केली आहे. निवडणुकीपूर्वी एकत्र निकालानंतर पुन्हा आपल्या आपल्या प्रादेशिक हितसंबंधांकडे वळले. काँग्रेस, तृणमूल काँग्रेस, समाजवादी पक्ष, आम आदमी पक्ष आणि दक्षिणेतील प्रादेशिक पक्ष यांच्यातील राजकीय प्राधान्यक्रम वेगवेगळे आहेत. त्यामुळे संसदेत एकसंध विरोध उभा करणे त्यांच्यासाठी अधिक कठीण झाले आहे.

विरोधकांची सर्वात मोठी अडचण संख्येची नसून नेतृत्व आणि सामायिक अजेंड्याची आहे. या पार्श्वभूमीवर महिला आरक्षणाचा प्रश्न पुन्हा केंद्रस्थानी येणार आहे. महिला आरक्षणाला जवळपास सर्वच राजकीय पक्षांनी तत्त्वतः समर्थन दिले आहे; मात्र त्याची अंमलबजावणी परिसीमनानंतर होणार असल्याने त्यामागील राजकीय गणित महत्त्वाचे ठरते. महिला प्रतिनिधित्व वाढवण्याच्या उद्देशाला कोणी विरोध करणार नाही; परंतु परिसीमनाच्या प्रक्रियेत कोणत्या राज्यांना किती जागा मिळणार, हा खरा राजकीय संघर्ष असेल. परिसीमन हा शब्द तांत्रिक वाटत असला, तरी त्याचे परिणाम दूरगामी आहेत. लोकसंख्येतील बदलानुसार मतदारसंघांची पुनर्रचना झाली, तर उत्तर भारतातील अनेक राज्यांना अधिक जागा मिळू शकतात, तर दक्षिणेतील राज्यांचा तुलनात्मक वाटा कमी राहण्याची शक्यता आहे. लोकसंख्या नियंत्रणात यशस्वी ठरलेल्या राज्यांना कमी प्रतिनिधित्व मिळणे हा अन्याय असल्याची भावना दक्षिणेकडील राज्यांमध्ये आधीपासूनच आहे. त्यामुळे परिसीमनाचा प्रश्न केवळ निवडणूक आयोगाचा विषय राहिला नसून संघराज्य व्यवस्थेच्या संतुलनाशी जोडला गेला आहे.

**एक देश, एक निवडणूकः-**

एक देश, एक निवडणूक हा याच साखळीतील पुढचा विषय आहे. निवडणुका वारंवार होत असल्याने विकासकामांवर परिणाम होतो, प्रशासन निवडणूक प्रक्रियेत अडकते आणि सार्वजनिक खर्च वाढतो, हा सरकारचा युक्तिवाद आहे. त्याउलट विरोधकांच्या मते, भारतासारख्या विविधतेने नटलेल्या देशात सर्व निवडणुका एकाच वेळी घेणे व्यवहार्य नाही. राज्यांचे राजकीय प्रश्न आणि राष्ट्रीय मुद्दे वेगळे असतात. त्यामुळे एकाच वेळी मतदान झाल्यास प्रादेशिक प्रश्न दुय्यम ठरू शकतात. या दोन्ही बाजूंमध्ये तथ्य आहे. म्हणूनच या विषयावर व्यापक राष्ट्रीय चर्चा अपेक्षित आहे.

संसदेत केवळ मतदान करून एवढ्या मोठ्या बदलाचा निर्णय घेणे योग्य ठरणार नाही. राजकीय पक्ष, राज्य सरकारे, घटनातज्ज्ञ आणि निवडणूक आयोग या सर्वांचा सहभाग आवश्यक आहे. सरकारसाठी आणखी एक अनुकूल बाब म्हणजे विरोधकांमधील फुटीचे राजकारण. गेल्या काही वर्षांमध्ये अनेक पक्षांमध्ये फूट पडली. काही ठिकाणी पक्षच दोन गटांमध्ये विभागले गेले. त्याचा थेट परिणाम संसदेतील संख्याबळावर झाला. अशा परिस्थितीत सरकारला स्वतंत्र खासदार किंवा छोट्या पक्षांचा पाठिंबा मिळवणे तुलनेने सोपे झाले आहे. हीच रणनीती आगामी अधिवेशनातही दिसू शकते; मात्र संख्याबळ वाढणे आणि राजकीय वैधता मिळणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. घटनात्मक बदल जितके व्यापक सहमतीने होतील, तितकी त्यांची स्वीकारार्हता वाढेल.

भारतासारख्या बहुपक्षीय लोकशाहीमध्ये संवाद संघर्षापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो. संसदेत विरोधक कमकुवत असले तरी त्यांचा आवाज महत्त्वाचा असतो. या अधिवेशनात सरकारची आणखी एक परीक्षा असेल ती विधेयकांच्या गुणवत्तेची. अलिकडच्या काळात अनेक महत्त्वाची विधेयके अल्प चर्चेत मंजूर झाल्याची टीका झाली आहे. या पार्श्वभूमीवर या वेळी सरकारने व्यापक चर्चा घडवून आणली, संसदीय समित्यांकडे विधेयके पाठविली आणि विरोधकांच्या सूचनांचा विचार केला, तर त्याचा सकारात्मक संदेश जाईल.

विरोधकांसाठीही हा आत्मपरीक्षणाचा काळ आहे. केवळ सरकारला विरोध करण्यापेक्षा पर्यायी धोरण मांडणे आवश्यक आहे. संसदेत जनतेच्या प्रश्नांवर प्रभावी चर्चा घडवून आणणे, विधेयकांमधील त्रुटी दाखवून देणे आणि विधायक सुधारणा सुचवणे, ही विरोधकांची खरी भूमिका आहे. ती त्यांनी प्रभावीपणे पार पाडल्यास संख्याबळ कमी असूनही त्यांचा प्रभाव कायम राहू शकतो. एका अर्थाने हे अधिवेशन भारतातील नव्या राजकीय वास्तवाचे प्रतिबिंब असेल. मजबूत केंद्र सरकार, विखुरलेले विरोधक, घटनात्मक बदलांची तयारी आणि संघराज्य व्यवस्थेवरील नव्या चर्चा या सगळ्या घडामोडी एकाच वेळी घडत आहेत. त्यामुळे हे अधिवेशन केवळ चालू वर्षाचे संसदीय अधिवेशन राहणार नाही, तर पुढील दशकातील भारतीय राजकारणाचा आराखडा तयार करणारा टप्पा ठरू शकते. संसदेचे आगामी पावसाळी अधिवेशन हे केवळ नियमित अधिवेशन राहणार नाही, तर केंद्रातील सत्ताधारी राष्ट्रीय लोकशाही आघाडी (एनडीए) आणि विरोधी पक्षांच्या राजकीय ताकदीची मोठी परीक्षा ठरणार आहे.

**दीर्घकालीन परिणाम करणारी विधेयकंः-**

गेल्या काही महिन्यांमध्ये देशाच्या राजकारणात घडलेल्या घटनांमुळे संसदेतील सत्तासमीकरणात लक्षणीय बदल झाला आहे. पाच राज्यांच्या विधानसभा निवडणुकांनंतर विरोधी आघाडीतील एकजूट आणखी कमकुवत झाली आहे. दुसरीकडे शिवसेना आणि तृणमूल काँग्रेसमधील फुटीर खासदारांचा पाठिंबा मिळाल्याने सरकारचे संख्याबळ अधिक मजबूत झाले आहे. या पृष्ठभूमीवर केंद्र सरकार महिला आरक्षण, परिसीमन आणि एक देश, एक निवडणूक यांसारख्या दीर्घकालीन परिणाम करणाऱ्या विधेयकांच्या दिशेने पावले टाकण्याची शक्यता आहे.

सरकारसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे घटनादुरुस्तीची आवश्यकता असलेली विधेयके. साध्या कायद्यांप्रमाणे ही विधेयके केवळ साध्या बहुमताने मंजूर होत नाहीत. त्यासाठी उपस्थित आणि मतदान करणार्या सदस्यांपैकी दोन तृतीयांश बहुमत तसेच सभागृहाच्या एकूण सदस्यसंख्येच्या निम्म्याहून अधिक सदस्यांचा पाठिंबा आवश्यक असतो. त्यामुळे लोकसभेत मजबूत बहुमत असूनही राज्यसभेतील संख्याबळ आणि प्रादेशिक पक्षांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय जनता पक्षाने निवडणुकांमधील विजयासोबतच संसदेतील आपली राजकीय पकड सातत्याने मजबूत केली आहे. मित्रपक्षांशी संबंध दृढ ठेवणे, नव्या सहयोगींना जोडणे आणि विरोधी पक्षांमधील असंतुष्ट नेत्यांना आपल्याकडे वळवण्याची रणनीती यशस्वी ठरली आहे. त्यामुळे एनडीएची राजकीय ताकद वाढली असून सरकारचा आत्मविश्वासही उंचावला आहे. पावसाळी अधिवेशनात याच बळाची प्रचिती देण्याचा प्रयत्न सरकार करेल, असे वाटते. कोणतेही सरकार कायम सत्तेत राहणार नसते आणि कोणताही विरोधक कायम कमकुवत राहत नाही; पण संसद कायम असते. तिची प्रतिष्ठा, तिची चर्चा आणि निर्णय यांवरच लोकशाहीचा दर्जा ठरतो. पावसाळी अधिवेशनात सरकारने संख्याबळाचा संयमाने वापर केला आणि विरोधकांनी विरोधाला विधायक स्वरूप दिले, तर भारतीय लोकशाही सक्षम होईल.



# आरती प्रभू... ये रे घना, ये रे घना ! एक अनुभूती

ललित **डॉ. नटचंद्र चिमोटे**

नेहमीप्रमाणे सकाळी उगवता सूर्य पाहिला. पहाटे साडेपाच वाजता दाटलेल्या ढगातूनही तिरसटपणे पाहत तो म्हणाला, आजही पहा, कसा पोळून काढतो तुम्हा सगळ्यांना. माझ्या बेडरुमच्या एसीतल्या शांत गार झुळकेने मी त्याला म्हणालो,

तू काहीही कर, मी दुलई पांघरून पुन्हा किमान तासभर तरी राग विभासाच्या मखमली आभरणात तुझे विभ्रम पाहात, मनात राग ललतची उठावणी देणारी सुरावट जागवत वासुदेवाचा जागर करणारी अमीरखानी ठहरावाचा जोगिया कानात रुंजवत मनाच्या घरात ठहरवून तुझा पाडाव करीन. आणि तो भयानक तळपला.

अवघ्या सृष्टीला त्याने फक्त आणि फक्त जाळले. तो फक्त तळपत राहिला. इतक्यात, ते आले. काळेकभिन्न! भीती वाटतील असे. रस्त्यावरचे निष्प्राण करणारे उभे रखरखीत पिवळे ऊन जयजयवंती सारखे मऊशार झाले. आभाळात कडेला कुठेतरी मेघ साद देत होता. अनभिज्ञ. कुणालाच ठाऊक नव्हता. तो साठवत होता. स्वतःला. कदाचित आसमंताला.


अचानक तो जागा झाला. त्यांचा आत्मा आता जागृत झाला होता. तो जमवाजमव करू लागला. जसा तो जमू लागला, प्रखर ऊन भिऊ लागलं. हळूहळू पळू लागलं. सारंग आपला माध्यम पक्का करत होता. तोच तीव्र मध्यम घेऊन मुलतानीचा एक ढग काळा काळा होत संध्याछायेची छटा देऊ लागला. इतक्यात कोमल रिषभ आभाळातल्या मधूनच चमकणाऱ्या विजेसारखा आभाळाला खुणावू लागला.

सूर्यास्त होत होता. मारवा आपल्या अलवार कोमल रिषभासह धैवतावर ओसंडू लागला. सूर्यास्त उदात्तपणे करुणास्पद झाला. आभाळ काळ्या ढगांच्या पुंजक्यांनी भरभरून आले. मग त्यांचे स्वतःचे साम्राज्य निर्माण होऊ लागले. ते सैरभैर झाले. मिळेल त्या ठिकाणी आपापल्या विस्ताराने व्यापू लागले. वाऱ्याला निमित्त हवेच होते. तो प्रच्छन्न वाहू लागला. त्याचा धडकी भरवणारा प्रचंड भयानक वेगवान आवाज सहन होईना असा.

इतक्यात माझ्या समोरच्या हिरव्या पानातल्या पिवळ्या पिवळ्या नाजूक फुलांचा कल्लोळ मला साहिना. त्या मेघ झाकोळ्यात इतक्यात आरती प्रभु कानात म्हणाला ये रे घना, ये रे घना, न्हाऊ घाल माझ्या मना.... मी अख्खा नखशिखांत भिजलो. तो फक्त आभाळाला रुंजी घालत होता. आभाळ ढगांनी न्हाऊन गेले होते. आयुष्यभर मल्हार बरसत राहिला. न्हाऊ घालत होता!

# खिडकीतलं आकाश

ललित **मंजिरी अनसिंगकर**



पहाटेची सुंदर वेळ... छान झुळझुळणारं गार गार वारं. चांदण्यांनी लुकलुकणारं आकाश आता हळूहळू श्यामल, निळसर नि सोनेरी रंगात बदलतंय. केशराची उधळण होतेय जणू! पक्षिगणाने आकाशात झेप घेतलीय. खिडकीतून हे दृश्य पाहताना मन कसं प्रफुल्लित झालंय. गवाक्षातून खाली पाहता प्राजक्ताचा सडा... त्याचा मंदसुवास... त्याचं देखणं रूप मनाला तरोताजा करतंय. खिडकीतून दिसणारं ते आकाश, मनाला झेप घेण्यासाठी उद्युक्त करतंय. आकाशाला गवसणी घालणारं कर्तृत्व कर सांगतंय तर अंगण कितीही उंच भरारी घेतली तरी पाय जमिनीवर राहू दे सांगतंय.

आकाशाचं मला लहानपणापासून आकर्षण आहे. त्या चमचमणाऱ्या चांदण्या...तो शुभ्र धवल चंद्रमा... ती लखलखणारी नक्षत्रे, ती शुक्राची चमचमती चांदणी... खिडकीतून दिसणारा हा नजारा जणू काही मला साद घालतोय असंच वाटायचं. ए, तूही ये नं, टिपऱ्या घेऊन आमच्या खेळायला... आकाशात ढगांचा चालणारा लपंडाव पाहून आपणही त्यांच्यात खेळायला जाव असं वाटे. आकाशातील ढगांचे वेगवेगळे आकार पाहण्यात तर मन गुंगून जाई. जसजशी मोठी होत गेले अहं वयाने नं हो, तसतसं हे आकाश वेगळंच भासायला लागलं. आकाशगंगा... त्यातले तारे.. नक्षत्रे.. सगळं विज्ञानाने परखायला लागलं.

ग्रहणाचा चमत्कार.. ते ग्रासलेले चंद्र- सूर्य. त्याला दिलेलं धार्मिक महत्त्व. कलेकलेने वाढणारा नि कमी होत जाणारा चंद्रमा. सगळ्याचा अर्थ समजायला लागला नि खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाच्या कक्षा आता विस्तारू लागल्या. कधी कधी अज्ञानात, बालपणाच्या निरागसतेत किती सुख असतं ना! चंदामामानंतर कुठंतरी हरवत गेला. खडकीतून दिसणारं निळशार आकाश. त्याचं एक वेगळंच सौंदर्य यौवनात जाणवायला लागतं. मग सगळं विज्ञान विसरायला होतं. खिडकीतून एकटक पाहात असताना, कधी निळ्या नभात विहरू लागले, समजलंही नाही. शुभ्र अश्वारूढ राजकुमार याच निळ्या नभातून आपल्यासाठी येणार आहे, ही समजूत कधी झाली, तेही कळले नाही. मग त्या आकाशाशी जरा जास्तच दोस्ती झाली बरं का! रात्र रात्र खिडकीतून आकाशाकडे पाहणे सुरू झालं. हातात हात घेऊन चांदण्यात विहरणं झालं. नभी सुरू असलेल्या रासक्रीडेत मी आणि माझा राजकुमार नृत्य करीत असल्याचे भास सुरू झालेत. अभ्यासाचा जेव्हा बोजवारा वाजला तेव्हा कुठे स्वप्ननगरीतून काढता पाय घेतला. खिडकीतून आता आकाशाकडे पाहणं कमी केलं. शिक्षण नि यथावकाश गृहस्थाश्रम सुरळीत झाला...

आयुष्याच्या सायंकाळी आता खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाकडे पाहण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन मिळाला. आकाश... पंचमहाभूतापैकी एक. आकाश... सत्त्वगुण, सात्त्विकतेचे प्रतिनिधित्व करणारा. ही सृष्टी पंचमहाभूतांनी बनलेली आहे.

आपले शरीरही पंचमहाभूतांनीच बनलेले आहे. आकाश व्यापक आहे. सूक्ष्मही आहे. हे तत्त्व सात्त्विकतेची गुणवृद्धी करते... चेतनेची, बुद्धीची. स्मृतीची प्रगती करते. माझ्या खिडकीतून दिसणारे आकाश माणसाच्या जीवनात किती महत्त्वाच्या स्थानी आहे, हे आता लक्षात येतेय. म्हणूनच खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाकडे आता मन पुन्हा आकर्षित झालंय. एवढंस ते दिसणार आकाश! आता मात्र त्याने मन व्यापून टाकलं आहे. मनातलं विस्तीर्ण असं ते आकाश पुन्हा साद घालतंय. उर्वरित आयुष्यात सात्त्विकतेने राहा. सर्वांशी चांगली वागणूक ठेव. आनंदी राहा. आनंद वाट. त्या सृष्टिनियंत्याशी... परमेश्वराशी एकरूप होण्याचं ध्येय पूर्ण करण्याचा प्रयत्न कर. खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाने किती सुंदर संदेश दिलाय हो नं!

## बळीराजा

पाहतो बळीराजा ढगात
सावळ्याचं रूप
आकारा वेगळा जरी
देई मनास आनंद खूप

सोसत उन्हाची काहिली
तप्त नांगरली भुई
कात्याकुट्यात पाय
धूळ डोळ्यामंदी जाई

अंगी घामाच्या धारी
जीव करे पाणी पाणी
लहरी वरुणाची मनमानी
दाटले डोळ्यामध्ये पाणी



सार्या जगाचा पोशिंदा
अर्धपोटी राबतो
करकटीवरून ठेवून
ओसाड जमीन पाहतो

डोळ्यातले पाणी
वाहू दे रे ढगातून
बरसून भिजव काळी आई
मोती फुलू दे घामातूनी

नभीच्या विठू सावळ्याची
ओढ लागली जिवाला
हात जोडून विनवतो
बळी पंढरीनाथाला

**हेमांगी देशपांडे**

## पावसा...



पावसासारखा वाग पावसा...
दिल्या शब्दाला जाग पावसा...
नकोस रुसू असा माझ्यावर,
काय पाहिजे ते माग पावसा...
सुटत चालला पारा दिलाचा,
तयारीस येण्या लाग पावसा....

नको खोळंबू इतकाही आता,
जळून चालली बाग पावसा...
माणसासारखा नको भेदभाव,
व्याप सर्वच रे भाग पावसा...
तुझ्याविना विझणे शक्य नाही,
पेटलेली हृदयी आग पावसा...
नकोस होऊ इतका निष्ठुर,
पुसूनी टाक तो डाग पावसा....!

**प्रकाश इंगळे**

विमर्श

गिरीश भोसले



# संघावरील आरोप, आक्षेप आणि वस्तुस्थिती!

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर अगदी स्थापनेपासूनच हिंदुत्वद्वेष्ट्यांनी आरोपांच्या फैरी झाडल्या. पण, १०० वर्षे पूर्ण केलेला संघ या आरोपांना वेळोवेळी पुरुन उरला. राष्ट्र प्रथम या उदात्त हेतूने कार्यरत संघ आणि स्वयंसेवक आपल्या लक्ष्यावरुन कदापि विचलित न होता, चरैवेति चरैवितिफ या उक्तीनुसार वाटचाल करीत राहिले आणि पुढेही करत राहतीलच. तेव्हा संघशताब्दीनिमित्ताने रा. स्व. संघावरील अशाच काही आरोप आणि आक्षेपांचा समाचार घेऊन, वस्तुस्थिती कथन करणारा हा लेख...**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला २०२५ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली. १९२५ मध्ये विजयादशमीच्या दिवशी डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी नागपूर येथे सुरू केलेल्या या संघटनेने आज जगातील सर्वांत मोठ्या स्वयंसेवी संघटनांपैकी एक म्हणून स्थान मिळवले आहे. शताब्दी वर्षानिमित्त संघाच्या कार्याचा, विचारांचा आणि समाजजीवनातील प्रभावाचा आढावा घेतला जात असतानाच संघावरील जुने आणि नवे आरोप पुन्हा चर्चेत आले आहेत.

विशेषतः २०१९ नंतर महाराष्ट्रातील राजकीय समीकरणांमध्ये झालेल्या बदलांनंतर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील अनेक नेत्यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर विविध प्रकारचे आरोप केले. या आरोपांमध्ये स्वातंत्र्यलढ्यातील भूमिका, हिंदुत्वाचा प्रश्न, राजकारणातील हस्तक्षेप, देशभक्तीची व्याख्या आणि संघाच्या मूळ विचारांतील कथित बदल यांसारख्या मुद्द्यांचा समावेश होता. लोकशाही व्यवस्थेत कोणत्याही संस्था, संघटना किंवा विचारसरणीवर टीका होणे स्वाभाविकच. मात्र, एखाद्या विषयाचा विचार करताना केवळ आरोपांवर न थांबता, त्यासंदर्भातील दुसरी बाजू आणि ऐतिहासिक वस्तुस्थिती जाणून घेणेही तितकेच महत्त्वाचे असते.

### आरोप क्र. १. रा. स्व. संघाचा स्वातंत्र्यलढ्यात सहभाग नाही:-

रा. स्व. संघाविषयीचा हा सर्वाधिक चर्चिला जाणारा आरोप. दि. ३ मार्च २०२१ रोजी महाराष्ट्र विधानसभेत तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी, शिवसेना स्वातंत्र्यलढ्यात नव्हती, पण आरएसएससुद्धा नव्हती, असे वक्तव्य केले होते. संघाविरोधात वारंवार करण्यात येणाऱ्या आरोपांमध्ये हा आरोप सर्वाधिक चर्चिला जातो.

संघ समर्थकांच्या मते, या विषयाचा विचार करताना दोन गोष्टी वेगळ्या करून पाहाव्या लागतात. एक म्हणजे, संघटना म्हणून रा. स्व. संघाची भूमिका आणि दुसरे म्हणजे संघाशी संबंधित व्यक्तींची भूमिका.

संघाचे संस्थापक डॉ. केशव बळीराम हेडगेवार हे काँग्रेसच्या स्वातंत्र्यचळवळीत सक्रिय होते. त्यांनी ब्रिटिशांविरोधात आंदोलनांमध्ये सहभागही घेतला होता आणि त्यासाठी त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. संघाची स्थापना झाल्यानंतर मात्र संघाने स्वतःला राजकीय आंदोलनांपासून दूर ठेवून समाजसंघटन, व्यक्तिमत्त्व विकास आणि राष्ट्रीय चारित्र्यनिर्माण यावर भर दिला.

संघाच्या भूमिकेनुसार, अनेक स्वयंसेवकांनी वैयक्तिक पातळीवर स्वातंत्र्यचळवळीत सहभाग घेतला; परंतु संघाने संस्थात्मक पातळीवर कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा आंदोलनाच्या मागे उभे राहण्याचा मार्ग स्वीकारला नाही. त्यामुळे या विषयावर आजही इतिहासकार आणि राजकीय विश्लेषकांमध्ये मतभेद दिसून येतात.

### आरोप क्र. २. हिंदुत्वावर संघ आणि भाजपची मक्तेदारी आहे:-

२०१९ नंतर शिवसेना आणि भाजप यांच्यातील युती तुटल्यानंतर हिंदुत्वाच्या प्रश्नावरही तीव्र राजकीय संघर्ष सुरू झाला. उबाठाचे नेते संजय राऊत आणि इतर अनेक नेत्यांनी संघ आणि भाजप हिंदुत्वाचे एकमेव प्रतिनिधी असल्याचा दावा करतात, असा आरोप केला. मात्र, संघाची भूमिका वेगळी आहे. संघाच्या विचारानुसार, हिंदुत्व ही कोणत्याही एका पक्षाची, संघटनेची किंवा व्यक्तीची मालमत्ता नसून; भारताच्या सांस्कृतिक ओळखीची व्यापक संकल्पना आहे. संघ हिंदुत्वाची व्याख्या धार्मिक नव्हे, तर सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या दृष्टीने करतो.

संघाच्या म्हणण्यानुसार, भारतात राहणाऱ्या सर्व समाजघटकांना एकत्र आणणे, राष्ट्रीय एकात्मता वाढवणे आणि भारतीय संस्कृतीवरील अभिमान जागृत करणे हे हिंदुत्वाचे मूलभूत स्वरूप आहे. त्यामुळे हिंदुत्वावर कोणाचीही मक्तेदारी असू शकत नाही, असे संघाचे मत आहे.

### आरोप क्र. ३. संघ राजकारणात हस्तक्षेप करतो:-

उबाठासह विविध राजकीय पक्षांकडून वेळोवेळी असा आरोप करण्यात आला की, संघ स्वतःला सांस्कृतिक संस्था म्हणवून घेत असला; तरी प्रत्यक्षात तो राजकीय निर्णयांवर प्रभाव टाकतो. या आरोपाला उत्तर देताना संघ नेहमी सांगतो की, तो कोणतीही निवडणूक लढवत नाही, उमेदवार उभे करत नाही आणि सरकारचा भाग नसतो. संघ स्वतःला सामाजिक- सांस्कृतिक संस्था मानतो.

हे खरे आहे की, भारतीय राजकारणातील अनेक प्रमुख नेते संघाचे स्वयंसेवक राहिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह अनेक केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते संघाच्या पार्श्वभूमीतून आलेले आहेत. मात्र, संघाच्या मते, विचारांचा प्रभाव आणि प्रत्यक्ष राजकीय नियंत्रण यामध्ये मूलभूत फरक आहे.

स्वयंसेवक विविध क्षेत्रांत जातात. पण, तेथील निर्णय ते संबंधित संस्थांच्या चौकटीत घेतात.

### आरोप क्र. ४. रा. स्व. संघ नोंदणीकृत नाही:-

आरोप आणि संघाची भूमिका काही राजकीय नेते आणि टीकाकार वेळोवेळी असा आरोप करतात की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा नोंदणीकृत नसलेला संघटनात्मक उपक्रम आहे. त्यामुळे त्याच्या आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता नसल्याचा आरोपही केला जातो.

यासंदर्भात सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी अनेकदा स्पष्टीकरण दिले आहे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा समाजातील स्वयंप्रेरणेवर चालणारा एक अनौपचारिक सामाजिक- सांस्कृतिक उपक्रम आहे.

संघाची स्थापना १९२५ मध्ये झाली, तेव्हा अशाप्रकारच्या सामाजिक संघटनांसाठी स्वतंत्र नोंदणीची कोणतीही कायदेशीर आवश्यकता नव्हती.

संघाचे म्हणणे असे आहे की, संघ स्वतः नोंदणीकृत नसला तरी त्याच्या विविध सेवा, शैक्षणिक, सामाजिक आणि विकासात्मक उपक्रमांसाठी स्वतंत्रपणे नोंदणीकृत संस्था, ट्रस्ट आणि समित्या कार्यरत आहेत. या संस्था लागू कायद्यांनुसार लेखापरीक्षण आणि शासकीय नियमांचे पालन करतात.

डॉ. मोहनजी भागवत यांनी एका मुलाखतीत असेही नमूद केले होते की, संघाचे कार्य मुख्यतः स्वयंसेवकांच्या स्वेच्छा सहभागावर आधारित आहे. शाखा, प्रशिक्षण आणि सामाजिक उपक्रम यासाठी स्वतंत्र सदस्यत्व शुल्क किंवा सक्तीचा निधी नसतो. त्यामुळे संघाची रचना पारंपरिक नोंदणीकृत संस्थांपेक्षा वेगळी आहे.

संघ समर्थकांच्या मते, संघाची विश्वासार्हता त्याच्या १०० वर्षांच्या सार्वजनिक कार्यातून सिद्ध झाली आहे; तर टीकाकारांच्या मते, वाढत्या प्रभावामुळे अधिक औपचारिक पारदर्शकता अपेक्षित आहे. त्यामुळे हा विषय आजही सार्वजनिक चर्चेचा मुद्दा राहिला आहे.

### आरोप क्र. ५. देशभक्तीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार कोणाला?

उद्धव ठाकरे यांनी विविध सभांमधून देशभक्तीच्या प्रश्नावर भाष्य करताना कोणालाही देशभक्तीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नसल्याचे म्हटले होते. संघसमर्थक या भूमिकेशी तत्त्वतः सहमत असल्याचे सांगतात. त्यांच्या मते, देशभक्ती ही एखाद्या व्यक्तीच्या किंवा संघटनेच्या प्रमाणपत्रावर अवलंबून नसते. देशसेवा विविध स्वरूपांत होऊ शकते. पूर, भूकंप, कोरोना महामारी, शिक्षण, आरोग्य, ग्रामविकास, सामाजिक समरसता आणि पर्यावरणसंवर्धन यांसारख्या क्षेत्रांत लाखो स्वयंसेवकांनी केलेले कार्य हीदेखील राष्ट्रसेवाच आहे. त्यामुळे देशभक्तीचा मापदंड केवळ राजकीय घोषणांवरून ठरवता येत नाही, असे संघाचे मत आहे.

### आरोप क्र. ६. सध्याचा संघ मूळ विचारांपासून दूर गेला आहे:-

काही राजकीय नेते आणि टीकाकार असा आरोप करतात की, आजचा संघ आणि पूर्वीचा संघ यांच्यात मोठा फरक आहे. संघाची वाढ आणि प्रभाव वाढल्यानंतर त्याची दिशा बदलली असल्याचा दावा केला जातो.

यावर संघाचे उत्तर असे आहे की, काळानुसार कार्यपद्धती बदलणे स्वाभाविक असते. १०० वर्षांपूर्वीच्या सामाजिक परिस्थितीत आणि आजच्या परिस्थितीत मोठा फरक आहे. त्यामुळे कार्यपद्धतीत बदल झाला असला, तरी मूलभूत विचार कायम आहेत.

राष्ट्र प्रथम, समाजसंघटन, सेवा, संस्कार, कुटुंबव्यवस्था, सामाजिक समरसता आणि राष्ट्रवाद ही संघाची मूलभूत तत्त्वे आजही तशीच असल्याचा संघाचा दावा आहे. शाखांच्या माध्यमातून व्यक्तिमत्त्व विकास, सेवा प्रकल्प, पर्यावरण अभियान, ग्रामविकास आणि सामाजिक उपक्रम यांतून हे विचार प्रत्यक्ष कार्यात दिसून येतात, असे संघाचे म्हणणे आहे.

### शताब्दी वर्षाचे महत्त्व:-


संघाच्या शताब्दी वर्षाकडे केवळ एका संघटनेचा वर्धापन दिन म्हणून पाहता येणार नाही. गेल्या शतकात संघाने भारतीय समाजजीवन, सामाजिक संस्था, सेवा क्षेत्र, शिक्षण, संस्कृती आणि राजकारणावर थेट किंवा अप्रत्यक्ष प्रभाव टाकला आहे.

संघाबाबत तीव्र समर्थन आणि तीव्र विरोध या दोन्ही भावना समाजात दिसतात. त्यामुळे संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने भावनिक प्रतिक्रिया बाजूला ठेवून त्याच्या कार्याचा, यशाचा, मर्यादांचा आणि समाजावरील परिणामांचा वस्तुनिष्ठ अभ्यास होणे आवश्यक आहे. थोडक्यात असे की, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा भारतातील सर्वाधिक चर्चिला जाणारा आणि तितकाच वादग्रस्त ठरलेला सामाजिक- सांस्कृतिक उपक्रम आहे. त्याच्यावर टीका करणारेही आहेत आणि त्याचे समर्थकही आहेत. लोकशाहीत या दोन्ही भूमिका महत्त्वाच्या आहेत. परंतु, कोणत्याही संस्थेबद्दल मत बनवताना केवळ राजकीय आरोप किंवा भावनिक प्रतिक्रिया यांवर अवलंबून न राहता इतिहास, कार्य, विचार आणि वास्तव यांचा अभ्यास करणे आवश्यक असते. संघाच्या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने ही संधी संपूर्ण समाजासमोर उपलब्ध झाली आहे. सहमत किंवा असहमत असणे, हा प्रत्येकाचा अधिकार आहे. मात्र, संपूर्ण चित्र पाहून मत बनवणे, हीच लोकशाहीची खरी ताकद आहे.

---

# एका विद्यापीठाचे अस्त होणे...

**काळ अनेक कलाकार घडवतो; पण काही मोजकी व्यक्तिमत्त्वे काळालाच नवे निकष देऊन जातात. विजया मेहता या अशाच दुर्मीळ परंपरेतील त्यांच्या निधनाने रंगभूमी ही केवळ करमणुकीचे माध्यम नसून सामाजिक, सांस्कृतिक आणि कलात्मक संस्कारांचे विद्यापीठ आहे, या विचाराचा एक प्रतिनिधीच काळाच्या पडद्याआड गेला आहे.**



श्रध्दांजली

प्रतिनिधी

दृढविश्वास ठेवला की, नाट्यातले 'सत्य क्षण' कुठेही निर्माण होऊ शकतात,' या जगाचा निरोप घेतलेल्या विजया मेहतांचे हे वाक्य. विजया मेहतांना त्यांचा शिष्यगण 'बाई' म्हणायचा. ज्या गिरगावात त्यांची कारकीर्द घडली, त्या गिरगावात शिक्षिकेला 'बाई' म्हणण्याचा निर्विवाद नियम होता. विजयाबाई तशाच होत्या; पट्टीच्या शिक्षिका. परंतु, ही शिक्षिका शिक्षणापुरती मर्यादित राहिली नाही, तर तिचे विद्यापीठ झाले. हे विद्यापीठ अनेक दिग्गज विद्यार्थ्यांचे कुळ ठरले. यात विक्रम गोखले होते, नाना पाटेकर होते, सुकन्या कुलकर्णी होत्या, सुहास जोशी होत्या, चित्तरंजन कोल्हटकर, रामचंद्र कुलकर्णी होते. बाई अभिनयापुरत्या मर्यादित नव्हत्या. बाईंनी रंगभूमी केली, दूरदर्शनसाठी मालिका केल्या, सिनेमाही केला. मात्र, त्या खऱ्या अर्थाने रमल्या त्या प्रायोगिक रंगभूमीवरच! महत्त्वाचे म्हणजे त्यांचे प्रायोगिक रंगभूमीवरचे प्रयोग प्रायोगिक राहिले नाहीत; त्यांनी व्यावसायिक रंगभूमीवरही रसिकजनांची भरभरून दाद मिळवली.

बाई नाट्यकला किंवा अभिनयकला चहू-अंगाने जगल्या. या सगळ्याच्या अनुषंगिक गोष्टींचाही प्रमुख पात्राप्रमाणे त्या विचार करायच्या. नेपथ्यातल्या प्रकाशयोजनेच्या साध्या तिरिपीचाही त्यांनी सखोल विचार केलेला असायचा. त्यांचे थिएटर शिकवणे किंवा मालिका साकारणे अथवा सिनेमा उभा करणे, हे केवळ शिकवणे नव्हते; तर त्याला एका तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक होती. बाई 'कलेसाठी कला' या तत्त्वज्ञानाने जगल्या व मुंबईच्या मरिन ड्राईव्हच्या दुसर्या टोकाला 'एनसीपीए'सारखी एक संस्था उभी करून निघून गेल्या.

पुरुषांच्या बेंडकुळ्या किंवा स्त्रीपात्रांचे देहप्रदर्शन; विनोदाच्या नावाखाली चाललेले हिडीस अश्लील संवाद अशा आजच्या काळात विजयाबाई नावाचे कुणी होते, यावर कदाचित विश्वास बसणार नाही. साहित्य संघ, भवन्स, 'आयएनटी' अशी कितीतरी व्यासपीठे त्याकाळात नाट्यचळवळीसाठी उपलब्ध होती. विजया मेहतांना या सगळ्या वातावरणाचा भरपूर उपयोग झाला. गिरगावातल्या अत्यंत सधन घरातील विजया मेहतांचा जन्म. विचाराने अत्यंत स्वतंत्र अशा पुरोगामी, ज्याला खर्या अर्थाने पुरोगामी म्हणावे अशा घराचे संस्कार त्यांच्यावर झाले होते. त्याकाळात नाटक हे 'करिअर' म्हणून निवडावे, याचे स्वातंत्र्यही त्यांना मिळाले. भवन्स, साहित्य संघ या एकमेकांना पूरक असणार्या या दोन्ही संस्थांनी विजयाबाईंचा आवा समृद्ध केला. अन्य कुठल्याही विद्यार्थ्याप्रमाणे त्याही शिकतच होत्या. परंतु, शिकत असताना घडत असलेल्या प्रक्रियेतल्या उणिवा कुठेतरी त्या मनात नोंदवत होत्या. त्यावेळेसचा काळ, नाट्यनिर्मितीत निर्माण झालेले प्रवाह, भविष्याच्या दृष्टीने त्यात तयार होणार्या उणिवा या बाईंना जाणवत होत्या. तालमीत दृश्य आणि श्राव्य भागांवर खूप लक्ष दिले जायचे. पण, त्यामुळे अभिनय मागे पडला होता. मग या अभिनयाच्या तंत्रावर पुढच्या त्यांच्या संपूर्ण जीवनात त्यांनी भरपूर काम केले. ही जाण जेव्हा त्यांना आली, त्यावेळेस त्यांचे वय केवळ १९ होते.

विजयाबाई अल्काझींच्या विद्यार्थिनी. त्यामुळे रंगभूमीचे एक सुजाण, समृद्ध भान त्यांना मिळाले होते. रूढ अर्थाने त्या प्रवाहाच्या विरोधात चालल्या होत्या. त्यामुळे केवळ अभिनेत्री म्हणून या उणिवा दुरुस्त करता येणार नाहीत, याची त्यांना जाण होती. म्हणून त्यांनी दिग्दर्शनालाही सुरुवात केली. देश स्वतंत्र झाला होता. हा सगळाच काळ भारतीयांनी आदर्श म्हणून युरोपकडे पाहण्याचा होता. सरकार निरनिराळ्या प्रकारच्या शिष्यवृत्त्या देऊन, आपल्याकडच्या होतकरू विद्यार्थ्यांना परदेशात पाठवत होते. बाईंनाही सुरुवातीला अशी संधी चालून आली होती. मात्र, त्यांनी ती नाकारली आणि अधिक काम करण्याचा मार्ग स्वीकारला.

बाईंना खूप शिस्तीचे शिक्षक भेटले. नाटकाची सकाळची तालीम, तीही साडेसात ते साडेनऊ. असे कितीतरी प्रयोग बाईंनी सुरुवातीच्या काळात केले. संवाद सुचणे, असा एक प्रयोग त्यांनी त्याकाळात केला. सतत तालीम करायची आणि नाटक आकाराला आणायचे आणि मग ते प्रेक्षकांच्या समोर पेश करायचे, याचा रिवाज त्यांनी घडवला. विजयाबाईंकडे एक कमालीची तटस्थता होती, जी त्यांच्या मांडणीतही आली. त्या स्वतःच्या प्रेमात कधीच पडल्या नाहीत. अभिनय चळवळ व थिएटर पुढे नेण्यासाठी, देशी-विदेशी अशा सर्वच लोकांबरोबर त्यांनी काम केले. स्वतःमधल्या निसर्गदत्त कलेचा त्यांनी आदर केला. स्वतःभोवती कलाकृती फिरवणारा नट किंवा नटी पाहिली की, त्यांच्या कपाळावर आठी पडत असे. अशा वागण्याला त्या 'नाटकातली अनैतिकता' असे म्हणत. नाटक किंवा अभिनय याच्या भोवताली जे सगळे घटक दृश्यमान चौकटीत येतात, ते सगळेच तितकेच महत्त्वाचे आहेत, असे त्या मानत. त्या स्वतः ते तत्त्वज्ञान काटेकोरपणे जगल्या. 'बॅरिस्टर' हे मराठी रंगभूमीवरचे अजरामर नाटक. विक्रम गोखले, विजया मेहता यांनी हे नाटक कायम लक्षात राहील असे साकारले. बाईंनी यात अभिनय साकारला असला, तरी त्यांच्यातली दिग्दर्शिका येथे जिवंत होती. त्यामुळेच ते चिरस्मरणात राहिले.

'दृढविश्वास ठेवला की, नाट्यातले 'सत्य क्षण' कुठेही निर्माण होऊ शकतात,' हे बाईंचे गाजलेले वाक्य. याला सामूहिकतेची एक किनार आहे. बाई तशाच जगल्या. पिटर ग्रुक दिग्दर्शकाबरोबर त्यांनी जर्मनीत साकारलेले 'महाभारत' हा मोठ्या चर्चेचा विषय ठरला होता. प्रत्यक्ष दगडाच्या खाणीत साकारलेले हे नाट्य 'रफ थिएटर'चा अस्सल अनुभव होता. 'खरेतर नाटक म्हणजे मिथ्य; परंतु हे मिथ्यच आपल्याला अंतिम सत्याप्रत घेऊन जाते,' हे 'पिकासो'चे वाक्य बाई जगल्या. असत्याकडून सत्याकडे होणारा हा प्रवास, त्यासाठी कराव्या लागणाऱ्या वास्तवाची पुनर्निमिती, त्यासाठी साकारावे लागणारे नाटक आणि प्रयोगा गणिक त्यात केले जाणारे सुधार, यात बाई आयुष्यभर रमल्या. प्रयोग रंगवणे ही त्यांची खासियत होती. त्यासाठी त्या जीवापाड झटल्या. बाईंचे बाईपण यातूनच आकाराला आलेले होते. दीर्घायुष्य लाभलेल्या बाईंनी आपल्या नाटकाची कारकीर्द वयाच्या १८- १९व्या वर्षीच सुरू केली होती. नाटकाचा प्रयोग हेच अंतिम सत्य मानल्यामुळे त्या त्यातच रमल्या. एक दीर्घ कारकीर्द त्यांना यामुळे मिळाली.

रंगभूमीकडे आज मराठी प्रेक्षक किंबहुना, देशभरातलाच प्रेक्षक पाठ फिरवत असल्याचे दिसते. त्याचे कारण, रंगभूमीच्या कलाकारांनी रंगभूमीचे निकष पाळणे बंद केले हेच आहे. परमेश्वर कसा दिसतो, याची वर्णने आपण ऐकू शकतो. परंतु, रंगभूमीत परमेश्वर कसा असतो, याचे 'याची देही याची डोळा' दर्शन विजयाबाईंनी घडविले. एखाद्या महाकाय वाद्यवृंदाच्या निरनिराळ्या वाद्यांम धून निघणारे शेकडो सूर, लयी आणि ताल एका बारीक काडीच्या आधाराने नियंत्रित करणाऱ्या संगीत दिग्दर्शकाप्रमाणे विजयाबाई जगल्या. त्यांनी अभिनय, संगीत, कला, नेपथ्य, प्रकाशयोजना, वेशभूषा या सगळ्याच विषयात एक वस्तुपाठ तयार करून ठेवला. त्यांनी निवडलेली वाट अवघड होती. इतकी अवघड की, त्यांच्या शिष्योत्तमांनासुद्धा त्याच वाटेवर चालत राहणे शक्य झाले नाही.

'एनसीपीए'ची थिएटर्स आजही बाईंच्या प्रयोगशीलतेची व भविष्यवेधी वृत्तीची साक्ष देतात. अभिनयाचा कॅन्व्हास अंगभूत गुणवैशिष्ट्यांमुळे उपलब्ध असला, तरी दिग्दर्शनाची वाट निवडून पडद्यामागे जाणे हे अवघड. मनस्वी कलाकारच हे करू शकतो, बाईंनी ते केले. कालचक्राच्या गतीत अशी अनेक व्यक्तिमत्त्वे आकाराला येतात व विस्मृतीत निघून जातात. विजयाबाईंचे मात्र तसे होणार नाही. कारण, एखाद्या रंगलेल्या प्रयोगाचा प्रभाव प्रदीर्घ काळ रसिकप्रेक्षकांच्या मनावर कोरला जावा, तसे विजयाबाईंचे व्यक्तिमत्त्व मराठी मुलुखात कोरले गेले आहे.